# हाकारा



वर्ष दुसरे : अंक तिसरा ❀ जुलै–सप्टेंबर, १९८१

# छत्रपती शिवाजीमहाराजांचे आज्ञापत्र

श्री

आपले राज्यात अरण्यात सागवानादी वृक्ष
आहेत. त्याचे जे अनुकूल पडेल ते हुजूरचे परवान-
गीने तोडून न्यावे. या विरहीत जे लागेल ते परमुलुखीहून
खरेदी करुन आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे फणस आदि
करून हे ही लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची परंतु त्यास हात लावू-
देऊ नये. काय म्हणोन की ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात असे नाही.
रयतांनी ही झाडे लावून लेकरासारखी बहुत काळ जतन करून-
वाढविली. ती झाडे तोडील्यावर त्याचे दुःखास पारावार काय?
एकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारा
स्वल्पकाळाचे बुडोन नाहीसे होते. धनियाचे पदरी प्रजा पीडण्या-
चा दोष पडतो. वृक्षाअभावे हानी होते. करितां हे गोष्टी सर्वथैव-
होवू न द्यावी. कदाचित एखादे झाड जीर्ण होऊन कामातून-
गेले असेल त्याचे धन्यास राजी करुन द्रव्य-
देउन त्याचे संतोषे तोडोन न्यावे.

छत्र
पति

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | गं. बा. सरदार |
| **उपाध्यक्ष** | अनंतराव बोधनकर |
| | काळूराम दोधाडे |
| **चिटणीस** | रा. के. मुटाटकर |
| **सहचिटणीस** | जगदीश गोडबोले |
| | विजय भानू |
| **खजीनदार** | अनिल गोरे |
| **सभासद** | गोविंद गारे |
| | शं. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | जनार्दन वळवी |
| | शरद कुलकर्णी |
| | थियो रेमिडियोस |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनुताई वाघ |
| सुधा काळदाते | विलास संगवे |
| विजय तेंडुलकर | वाहरु सोनवणे |
| वि. म. दांडेकर | गीता साने |
| मधुकर देवल | छाया सुरतवंती |
| चित्रा नाईक | दत्ता सावळे |

आ. ना. नारळकर

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


संपादकीय २

धनगराला धत्तुरा, शहरवाल्यांना मलिदा ३
**जगदीश गोडबोले**

जंगले वाचवा : धोरण आणि वस्तुस्थिती ९
**दीनानाथ मनोहर**

वन आणि आदिवासी अर्थव्यवस्था १५
**ब्रह्मदेव शर्मा**

निलगिरीची वनशेती २५
आनंद ससलेकर

वनसंवर्धन आणि ग्रामीण विकास २९

पुस्तक परिक्षण ३१

जंगल बचाव परिषदा ४१

वनकर्मचारी आणि कार्यकर्ते परिषद ४२

संवाद ४५

संस्थापरिचय ४७


---


वर्ष दुसरे : अंक तिसरा
जुलै–सप्टेंबर १९८१
वार्षिक वर्गणी : १५ रुपये
या अंकाची किंमत : ४ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद / हाकारा
द्वारा : जगदीश गोडबोले,
सीमा, ब ७, शिरोळे मार्ग,
पुणे ४११ ००४

**कार्यकारी संपादक**
जगदीश गोडबोले

**संपादक मंडळ**
रामचंद्र मुटाटकर
शरद कुलकर्णी
भाऊ मांडवकर

प्रकाशक : प्रा. रा. के. मुटाटकर,
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव
पेठ, पुणे ३०
येथे छापून प्रसिद्ध केले.
मुखपृष्ठ : सुरेश चांडवले

## संपादकीय

'हाकारा'–जुलै १९८० अंकाचा प्रमुख विषय आदिवासी व वन–संवर्धन असा होता.

आदिवासी व जंगल यांचे अतूट नाते आहे. आर्थिक-भावनिक संबंध आहेत. सहाजिकच वन–संवर्धनाच्या प्रयत्नात त्यांना महत्त्वाचा भागीदार म्हणून सहभागी करून घेतले जाईल अशी अपेक्षा होती. तथापि एक तर आदिवासी विकासाचा विचार आधुनिक शेतीच्या संदर्भात झाला; पण आदिवासीला नैसर्गिक जाण असलेल्या वन–संवर्धनाबाबत झाला नाही. आणि सर्वांत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आदिवासी–वनवासीसह वन–संवर्धनाऐवजी त्यांच्यापासून वन–संरक्षण असा उफराटा न्याय अनेकदा झाला. जबरन–जोत जमिनीचा प्रश्न दरवेळी अर्धवट सोडवून आदिवासींनाच धोपटण्याचा प्रयत्न झाला. 'हाकारा'ने या अन्यायाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

वन–संवर्धन व पर्यायाने पर्यावरण रक्षणाचा प्रश्न हा आदिवासी व बाहेरील जग यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. कारण तो केवळ आदिवासी-वनवासी-पुरताच मर्यादित नाही तर या पृथ्वीवर रहाणाऱ्या प्रत्येकाशी, प्रत्येक विचारधारेशी, वर्तमान आणि भविष्याशी निगडित आहे. या भूमिकेतून या प्रश्नावर जास्तीत जास्त चर्चा व्हावी, सर्वांगीण–समतोल चर्चा व्हावी याबाबत 'हाकारा' व 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' प्रयत्नशील आहे.

अशा प्रयत्नांना थोडेफार यश येत असल्याची सुचिन्हे दिसू लागली आहेत. लोकांना वनांचे महत्त्व पटत आहे, त्याहूनही भाग्याची गोष्ट म्हणजे वन–खात्याला लोकांचे, लोकसंपर्काचे महत्त्व पटू लागले आहे. खऱ्या अर्थाने जंगलाबाहेर पडून वनखाते लोकांपर्यंत पोहोचण्याचा, लोकाभिमुख योजना बनविण्याचा त्यांना त्या समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. सामाजिक वनीकरणाच्या अनेक चांगल्या योजना बनत आहेत. स्वतंत्र यंत्रणा उभी रहात आहे.

'हाकारा' या महत्त्वाच्या प्रश्नाचा पाठपुरावा करीत आहे. या वर्षीच्या पहिल्या अंकात श्री. शंकर रंगनाथन् यांचा 'वनशेती' वर महत्त्वपूर्ण लेख प्रसिद्ध झाला आहे, या अंकात डॉ. ब्रह्मदेव शर्मा यांचा लेख प्रसिद्ध करीत आहोत. आमचे सर्व वाचक, आदिवासी कार्यकर्ते या प्रयत्नात सहभागी होतील अशी आशा आहे.

---

आदिवासी उप-योजनेतील एक प्रकल्प-अधिकारी श्री. पी. डी. राजपाठक यांचे भमरागड मुक्कामी मेंदूच्या हिवतापाने निधन झाले.

श्री. राजपाठक यांचा विशेष म्हणजे भमरागडपलीकडील अबूझ–माड या दुर्गम आदिवासी भागाच्या प्रकल्प–अधिकाऱ्याची जागा त्यांनी आपणहून स्वीकारली होती. चंद्रपूर जिल्ह्यातील भमरागडसारखे दुर्गम भाग 'काळे–पाणी' म्हणून ओळखले जातात. काही सन्मान्य अपवाद वगळता तिथे कोणी नोकरीला जाण्यास तयार नसतात. नेमणूक झाल्यास परस्पर बदली करून घेतात वा लवकर पळ काढतात. अशा परिस्थितीत श्री. राजपाठक राजीखुषीने त्या भागात गेले एवढेच नाही तर तेथील लोकांच्या विकासासाठी त्यांनी झटून प्रयत्न केले. दुर्दैवाने त्यांचे काम अधुरे राहिले.

प्राणाची बाजी लावून झुंजणाऱ्या सैनिकांची आपण कदर करतो, त्याचप्रमाणे अशा दुर्गम भागात, राना–वनात काम करणाऱ्या, खपणाऱ्या सरकारी यंत्रणेतील सेवकांचीही कदर व्हायला पाहिजे. अशा भागात काम करणाऱ्यांसाठी व काम करायला अनेकांनी पुढे यावे यासाठी अशा सेवकांना खास भत्ते, कुटुंबियांसाठी सोयी, बढतीमध्ये अग्रक्रम आदि बाबींचा विचार व्हायला पाहिजे. श्री. राजपाठक यांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत देणारे 'महाराष्ट्र शासन' या दूरगामी उपाय–योजनेचा विचार करील अशी आशा आहे.

श्री. राजपाठक यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन. आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.



# धनगराला धत्तुरा शहरवाल्यांना मलिदा !

जगदीश गोडबोले

पर्यावरण रक्षणाच्या कामगिरीबद्दल डॉ. माधव गाडगीळांना यावर्षी 'पद्मश्री' मिळाली, त्यामुळे त्यांच्या विषयी, त्यांच्या कार्याविषयी जास्त माहिती करून घेण्याची उत्सुकता वाढली.

डॉ. माधव गाडगीळांशी परिचय गेल्या दीड-दोन वर्षातला. त्या अगोदर त्यांच्याविषयी खूप ऐकून होतो. हार्वर्डसारख्या विश्वविख्यात विद्यापीठातून त्यांनी अगदी तरुण वयात डॉक्टरेट मिळवली आहे, पर्यावरण आणि निसर्गशास्त्राचे ते एक जाणकार अभ्यासक आहेत आणि त्यांच्या अभ्यासासाठी त्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली आहे. स्व. धनंजयराव गाडगीळांचे ते सुपुत्र आहेत इत्यादी. मनातल्या मनात आदर–खाती नोंद झाली होती. काही दिवसांनी पुण्याला त्यांच्या भेटीची संधी मिळाली. 'चिपको' आंदोलनाची मला माहिती हवी होती, म्हणून मी त्यांना भेटलो. डॉ. गाडगीळांनी स्वतःला ज्ञात होती ती माहिती नेमक्या आणि सोप्या शब्दांत सांगितली आणि जे माहीत नव्हतं ते सरळ स्पष्टपणे माहीत नाही, असं सांगितलं. मात्र ती माहिती मला मिळाल्यास कळवायला आवर्जून सांगण्यास ते विसरले नाहीत. हा अनुभव काहीसा नवा आणि खूपसा सुखकारकही होता. आमची छोटी मुलाखत संपली. दुसऱ्या दिवशी डॉ. गाडगीळ, त्यांचे सहकारी डॉ. कैलास मल्होत्रा आणि इतर जण गवळी-धनगरांचा अभ्यास करण्यासाठी मुळशी–पानशेतच्या डोंगर–माथ्याकडे रवाना झाले. ऐन एप्रिलच्या 'चांदण्या'त त्यांनी उभे डोंगर पालथे घातले. पुढं या मंडळींशी परिचय वाढला. त्यांच्या कामाचा झपाटा आणि उत्साह अधिक जवळून पहाता आला. तेव्हा जाणवायला लागलं की, ही मंडळी वेगळी आहेत. निखळ शास्त्रीय संशोधनात यांना उत्तम गती आहे; पण केवळ त्यामधील घटापटात गुंतून पडणारे यांचे संशोधन नाही. पर्यावरणातील एक मोठा आणि महत्त्वाचा घटक माणूस. सर्वसामान्य माणूस, त्याची सुख-दुःखं जाणण्यासाठी, अनुभवण्यासाठी हस्तिदंती मनोऱ्यातून पायउतार होऊन घेतलेला हा एक सामाजिक शोध आहे. या माणसांना शास्त्राएवढीच समाजमनाची ओढ आहे. अर्थातच आदराला, आपुलकीची जोड मिळाली !

## निसर्गबचावाची आंदोलनं

हिमालयातील 'चिपको' आणि केरळमधील 'शांति-घाटी' आंदोलनानं भारतात पर्यावरण–विषयक चर्चेला प्रथम तोंड फोडलं. आज भारतभर चिपको, शांतिघाटीबरोबरच होशंगाबादचे 'मिट्टी बचाव' आंदोलन, कारवार–मालनाडची काळी नदी बेडथी धरण निषेधचळवळ, अशी डझनवार आंदोलनं चालू आहेत. स्थानिक माणसांच्या जीवन–मरणाच्या प्रश्नाबरोबरच पर्यावरण व निसर्गशास्त्राच्या व्यापक प्रश्नांना त्यांनी हात घातला आहे. एक जमाना असा होता की, स्थानिक उपद्व्यापी लोकांचे नसते उद्योग अथवा काही पर्यावरणवादी उच्चभ्रू लोकांचे फॅड या वा अशा शब्दात अशा आंदोलनांची–प्रयत्नांची बोळवण होत असे. आज ही परिस्थिती फारशी बदललेली नसली तरी अशा आंदोलनांना मिळणारा लोकांचा व जाणकारांचा वाढता पाठिंबा पाहून सर्वसामान्य माणसाला जरा गोंधळायला झालं आहे. एक तर पर्यावरण, निसर्गशास्त्र वगैरे भानगडी आपल्या

खिजगणतीत नव्हत्या. दुसरी गोष्ट म्हणजे विकास म्हणजे प्रचंड धरणे– रस्ते– कालवे– कारखाने इत्यादी दृश्य स्थावर– जंगम मालमत्ता असं साधं सुटसुटीत समीकरण आपल्या मनात पक्कं बसलं होतं; पण या आंदोलनांनी आपल्या समजुतींना जरा धक्का दिला. विकास आणि पर्यावरण– निसर्गशास्त्र यांचा परस्पर संबंध काय ? त्यांच्यात अंगभूत विरोध आहे की काही सुसंवादही आहे ? आर्थिक-भौतिक विकासासाठी पर्यावरणाचा विनाश अपरिहार्य आहे काय ? पर्यावरण रक्षणाची 'चैन' भारतासारख्या गरीब देशाला परवडणार आहे का ? मनाला पडणाऱ्या या व अशा प्रश्नांची सीधीसाधी उत्तरं समोर आली असता चंडी-प्रसाद भटसारखा एखादा आंदोलक मध्येच विचारायला लागला : विकास कोणाचा आणि कोणाच्या जीवावर ? कोणत्या किमतीवर ? विकास कशासाठी ? विकासाचा अर्थ काय ? डॉ. माधव गाडगीळांनी या बाबत आपली भूमिका मुलाखतीमध्ये स्पष्ट केली.

डॉ. गाडगीळ प्राणिशास्त्राचे पदवीधर, डॉक्टरेटही त्याच विषयातले. पुण्याच्या 'विज्ञानवर्धिनी'मध्ये काम करताना ते निसर्गशास्त्राच्या अभ्यासाकडे वळले. तिथं त्यांनी १९७२ च्या सुमारास डॉ. वर्तक आणि श्री. नेने या ज्येष्ठ सहकाऱ्यांबरोबर महाराष्ट्रातील देवरायांच्या (सॅक्रेड ग्रोव्ह्ज्) अभ्यासपहाणीस सुरुवात केली. आज महाराष्ट्रात, विशेषतः सह्याद्रीमध्ये कुठेही जा. काही मोजके अपवाद वगळता बोडक्या डोंगरांच्या सुतकी रांगा सर्वदूर पसरलेल्या दिसतात. मन विषण्ण करणाऱ्या या वातावरणात डोंगरमाथ्यावर, साऱ्या अंगाखांद्यावर मध्येच एखादी वनराई दृष्टीस पडते. सफाचट मुंडण केलेल्या बटूच्या भोवऱ्यासारखी वा पार भादरलेल्या टकुरावरील 'बिस्कूटा'सारखी ! ही वनराई म्हणजेच आपल्या पूर्वजांनी आपल्या देव–देवतांकरता राखून ठेवलेली देवराई अथवा देव–रहाट. भरगच्च झाडापानांनी झाकोळलेल्या या देवराईत एखादी काळ-काई नाही तर जन्नीदेवी विसावलेली असते. (देशभर तसेच जगभरच्या इतिहासात अशा देवरायांचा उल्लेख सापडतो.) अशा या देवराईतले झाड काय पण वाळली काटकी तोडायची कोणाची हिंमत नसायची. वनौषधी-साठी अथवा काही खास कारणासाठी तोड करायची असल्यास देव–देवतांची विधिवत संमती घ्यावी लागायची. आपल्याला तारणाऱ्या देव–देवतांना शांत–निवांत निवारा मिळावा म्हणून ही बंधने घातली असावीत. काही संशोधकांच्या मते पूर्वीच्या नरबळीच्या प्रथेच्या वेळी देवराईतील गूढ रम्य वातावरणाचा वातावरणनिर्मितीसाठी उपयोग होत असावा. त्यात काही तथ्य असेल–नसेल; पण या देवराया राखण्या-साठी काही व्यावहारिक कारणंही होती. या देवरायांनी गावच्या ओढ्या–नाल्याचं पाणी धरून ठेवलं होतं. अनेक दुर्मिळ वनौषधी जतन करून ठेवल्या होत्या. आज परिस्थिती झपाट्याने बिघडत चालली आहे. सामाजिक गरजांना धर्माचा आसरा देणाऱ्या पूर्वीच्या काही चाली–रीती मागे पडत चालल्या; परंतु त्यांची जाग डोळस सामाजिक जाणिवांनी घेतली नाही. परिणामी, वैयक्तिक स्वार्थासाठी निसर्ग–संतुलन आणि वनस्पति-शास्त्रदृष्ट्या आत्यंतिक महत्त्वाच्या अशा या आदि–अरण्यांचा आज अक्षरशः कोळसा होत आहे ! देव-रायांचा अभ्यास करणाऱ्या या अभ्यासकांना जाणवलं की, या देवराया नष्ट होत असताना स्थानिक माणसाला केवळ नुकसान सहन करावं लागत नाही, तर उलट या नुकसानीचं खापर त्याच्याच माथ्यावर मारून इतर लोक नामानिराळे होत आहेत !

## मुंबईकराला मलिदा

देवरायांचा अभ्यास करता–करता डॉ. गाडगीळ सह्याद्रीच्या कुशीतील गवळी–धनगरांच्या जवळ आले. नेमकं त्यांच्या काही वर्षंच अगोदर श्रीमती इरावतीबाई कर्व्यांनी धनगरांच्या अभ्यास–पाहाणीचा एक प्रकल्प हाती घेतला होता. साहजिकच डॉ. गाडगीळांच्या निसर्ग–शास्त्रीय अभ्यासाला इरावतीबाईंच्या समाज आणि मानवशास्त्रीय ज्ञानाची जोड मिळाली. आणखी महत्त्वाची जमेची गोष्ट म्हणजे डॉ. कलास मल्होत्रा-सारखा रसिक जाणकार मानवशास्त्रज्ञ साथीला मिळाला. महाराष्ट्रातील पनवेलपासून कर्नाटकातील चिकमंगळूरपर्यंत डोंगरमाथ्यावरील एका मनस्वी भटकंतीस सुरुवात झाली. आठ-दहा वर्षांच्या परिश्रमाच्या मुक्त संशोधनानंतर या दोघांनी लिहिलेला, 'इकॉलॉजी ऑफ अ् पॅस्टोरल कास्ट– दी गवळी-धनगर ऑफ पनिन्स्यूलर इंडिया' हा प्रकल्प– अहवाल म्हणजे थिअरी आणि वास्तव, निसर्गशास्त्र आणि मानवशास्त्र यांचा सुंदर मिलाफ आहे. त्याला माणुसकीची ऊब आहे. डॉ. गाडगीळांनी अहवालाचा मराठी अनुवाद करताना नावातच अहवालाचं सार सांगून ठेवलं आहे– 'मुंबईकराला मलिदा आणि धनगराला धत्तुरा !'

गवळीधनगर ही धनगरांची एक पोटजात. म्हस्के-धनगर वा डंगे-धनगर या नावानंही ती ओळखली जाते. पशुपालनाचा धंदा करणारी ही मंडळी महाराष्ट्रात बारा मावळ आणि चौदा कोकणांत पसरली आहे. गवळी-धनगरांची ही सुमारे दहा हजार कुटुंबं मुंबई-पुण्याच्या दूध-योजनांना वर्षाकाठी अंदाजे सव्वा कोटी लिटर दूध पुरवित आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील दूध-योजनांचा मोठा आधार आहेत. या धनगरांची वस्ती पार डोंगरावरच्या मुऱ्यांवर किंवा सड्यांवर (एकेकाळी नदीकाठच्या सुपिक खोऱ्यात असावी, पण लोकसंख्येच्या वाढत्या दबावाखाली अधिक संघटित व आक्रमक कुणबी समाजाने यांना डोंगराकडे ढकलले असावे.)

### थापा आणि लालूच

डोंगरावर तुफान वारा-पाऊस यांचं कायमचं थैमान; पण पूर्वी उभ्या जंगलाचा आसरा होता. जिंदगी खडतर होती; पण गुराढोरांना चारापाणी मुबलक असल्याने धनगरवाड्यात दह्यादुधाची रेलचेल होती. लोक दूध-ताक घरी ठेवत होते. पोरा-बाळांना वासरांना पाजित होते. उरेल ते बाजारात विकत होते, एकूण गोकुळात आनंदीआनंद होता; पण हा आनंद फार काळ टिकला नाही. मोठमोठे उद्योगधंदे आणि शहरं आपले हातपाय पसरू लागली. त्यांच्या गरजा भागविण्यासाठी एका-मागून एक जंगलं तुटू लागली. मुंबईला वीज पुरविण्या-साठी मुळशी धरण झालं. पुणेकरांना पानशेतनं पाणी पुरवलं. धरणाच्या पाण्याखाली जाणाऱ्या बुडीत क्षेत्रा-तील (सब्मर्जन्स एरिया) जंगल तोडलं जाणं स्वाभाविक होतं, पण जंगलकंत्राटदार, अधिकारी व इतर हितसंबंधी यांनी स्थानिक लोकांना तुमचं गाव बुडणार आहे, सरसकट सर्वांना दूर बसविणार आहेत, मग तुम्हाला झाडांचा काय उपयोग इ. थापा मारून आणि लालूच दाखवून केवळ बुडित क्षेत्र आणि आस-पासचेच नाही, तर पार नद्यांच्या पाणलोटक्षेत्रातील (कॅचमेंट एरिया) उभं जंगलही कापून नेलं. पुणे-मुंबईकरांची चूल वा बंब पेटायला हवेत म्हणून भोरच्या हिरडोशी घाटातील हिरड्याच्या प्रचंड जंगलाचा अक्षरशः कोळसा झाला ! सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यांतील जंगल असं चहू अंगानी तुटत असता, चारा, पाणी-सर-पणाला दिवसेंदिवस पारखा होणारा स्थानिक माणूस एक तर असहाय्यपणे त्याकडे पहात होता किंवा अग-तिकतेनं मजुरीच्या आशेनं त्याला हातभार लावीत होता. डोंगरावरच्या धनगरांची परिस्थिती तर आणखी-नच वाईट झाली. जंगलाचा आसरा गेल्यानं ऊन-वारा-पाऊस अक्षरशः झोडपायला लागले. पूर्वी गुरांना जंगलात उंडा-बोधी, शिवण-काड्या उंबराचा पाला भरपूर होता. आता हिरवा पाला काय, पोटभर गवतही मिळायची मारामार झाली ! जंगलाचा आसरा गेल्यानं कोसळणाऱ्या पावसात जमिनीची प्रचंड धूप सुरू झाली आणि १५०-२०० इंच पावसाच्या या प्रदेशात पावसाळ्याखेरीज घोटभर पाणी मिळण्याचीही मारामार होऊ लागली. तहानेनं जीव कासावीस झालेल्या गुरा-ढोरास सावली-पुरतं झाडही उरलं नाही.

एका बाजूला निसर्गाची, निसर्गपुत्रांची आणि साऱ्या गायी-म्हशींची अशी फरफट सुरू झाली असताना; दुसऱ्या बाजूला दूध-सोसायटीची चळवळ जोरात उभी राहिली. दूधगंगा दुथडी भरून वाहू लागली. 'ऑपरेशन फ्लड' सारख्या चमकदार योजनांची खैरात झाली. शहरवासीयाना स्वस्त आणि मस्त दूध आणि तेही माफक दरानं पुरवणं ही नक्कीच अभिमानास्पद गोष्ट होती, त्यावरून दुधाचे एकूण उत्पन्न वाढलं असा कोणाचाही स्वाभाविकपणे समज झाला असावा; पण डॉ. गाडगीळ-मल्होत्रांना आपल्या पाहाणीत भलतंच आढळलं.

गायी-म्हशी चाऱ्याचं दुधात रूपांतर करतात. चाऱ्याचं दुधात रूपांतर करण्याचं त्या केवळ एक साधन आहेत. तेव्हा दुधाचं उत्पन्न दोन प्रकारे वाढू शकलं असतं. एकूण चाऱ्याचं उत्पादन वाढवून किंवा गायी-म्हशींच्या चाऱ्यांचे दुधात रूपांतर करण्याची शक्ती वाढवून. महाराष्ट्रात या दोन्ही शक्यता आढ-ळल्या नाहीत. एकतर जंगलं-माळरानं-चराऊ रानं झपाट्यानं कमी होत गेल्यानं चारा-पाला कमी झाला. शिवाय अधिक उत्पन्न देणाऱ्या या संकरित जातीच्या प्रसारामुळे कडबाही वाढला नाही. गुरांच्या नव्या संकरित जातींच्या प्रसारामुळं कमी चाऱ्यात जास्त दूध निर्माण करणारी पशुसंपत्ती वाढली काय ? तसंही आढळलं नाही. कारण या संकरित पशूंची संख्या फार मर्यादित होती आणि मुख्य म्हणजे अशा महागड्या गायी पाळण्याची ऐपतही फार कमी लोकांकडे होती.

### ग्यानबाची मेख !

अशी जर परिस्थिती आहे तर शहरांच्या वाढत्या दूध-पुरवठ्याचं रहस्य काय ?

डॉ. गाडगीळ-मल्होत्रांचं त्यावर साधं स्पष्ट उत्तर आहे की आपल्या कल्पक शहरी भगीरथांनी गवळी-धनगरांच्या, इतर ग्रामीण जनतेच्या, वासरांच्या तोंडचं दूध काढून तो ओघ आपल्या शहराकडे वळला !

पूर्वी धनगर ताक-दूध घरी ठेवीत, पण आता दुधाला बरा भाव आल्यानं सर्व दूध विकलं जाऊ लागलं. दूधयोजनांमुळं धनगरांच्या हातात चार पैसे आले; पण त्यानं जीवनसत्वयुक्त आहाराची भर घातली नाही, तर ते पैसे शेवटी शहराकडे चैनीतच खर्ची पडू लागले. अशा तऱ्हेने जनावरांच्या तोंडचा चारा आणि वासरांच्या तोंडचं दूध घटल्यामुळं वासरामधील मृत्यूचं प्रमाण वाढलं आहे अथवा उशीरा फळणं आणि चाऱ्याचं दुधात रूपांतर करण्याची त्यांची शक्ती घटत आहे.

डॉ. गाडगीळ-मल्होत्रांना आढळलेली सर्वांत धक्कादायक गोष्ट म्हणजे दूध सोसायट्यांच्या सर्व योजना व यंत्रणा दूध-पुरवठाकेन्द्रे, त्यांना दूध पुरविणाऱ्या दूधगाड्या, बर्फकेन्द्रे, पावडर बनविण्याची व्यवस्था यांतच गुंतून पडली होती व दूध-उत्पादकाला एकदा पैसे दिले की, जबाबदारी संपली म्हणून हात झटकून मोकळी होत होती. पुणे-सातारा-कोल्हापूर-रत्नागिरी-कुलाबा व कारवार जिल्ह्यांत त्यांनी भेट दिलेल्या पन्नास धनगरवाड्यावरच्या एकाही गवळी-धनगराला दुधाच्या पैशाखेरीज सोसायटीकडून कसलीही मदत झालेली नव्हती अनेकदा मागणी करूनही !


मला आपल्या तमाशातील कृष्णगवळणींचा मथुरेच्या बाजाराचा 'शीण' आठवतो ! दही-दुधाची मडकी घेऊन गौळणी बाजाराला निघाल्या आहेत आणि कृष्ण त्यांना अडवून प्रथम आपल्या बाल-गोपालांना पोटभर दही-दूध खायला घालत आहे. खरोखर किती प्रचंड अर्थ भरला आहे, या साध्या-सुध्या गोष्टीत ! दुर्दैवानं आमची गाडी गौळणी आणि तिच्या 'मावशी'च्या ठेसनातच अडकली ! त्याला तो कृष्ण-भगवान तरी काय करणार !

## मानवी महापूर

दूधयोजनांसारख्या आपल्या अदूरदर्शी योजनांचे निसर्ग-संतुलन आणि समाजशास्त्रीयदृष्ट्या अतिशय गंभीर परिणाम होणार आहेत असा इशारा आजच डॉ. गाडगीळ-मल्होत्रा आपल्याला देत आहेत. कारण दूध-गंगेचा हा पूर फसवा, तात्कालिक आहे. गवळी-धनगर पूर्वी मुख्यत: म्हशी व गायी पाळत होते. चारा-पाणी कमी झाल्यावर गायी-म्हशींची जागा बकऱ्यांनी घ्यायला सुरुवात झाली आहे. बकऱ्यांनी उरले-सुरले जंगल फस्त केल्याने त्याला डोंगरावरच्या शेतीची जोड द्यावी लागत आहे. पण उभ्या डोंगरावरची शेतजमीन झपाट्याने धुपून जात आहे आणि शेवटी मानवी पर्यावरणाच्या नियमाप्रमाणं माती आणि धनगर दोन्हीही दिवसेन् दिवस धुपून दूर शहराकडे येत आहेत. पर्यावरणाचा नाश झालेल्या इतर ग्रामीण भागांचा तसा इतिहास आहे. मग शहरांच्या झोपडपट्टीत आणि बेकार माणसांत भर पडेल. अनेक सामाजिक आर्थिक समस्या उभ्या राहतील. योजना बनतील. डोंगरावरून सुटलेला महापुराचा हा लोंढा आपण शहरातच संरक्षक भिंती-उभारून थोपविण्याचा वेडगळ आणि दुर्बल प्रयत्न करत बसू !

आपल्या अदूरदर्शी आणि एकांगी योजनांमुळे माणसाला भोगाव्या लागणाऱ्या परिणामाचे आणखी एक उदाहरण म्हणजे कारवार-कर्नाटकातील बांबूची कहाणी! एके काळी या भागात भरपूर बांबू होता. इतका की एक महत्त्वाचा वन-उपज नाही तर तण म्हणून बांबूकडे बघण्यात येत असे.पुढे 'म्हैसूर पेपर मिल' आणि 'वेस्ट कोट पेपर मिल' स्थापून या बांबूंचा सदुपयोग करण्याची योजना आखण्यात आली. कच्चा माल भरपूर होता, राष्ट्राला कागदाची गरज होती, योजना उत्तम होती. या कागदगिरण्यांना लागणारा बांबू आसपासच्या जंगलातूनच सातत्यानं मिळत राहील असं छातीठोकपणे सांगण्यात आलं होतं; परंतु आपली सोन्याची अंडी देणारी कोंबडीच मारून खाण्याची लालची वृत्ती आड आली. बांबूचा फुलोरा (फुलोरा आल्यावर बांबूची बेटच्या बेटं मरून जातात.) आणि बांबूकटाईच्या शास्त्रशुद्ध योजनांसारख्या प्राथमिक गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आल्यानं आसमंतातला बांबू बघता-बघता साफ झाला. आज कर्नाटकातील वेस्ट कोस्ट पेपर मिलला पार हिमालय वा मेघालयातून बांबू आणावा लागत आहे. वास्तविक बांबूचा सातत्याने व नियमित पुरवठा होत राहावा म्हणून नियोजन करणं फारसं त्रासाचं किंवा खर्चाचं नव्हतं; पण मग कमीत कमी वेळात जास्तीत जास्त फायदा कोण कमविणार ?

बांबूची कर्मकहाणी कागद-गिरण्यांपुरती किंवा पर्यायानं कागदाचा उपयोग करणाऱ्या तुम्हा-आम्हा



जंगल आच्छादन गेल्याने खचलेली शेतजमीन

शहरवासीयांपुरतीच मर्यादित नाही. उद्या आपण गुलाबाच्या पाकळ्यांतून अथवा सिगारेटच्या थोटकातून कागद निर्माण करू! (म्हणजे शेवटी निसर्ग-संपत्तीशी संबंध आलाच; पण तेवढंच मनाला समाधान!) पण बांबू आपल्या ग्रामीण विशेषतः वनविभागातील ग्रामीण जीवनपद्धतीच्या अर्थव्यवस्थेचा मोठा आधार आहे. घरांसाठी, कणग्या, टोपल्या विणण्यासाठी लोकांना बांबूची गरज आहे. बुरुडांची लाखो कुटुंबे त्यावर पोट भरून आहेत. बांबूच्या बेदरकार वापराचा सर्वांत जास्त फटका जर कोणाला बसला असेल तर तो या लोकांना! कागद-गिरण्यांतून या स्थानिक जनतेला चाकरी मिळाली नाहीच; पण या बड्या गिरण्यांना पंधरा रुपये टन या सुलभ भावानं बांबू मिळत असता, या गरिबांना मात्र बांबूचा भाव बाराशे रुपये टन या हिशेबाने पडत आहे! हे आपले समाजवादी नियोजन! तोंडचा घास काढून घेतलेल्या किती बुरुडांची पोरं कागद-पेन्सिल हाती येण्याएवढी भाग्यवान आहेत? आपल्या या करंटचा नियोजनानं बुरुडांच्या हातात केवळ भिकेचीच करवंटी दिली नाही तर बांबू झपाटयानं नष्ट झाल्यानं त्याची जागा गाजर गवतासारख्या युपेटेरिया या नतद्रष्ट तणानं घेतली आहे.

## विकास आणि विनाश

डॉ. माधव गाडगीळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी अभ्यासलेल्या पश्चिम घाटातील निरनिराळ्या धरणप्रकल्पांची कहाणी तर आणखीनच विदारक आहे! गुजरात–महाराष्ट्र–गोवा–कर्नाटक–केरळ राज्यांत समुद्राला समांतर पसरलेला पश्चिम घाट व त्याच्यातून उगम पावणाऱ्या नद्या,जलविद्युत–योजनांना आणि पाटबंधारे–प्रकल्पांना अतिशय योग्य जागा आहेत. कोयना, लिंगानामाक्की, अप्पर भवानी, इडिकिसारखे जलविद्युतनिर्मितीप्रकल्प किंवा कृष्णा-गोदावरी या पूर्ववाही नद्या व त्यांच्या उपनद्यांवरील पानशेत, कावेरी, भवानीसागर यांसारखे अनेक पाट-बंधारे-प्रकल्प या भागात पूर्ण झाले आहेत. विज्ञानयुगाची व वाढत्या लोकसंख्येची गरज भागविणाऱ्या या प्रकल्पांना, 'आधुनिक भारताची तीर्थ-क्षेत्रे' या सार्थ शब्दांत कै. पंडित नेहरूंनी गौरविले आहे. मात्र आधुनिक तंत्र-विज्ञानाच्या बळावर या नैसर्गिक साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या नादात निसर्ग-बंधातील विविध घटकांच्या परस्पर-संबंधाकडे आपले दुर्लक्ष झाले आहे आणि निसर्ग-संपत्तीचा वापर करणाऱ्या ताकदीच्या प्रमाणात निसर्ग-

संपत्ती आपोआप वाढत नाही या साध्या आणि प्राथमिक गोष्टींकडे आपलं दुर्लक्ष झालं आहे, असे डॉ. गाडगीळांचे प्रतिपादन आहे. विकासाच्या नावावर या प्रकल्पांच्या पायन्यात सर्वसामान्य माणसाला गाडलं आहे, याचं त्यांना दुःख आहे !

पश्चिम घाट हा जल-विद्युतप्रकल्प व पाटबंधारे योजनांना अनुकूल भूमी आहे, तशीच या भागातून गुजरात–महाराष्ट्र–गोवा–कर्नाटक–केरळाची अनमोल वन-संपत्ती पसरली आहे. केवळ स्थानिक माणसांच्या गरजा व हितसंबंध नाहीत तर तेथील प्रकल्पांच्या दीर्घारोग्य व तंदुरुस्तीसाठी या वन-संपत्तीचं अनन्य-साधारण महत्त्व आहे. इतकंच नाही तर संपूर्ण राष्ट्राचं पर्यावरण आणि निसर्ग-संतुलन यातही या वन-संपत्तीला महत्त्वाचं स्थान आहे. साहजिकच आपली अपेक्षा अशी की, योजनांच्या सम्यक् आखणीमध्ये या निसर्ग-क्षेत्राचा व निसर्गपुत्रांचाही काळजीपूर्वक विचार झाला असेल; पण दुर्दैवाने वस्तुस्थिती तशी नाही. दूध-योजनांप्रमाणंच याही योजना धरण–कालवे–बोगदे जलवाहिन्या व विद्युत-वाहिन्या, विद्युतनिर्मितिकेंद्रे यांच्या आखणी-उभारणीतच गुंतून राहिल्या; पण ज्याच्या जिवावर हा खेळ मांडला तो निसर्ग आणि सर्वसामान्य माणूस उपेक्षित राहिला !


धरणाच्या बुडित क्षेत्राबरोबरच सरसकट झालेल्या जंगलतोडीमुळे उजाड-उदास झालेल्या पानशेत-मुळशीची हकीकत वर आलीच आहे.

धरण-ग्रस्तांचे पुनर्वसन करताना तर शासकांच्या योजकांच्या दूरदृष्टीची, शहाणपणाची आणि राजकीय धैर्याची कसोटी लागते. धरण-ग्रस्तांचे पुनर्वसन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात वा इतर योग्य जागी करणे सामाजिक न्याय व निसर्गशास्त्रदृष्टया आवश्यक व उचित ठरते; पण सर्वसाधारणतः धरण वा प्रकल्प-ग्रस्त मनुष्य दीन-दुबळा असंघटित असतो. या उलट लाभ-क्षेत्रातील माणूस तुलनेने आर्थिक, सामाजिकदृष्टया बलवान असतो. अंगणात येऊ घातलेल्या गंगेने, त्याच्या आशा-आकांक्षा पल्लवित झालेल्या असतात. अशा माणसाला आपल्याला मिळणाऱ्या लाभातील काही हिस्सा प्रकल्प-ग्रस्ताला दे, असं बजावायला राजकीय हिंमत लागते. स्वतःचं तसं चारित्र्य असावं लागतं. (आपल्याकडे राजकारणी, अधिकारीमंडळी स्वतःच लाभ-क्षेत्रातील जागा पटापट बळकावून बसतात !) तसे घडत नाही. अगदी उत्तमोत्तम कायदे करूनही घडत नाही ! मग मोबदल्याच्या नावे धरण-ग्रस्तांच्या माथी काही रक्कम मारली जाते, अथवा निराधार पाणलोटक्षेत्रातील जमिनीचे तुकडे त्यांच्या तोंडावर फेकले जातात. असहाय्य, अगतिक झालेल्या लोकांना ते स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नसतं. पाणलोटक्षेत्रातील उरले-सुरले जंगल साफ करून हे लोक शेतीच्या प्रयत्नांना लागतात; पण आजवरचा अनुभव असा की, जंगलाचं उच्चाटन केल्यानं पाणलोट-क्षेत्रातील शेतजमिनीची प्रचंड धूप होऊन शेवटी धरणं आणि माणसं अक्षरशः गाळात जातात. भाक्रा-नांगल ते पानशेतपर्यंत या व अशा कारणांनी भारतातील अठरा प्रमुख जलाशयांपैकी एक सोडून सर्व जलाशयांत अपेक्षेपेक्षा तीन ते दहा पट वेगाने गाळ भरत आहे. कोटयवधी रुपये पाण्यात जातआहेत !

कर्नाटकातील इरावती व काळी नदीवरचे जे प्रकल्प पुरे झाले ते झाले; पण जे प्रकल्प सुरू आहेत. ह्याखालीही उत्तर कन्नडातील सुपीक जमीन व सुपारी-मिरी-वेलदोडयांच्या समृद्ध बागा बुडणार आहेत. या भागातील लोकांचा तोच जीवनाधार आहे. आता महाराष्ट्र (चंद्रपूर जिल्हा) आंध्र व मध्यप्रदेशाच्या सीमारेषावरील वनवासी भागात गोदावरीवर इंचमपल्ली व भोपालपटनम् येथे एक प्रचंड धरण होणार आहे. १४६ गावे (त्यातील बहुसंख्य आदिवासी) आणि सुमारे एक लाख हेक्टर जमीन पाण्याखाली बुडणार आहे. यातील निम्म्या भागात बांबू-सागाचे उत्तम जंगल आहे. गोदावरी व तिच्या उपनद्यांवर तुलतुली, लेंढारी, बांधसागर आदि इतर प्रकल्पही होणार आहेत. प्रत्येक ठिकाणी आदिवासी गावं आणि जंगलं पाण्याखाली बुडणार आहेत. हे प्रकल्प नको असं कोणीही म्हणत नाही; पण या धरणांच्या फायद्या-तोटयाचा शास्त्रशुद्ध व सर्वांगीण अभ्यास व्हावा असं डॉ. गाडगीळांचं म्हणणं आहे. कारण आदिवासी आणि जंगलं नेमकी याच भागात असतात; तो इतर समाजाचा दोष नाही तसा या लोकांचाही गुन्हा नाही. अशा या प्रकल्पातून योजनाकारांच्या दाव्यानुसार खरोखर देशाचा विकास घडला असता, रोजगार निर्माण झाला असता तर प्रकल्प-ग्रस्तांची सोय त्यातून सहजासहजी झाली असती. निदान त्यागामध्ये काही सुख तरी लाभलं असतं; पण देशातील एकूण व तुलनात्मक गरिबी झपाटयाने वाढत असल्याने योजनाकारांच्या दाव्याविषयी संशयाला जागा निर्माण होते. राजकारणी लोक, शासकीय अधिकारी, कंत्राटदार यांची हितसंबंधी लॉबी आर्थिक फायदा फुगवतात आणि मानवी, पर्यावरणीय किंमत दडवून ठेवतात असा काही

(पान २८ वर)

# जंगले वाचवा : धोरण आणि वस्तुस्थिती



दीनानाथ मनोहर

भारतातील जंगले झपाट्याने नाश पावत आहेत आणि हा वनविनाश थांबविण्यासाठी तावडतोबीने उपाय करण्याची गरज आणि निकड ही सर्व थरांतील विचारी लोकांना जाणवू लागली आहे. गेल्या काही वर्षांपासून ही समस्या जाणवू लागली होती; परंतु अलिकडच्या काळात जास्त तीव्रतेने काट्याप्रमाणे सलू लागली आहे. वनविभागात पिढ्यान्‌पिढ्या वस्ती करून जीवन जगणारे आदिवासीच केवळ ह्या वनविनाशाला कारणीभूत आहेत, जबाबदार आहेत अशा प्रकारचा समज जाणतेपणी-अजाणतेपणी, आजपर्यंत पसरविला गेला होता. गेल्या काही वर्षांपासून मात्र हा भ्रम दूर होत आहे आणि वनविनाशाला कारणीभूत झालेली इतरही कारणे स्पष्ट होत आहेत. ह्या बदलत्या जाणीवेला दोन बाबी कारणीभूत आहेत. प्रथम महत्त्वाची बाब म्हणजे, ज्या आदिवासींचे जीवन जंगलाशी बांधले गेले आहे, वनविनाशावर नव्हे, वनाच्या अस्तित्वावर ज्यांचे अस्तित्व अवलंबून आहे आणि बेजबाबदार, केवळ पैशाच्या दृष्टीने केलेल्या बेसुमार जंगलतोडीमुळे ज्यांच्या जीवनावर घातक परिणाम होऊ लागला आहे अशा आदिवासींनीच जंगलबचाव चळवळी सुरू केल्या. हिमालयाच्या गढवाल, कुमाऊँ भागातील वनखात्याच्या आणि ठेकेदारांच्या वनविनाशामुळे दरडी कोसळून गावेच्या गावे दगड मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली जाऊ लागली. नाले लवकर कोरडे पडू लागले. हवामान बदलू लागले ही जंगलतोड रोखण्यासाठी आदिवासी स्त्री-पुरुष सज्ज झाले, जंगल तोडायला येणाऱ्या ठेकेदारांच्या कुऱ्हाडी झाडांभोवती मिठ्या मारून त्यांनी अंगावर घेतल्या. चिपको आंदोलन जन्माला आले. झारखंडमध्ये आदिवासींच्या जीवनाला पूरक ठरणारी मोह, बेहडा या सारखी झाडे तोडून पैसा कमावणारी केवळ सागाचीच झाडे लावण्याच्या सरकारच्या धोरणाचा विरोध करण्यास झारखंड भागातील आदिवासी संघटीत ताकदीने उभे झाले.

## ठेकेदारांचा व्यापार

दुसरी बाब म्हणजे वनविनाश थांबवून वनविकास कसा साधता येईल ह्याविषयी तज्ज्ञांनी शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करण्यास, आकडेवारी जमा करण्यास नवीन योजना तयार करण्यास सुरुवात केली तेव्हा वनविनाशाला आदिवासींशिवाय इतर कारणीभूत घटक पुढे येऊ लागले. जंगलखात्याने किंवा जंगलखात्याच्या आशीर्वादाने ठेकेदारांनी केलेल्या वनविनाशाचे प्रमाण स्पष्ट झाले. खाजगी जंगलाच्या तोडीचे निमित्त करून लगतच्या सरकारी जंगलाची चाललेली चोरीही उघडकीस आली. फर्निचरसाठी आणि बांधकामासाठी किंवा कलाकुसरीसाठी उंची, उच्च जातीच्या लाकडाचा होणारा व्यापार उजेडात आला. याचबरोबर पिढ्यान्‌पिढ्या जंगलाच्या सान्निध्यात राहाणारा, जंगलांना जोपासणारा आदिवासी माणूस याच जंगलाचा नाश करू लागला याचे कारण शोधताना वनविनाशामुळे गरीबी आणि गरीबीमुळे वनविनाश हे दुष्टचक्र थांबविण्याची गरज स्पष्ट झाली.

ब्रिटीश सत्तेच्या काळात उद्योगधंद्यांच्या, वाहतूक व्यवस्थेच्या विकासाच्या काळात, स्थानिक लोकांचा विचार न करता, ब्रिटीश शासनाने जंगले आपल्या ताब्यात घेतली. रेल्वेमार्गासाठी, इमारत-बांधकामासाठी, जहाजबांधणीसाठी जंगलांची तोड सुरू झाली. अर्थात १८५६ सालच्या संथाळांच्या उठावाचा अनुभव घेतलेल्या ब्रिटीशांनी जंगलतोडीच्या ह्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवले होते. पण मुळात वनविषयक धोरण ठरवताना, वनविषयक कायदेकानू करताना, वनखाते उभे करताना जंगलाशी ज्याचे अस्तित्व बांधले गेले होते अशा आदिवासी माणसाचा विचार न करण्याचेच धोरण होते. ह्याचे दूरगामी परिणाम केवळ देशाच्या पर्यावरणावरच नाही तर आदिवासींच्या जीवनावर

आणि एकूण लोकमानसावरही झाला. माणूस वजा करून केवळ व्यापारी उद्देशाने ब्रिटीशांनी वनविषयक धोरणे ठरवणे काहीसे नैसर्गिकही होते कारण भारतीय लोकसमुदाय हे ब्रिटीशांच्या दृष्टीने गुलाम नागरिकच होते. यामुळे, लोकांचे आणि जंगलांचे संबंध तुटले. जंगल आणि सामान्य माणूस यांत दूरत्व निर्माण झाले वनखाते आणि सामान्य माणूस यांच्यात विरोधाचे नाते निर्माण झाले.

## भांडवलशाहीचे विषारी पाश

वनसंवर्धन, वनविकास ही मग केवळ वनखात्याचीच जबाबदारी झाली. वनाचे संरक्षण म्हणजे आदिवासींपासून स्थानिक वनाचे रक्षण असा अर्थ प्राप्त झाला. फॉरेस्टगार्डपासून उच्च अधिकाऱ्यापर्यंत नोकरशाहीची उतरंड उभी राहिली. वनविनाशाची प्रक्रिया ही आदिवासीजीवन उध्वस्त होण्याचीच प्रक्रिया असल्याने आदिवासींचे दारिद्र्य वाढतच गेले. भांडवलशाहीचे विषारी पाश हळूहळू ग्रामीण जीवनाभोवती आवळले जाऊ लागले. व्यापाऱ्यांच्या कागदकारखान्याच्या ट्रक्स दऱ्याखोऱ्यांतून वाटा काढीत गावाशी येऊन पोहचल्या. वाढत्या वनविनाशाला आळा घालण्याच्या सबबीखाली वनखात्याच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढत गेली. वनाधिकाऱ्यांचे अधिकार वाढले. आदिवासींचे, स्थानिक लोकांचे प्रथम मान्य केलेले क्षेत्रअधिकार हळूहळू नष्ट झाले. वनातील मूळ रहिवासी चोर आणि वनखात्याचे कर्मचारी मात्र वनाचे रक्षक हा दृष्टिकोण स्वातंत्र्यकाळानंतरही काही बदलला नाही.

दुसऱ्या टोकाला सामान्य माणूसही जंगलापासून दुरावला गेला. वनसंवर्धन, वनविकास ही वनखात्याचीच जबाबदारी. यात आपला, सामान्य माणसाचा काही संबंध नाही असाच सामान्य माणसाची समज झाला. काही वृक्षवेडे सोडले तर सामान्य माणसाचा झाडाशी संबंध म्हणजे जळाऊ लाकडापुरताच उरला. सर्वसामान्यपणे सामान्य माणूस झाडांबाबतीत अडाणीच ! मानवाला या मित्राची ओळख असावयास पाहिजे तशी नाही. ही ओळख, हे ज्ञान वाढावे असा प्रयत्नही झाला नाही. माध्यमिक शाळेत शिकवल्या जाणाऱ्या वनस्पतिशास्त्रातून माणूस व वृक्ष यांच्यातील जिवंत संबंधाची जाणीव अभावानेच दिसते. आजही अशी परिस्थिती आहे की वनसंवर्धन, वनविकास या विषयांवर वनखात्याचीच एकाधिकारशाही आहे. ह्या विषयाचा अभ्यास केवळ वनखात्यातील कर्मचारीच करू शकतात. वनखात्याच्या बाहेरील एखाद्या व्यक्तीला या विषयात अभ्यास करावा असे वाटले तर त्याला काहीही मार्ग नाही. एकाही विद्यापीठात हा विषय नाही. ही परिस्थिती बदलल्याशिवाय, वृक्षाची दाट ओळख झाल्याशिवाय वृक्षांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण होणार नाही.

पण शहरातील माणसाचा विचार बाजूला ठेवला तरी खेड्यापाड्यांत पसरलेल्या ग्रामीण माणसांची मनःस्थिती काय आहे ? शेती करणारा शेतकरी शेताच्या बांधावर झाडे वाढू देण्यास बहुधा तयार नसतो. एवढेच नाही तर असलेली झाडेही तो तोडतो. झाडांच्या सावलीत पिके नीट वाढत नाहीत. झाडांवरील पक्षी पिकांचा नाश करतात. झाडांची मुळे जमिनीचा कस कमी करतात इ. कारणे शेतकरी सांगतात. या विधानांना निश्चितच काही अर्थ आहे. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीव्यवस्थेत झाडांचा उपयोग पूरक उत्पन्न घेण्यासाठी होऊ शकणार नाही का ? पावसाच्या अभावी शेते सुकतात; पण जमिनीत खोल मुळे रुतून उभी असलेली झाडे मात्र टिकतात ही बाब लक्षात घेऊन पिकांवर कमीतकमी दुष्परिणाम करतील अशी झाडे लावणे शक्य नाही काय, याचा अभ्यास झाला पाहिजे.

## झटपट श्रीमंती

याशिवाय शेती करण्यासाठी जंगलजमिनीत, गावठाण-जमिनीत अतिक्रमण करणारा भूमिहीन, शेतीसाठी निकृष्ट असलेली जमीन लागवडीखाली आणतो. या जमिनीवर कष्टाच्या आणि गुंतवणुकीच्या मानाने उत्पन्न येत नाही. यातून भूमिहीनांच्या पोटाचा प्रश्न सुटत तर नाहीच, पण जमिनीचा योग्य उपयोगही घेतला जात नाही; पण दुसरा पर्याय नसलेला व अशा जमिनीचा योग्य तऱ्हेने उपयोग कसा करून घेता येईल याबाबत अज्ञानी असलेला हा भूमिहीन तशीच शेती करीत राहतो, जमिनीची झीज होत रहाते, पर्यावरणावरही परिणाम होत राहतो. गरिबीमुळे हा भूमिहीन आदिवासी जंगलतोड करून मैलोन्मैल चालत जाऊन लाकडाच्या मोळ्या विकतो. गरजेतून न परवडणारा अत्यंत कष्टाचा व्यवसाय करणाऱ्या आदिवासी स्त्रीपुरुषांना सर्व दोष देतात; पण लहान शहरातील मध्यमवर्गीय माणूसच या मोळ्या विकत घेतो. सात-

पुढ्यातील झपाट्याने नाहीशी होणारी वनराजी पाहून हळहळणारा हा सामान्य माणूस स्वस्त मिळतात म्हणून रात्री बारा वाजता बाजारात जाऊन आदिवासींकडून घासाघीस करून मोळ्या विकत घेतो. उच्च मध्यमवर्गीय फर्निचरकरता, इंटीरिअर डेकोरेशनकरिता उंची चोरीचे लाकूड विकत घेतो. चोरीच्या लाकडाचा व्यापार करून माणसे झटपट श्रीमंत होतात.

वनविनाश थांबविणे, वनसंवर्धन व वनविकास करणे ह्या समस्या केवळ वन खात्याच्या नाहीत. या समस्यांचा सामान्य माणसाच्या रोजच्या जीवनाशी भविष्यातील जीवनाशी संबंध आहे ही जाणीव सामान्य माणसाला करून दिल्याशिवाय दुसरा मार्ग नाही, ही जाणीव निर्माण होऊन विकसित होऊन माणसाचे जंगलाशी, वृक्षांशी असलेले नाते बदलले तरच वनविनाश थांबविता येईल. वनसंवर्धन, वनविकासाच्या योजना प्रत्यक्षात येतील या वैचारिक दृष्टिकोनातून सामाजिक वनसंवर्धन (सोशल फॉरेस्ट्री) ही संकल्पना पुढे आली. जंगले आपले आर्थिक भौतिक जीवन सुधारण्यात मदतकारक ठरतात. वनविनाश हा आपल्याच नव्हे आपल्या पुढील पिढ्यांच्या दृष्टीनेही घातक आहे आणि वनसंवर्धन, वनविकास करून आपल्या जीवनात अधिक सुरक्षितता, सुख येऊ शकते असा विश्वास निर्माण झाला तर आदिवासी, सामान्य माणूस जंगलाची काळजी घेईल. लोकांनी, लोकांसाठी, लोकांबरोबर केलेले वनसंवर्धन म्हणजे सामुहिक वनसंवर्धन, साधारण वर्षापूर्वी पंतप्रधानांनी वनविषयक धोरणात सामाजिक वनसंवर्धन ह्या संकल्पनेचे महत्त्व मांडणारे भाष्य केले. तेव्हापासून शासकीय प्रचारयंत्रणेने, वनखात्याच्या प्रवक्त्यांनी हा शब्द उचलला आहे. आधुनिक उद्योगधंद्यांना आवश्यक अशा वनउत्पादनाची वाढ कशी होईल हे बघत असतानाच वनसंवर्धनात आदिवासींचा सहभाग कसा वाढवता येईल ह्या दृष्टीने नवीन योजना पुढे येत आहेत, अशा घोषणा होऊ लागल्या. सामाजिक वनसंवर्धन संकल्पनेविषयी जी जोरदार चर्चा सुरू आहे ती पाहून आता जुने साम्राज्यवादी ब्रिटिशांपासून चालत आलेले धोरण बदलून खरोखरच लोकाभिमुख धोरण वास्तवात येईल. हे धोरण ज्यात प्रतिबिंबित होईल अशा योजना पुढे येतील. आदिवासींची दारिद्र्यातून सुटका करणे व वनसंवर्धन करणे हे दोन्ही अंमलात आणणारे कार्यक्रम आखले जातील आणि वनखात्यातील कर्मचाऱ्यात मुरलेला दृष्टिकोन बदलून वनखाते लोकसमुदायाशी नाते सांगू शकेल असे प्रयत्न सुरू होतील अशी आशा निर्माण झाली. आदिवासींमध्ये कार्य करणाऱ्या संघटना आणि कार्यकर्ते यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

पण 'टेक ऑफ' घेण्याअगोदरच हे रॉकेट कोसळून पडणार काय अशी शंका निर्माण होण्यासारखी परिस्थिती दिसत आहे. या संकल्पनेत प्रत्यक्षरूप देण्याची, नवीन दृष्टिकोन वास्तवात आणण्याची जबाबदारी मुख्यतः वनखात्यावरच टाकण्यात आली असल्याचे दिसत आहे. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांत वनखात्याने खास सामाजिक वनीकरणविभाग सुरू केले आहेत; परंतु वनखात्याची सामाजिक वनसंवर्धन–योजना रस्ते, कालवे यांच्या कडेने झाडे लावण्यातच अडकली आहे. खाजगी जमिनीवर वनीकरणास उत्तेजन देण्याचे, साह्य देण्याचे, भूमिहीन मजुरांना काही एकर जमिनीत झाडे वाढविण्याचे काम देऊन त्याला महिन्याला काही वेतन देऊन पाच–सहा वर्षांच्या शेवटी येणाऱ्या उत्पन्नातून निम्मे उत्पन्न देणारी प्रथमदर्शनी आकर्षक योजना पुढे आली आहे; परंतु या योजनेबाबत थोडासा जरी विचार केला तरी वनखाते जुन्या दृष्टिकोणातून बाहेर पडलेले नाही, हे स्पष्ट होते. आदिवासींना स्थानिक लोकांना वनसंवर्धनाच्या या कार्यक्रमात परिणामकारकरीत्या गुंफण्याचा विचारच त्यांच्या मनात उरत नाही, कृतीत येत नाही.

## अधिक घट्ट पाश

नुकत्याच पुण्यास झालेल्या ग्रामयनच्या चर्चासत्रात या योजनेविषयी वनअधिकाऱ्याने जी माहिती दिली त्याप्रमाणे या विशिष्ट क्षेत्रात या भूमिहीनाने वास्तव्य करून राहिले पाहिजे आणि झाडांचे संरक्षण केले पाहिजे अशी अपेक्षा असल्याचे सांगितले. आणि अशी अपेक्षा करणे योग्यही आहे; परंतु या योजनेचे स्वरूप वनखाते आणि संबंधित भूमिहीन यांच्यामध्ये झालेल्या कराराचे असेल. या कराराप्रमाणे या भूमिहीनाला जबाबदार अधिकारी सांगेल त्याप्रमाणे काम करावे लागेल. तीन वर्षेपर्यंत या माणसास महिना दीडशे रुपये वेतन देण्यात येईल. पांच सहा वर्षांनी येणाऱ्या उत्पन्नात या मजुराचा अर्धा हिस्सा असेल हे खरे पण या अर्ध्या हिश्श्यातून तोपर्यंत झालेला अर्धा खर्चही त्यास द्यावा लागेल. या खर्चात अर्थातच त्यास देण्यात आलेले वेतनही धरले जाणार. झाडांशिवाय या जमिनीतील गवत व इतर उत्पन्न हा भूमिहीन घेऊ

शकतो असे जरी असले तरी अशा प्रकारे जमिनीत काय उत्पादन घ्यावयाचे हे वनाधिकारी ठरवील. या मजुरास याबाबत निर्णय घ्यावयाचा काहीही अधिकार असणार नाही. मजुरांना राबवून घ्यायचे, त्यांच्यावर अविश्वास दाखवायचा, चमचेगिरी करणाऱ्याचाच फायदा करून द्यावयाचा हे ज्याच्या अंगातच मुरले आहे अशा वनअधिकाऱ्याच्या ताब्यात हा माणूस असणार. या कराराप्रमाणे ह्या मजुराचा व्यवहार आहे की नाही हे हा वनअधिकारीच ठरविणार आहे हे लक्षात घेतले तर, पाच–सहा वर्षांनंतर मिळणाऱ्या पैशाच्या आशेने बांधलेला हा मजूर वनखात्याचा वेठबिगारच ठरणार हे स्पष्ट आहे. करार मोडण्याचा गुन्हा मजुराकडून झाला तर अर्थातच वनखात्यावर या कराराच्या अटी बंधनकारक राहणार नाहीत. हे योजनेचे स्वरूप लक्षात घेतले तर योजनेमागील हेतूविषयी शंका निर्माण होते; पण याला वनखातेच केवळ जबाबदार आहे असे म्हणता येणार नाही. लवकरच लोकसभेत मांडण्यात येणाऱ्या वनकायदा १९८० ह्या बिलाचे स्वरूप पाहिले तर शासनाच्या वनविषयक धोरणातही हा नवा दृष्टिकोन प्रतिबिंबित झालेला आढळत नाही. उलट वनखात्याची व्याप्ती वाढविणाऱ्या वनअधिकाऱ्यांना अमर्याद अधिकार देणाऱ्या, वनविषयक गुन्ह्यांना अत्यंत कडक शिक्षेची तरतूद करणाऱ्या आणि वनअधिकाऱ्याच्या कृतीवर कुठलाही अंकुश राहणार नाही अशी सोय करणाऱ्या या बिलात जुनेच ब्रिटिशकालीन धोरण अधिक घट्ट झालेले दिसते. या योजनेचा पूर्ण तपशील निश्चित झालेला नाही हे खरे; परंतु बिलाचे स्वरूप बघितले तर या योजनेत फारसा फरक पडणार नाही हे स्पष्टच आहे. या बिलातील काही तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत. या बिलाचा अभ्यास, त्यावर भाष्य करणे येथे शक्य पण काही महत्त्वाचे मुद्दे बघता येतील.


# वन विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

( महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय )

**सुरगाणा प्रकल्प सुरगाणा**

## जाहीरनामा

जळाऊ मालाचा खालील ठिकाणी नमूद केलेल्या तारखेला होणारा जाहीर लिलाव :

| ठिकाण | जात | अंदाजे परिमाण घनमीटर | लिलाव तारीख | वेळ |
|---|---|---|---|---|
| वणी डेपो<br>ता. दिंडोरी, जि. नाशिक | इंजयली किटा<br>सागी किटा | ७३६५<br>११८५ | ९–९–१९८१ | सकाळी ९–०० वाजेपासून |

टीपः– (१) खरेदीदारास माल खरेदी रकमेच्या १०% एवढी अनामत रक्कम त्याच दिवशी भरावी लागेल. याबाबत कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही सबबीवर सवलत दिली जाणार नाही. अन्यथा खरेदी केलेल्या मालास मंजुरी देण्यात येणार नाही याची खरेदीदाराने दक्षता घ्यावी. (२) लिलावबोली स्वीकृत करण्यात आल्यावर लिलाव घेणाराने लिलावाचे दिवशीच अथवा दुसऱ्या कामाच्या दिवशी ( नेस्ट बँकिंग डे ) लिलावाच्या रकमेच्या १/४ इतकी रक्कम लिलाव रकमेच्या पोटी भरली पाहिजे. (३) लिलावाच्या इतर शर्ती लिलावाचे वेळी वाचून दाखविण्यात येतील. (४) आवश्यकता वाटल्यास दिनांक १०–९–८१ रोजीही लिलाव चालू राहील.

**वनविकास महामंडळ महाराष्ट्र (मर्यादित) करिता**

फॉरेस्ट अॅक्ट सन १९८० असे नामकरण केलेले हे बिल जर आहे त्याच स्थितीत पास झाले तर वनखात्याचे अधिकरक्षेत्र केवळ राखीव वनरक्षित जंगलविभागापुरतेच न राहता ग्रामीण व शहरी सर्वच विभागात विस्तारित होईल. या कायद्याच्या आधारे प्रादेशिक सरकार, सरकारच्या मालकीची नसली तरी कुठलीही जंगलपडीत जमीन आपल्या नियंत्रणाखाली घेऊ शकते. या कायद्याच्या उपकलम ४३ प्रमाणे प्रादेशिक सरकारने सरकारच्या नियंत्रणाखाली घेतलेल्या जमिनीबाबत घेतलेला निर्णय हा कुठल्याही न्यायालयात रद्द केला जाऊ शकणार नाही.

याचबरोबर वनअधिकाऱ्याचे अधिकार वाढविण्यात आले आहेत. उपकलम १११ अनुसार या कायद्याखाली होणारा कुठलाही गुन्हा हा दखलपात्र गुन्हा असेल आणि वनअधिकारी वॉरन्टशिवाय किंवा न्यायाधिशाच्या परवानगीशिवाय संशयित आरोपीस अटक करू शकेल व या आरोपीला विलंब न करता न्यायालयासमोर उभे केले जाईल.

वनअधिकाऱ्याने चांगल्या हेतूने या कायद्याच्या आधाराने केलेल्या कुठल्याही कृत्याविरुद्ध फौजदारी फिर्याद किंवा कुठलीही कायदेशीर कारवाई करता येणार नाही. संबंधित अधिकाऱ्याला बडतर्फ करण्याचा ज्याला अधिकार आहे अशा अधिकाऱ्यांची परवानगी असल्याशिवाय अधिकारपदावरून केलेल्या कृत्याबद्दल कुठलीही फिर्याद त्याच्याविरुद्ध न्यायालयात प्रविष्ट होऊ शकणार नाही. वनअधिकाऱ्यांना हे जे अमर्याद अधिकार दिले आहेत त्यांचा उपयोग कसा होईल याचा अंदाज वनखात्याच्या कारभाराचा ज्यांना अनुभव आहे ते बरोबर करू शकतात.

या कायद्याप्रमाणे ज्याला गुन्हा म्हणता येईल अशा बाबी पाहिल्या तर जंगलातील झाडाच्या जवळपास जाणेदेखील धोक्याचे ठरेल. झाडाची पाने, फळे, फुले गोळा करणे, डिंक, मध, मोहाची फुले, बिया गोळा करणे, गवत कापणे, बकऱ्या चारणे, पडित जमिनी लागवडीखाली आणणे या व अशा गुन्ह्यांना एक वर्षपर्यंत तुरुंगवास, व किंवा एक हजार रुपयेपर्यंत दंड होऊ शकतो. या तरतुदीचा अर्थ वास्तव व्यवहारात काय होणार हे स्पष्ट आहे. दारिद्र्यामुळे जंगलपट्टीचे जे स्त्रीपुरुष आदिवासी जंगलातून लाकडे तोडून शहरात विकावयास आणीत असतील त्यांना पकडून कोर्टात हजर करण्याची धमकी दिली तर इतकी दीर्घकाळ सजा भोगण्याच्या भीतीने कदाचित वनउत्पादनाच्या चोऱ्यांचे प्रमाण कमी होईल; परंतु पर्यायी उद्योगाच्या अभावी इतर गुन्हेगारीच वाढण्याची शक्यता आहे. आदिवासींची स्थिती सुधारण्यासाठी शासकीय पातळीवर जे काही प्रत्यक्ष प्रयत्न आणि प्रचंड प्रचार होत आहे आणि त्यातून आदिवासी, नागरिक जीवनात परत येण्याची जी शक्यता निर्माण झाली आहे तिलाच खिळ बसणार आहे.

ग्रामीण भागतील सर्वसामान्य माणसाला, शेतकऱ्यांना, धंदेवाल्यांना, नोकरदारांना इंधनाच्या टंचाईमुळे कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. मुंबई–पुणेसारख्या ठिकाणी गॅसचा पुरवठा तरी होऊ शकतो; पण ग्रामीण भागात जळाऊ लाकडाला ताबडतोबीचा पर्याय नाही. हा कायदा वास्तवात येण्याने जळाऊ लाकडाचे भाव प्रचंड प्रमाणात वाढतील यात काहीच शंका नाही. शासनाने इंधन पुरवठा करण्याची जबाबदारी घेतली नाही आणि ती व्यवस्थित पार पाडली नाही तर ग्रामीण भागातील सामान्य माणसाच्या दुर्दैवाला मर्यादा रहाणार नाही.

## अमर्याद अधिकार नको

एकूण येणाऱ्या वनकायदा १९८० बिलाची आखणी करताना किंवा तथाकथित सामाजिक वनसंवर्धनाच्या योजना तयार करताना ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा वनकायदा वनखात्याची रचना करताना आखलेला दृष्टिकोन बदलला नाही असेच दिसते. लोकसमुदाय आणि वनसंवर्धन हे परस्पर विरोधात आहेत, हा दृष्टिकोनच या बिलाचा आधार आहे. ह्या घातक दृष्टिकोनाचा त्याग करून जंगल व माणूस यांना जवळ आणणारा, वनखाते व सामान्य माणूस ह्यात एका नव्या पातळीवर संबंध निर्माण करणारा नवा दृष्टिकोन अंमलात आणणे गरजेचे आहे. लोकसमुदाय आपला सामूहिक हिताचा विचार करून कृती करतो अशी अपेक्षा करणे हा स्वप्नाळूपणा असेल पण कडक कायदे करून नोकरशाहीला जास्तीत जास्त अधिकार देऊन नोकरशाहीकडून लोकसमुदायांना शिस्तीचा बडगा दाखवून हे साधणार नाही हे निश्चित. शासनाला लोकाभिमुख धोरण चालवायचे असेल तर लोकांच्या मनात शासनाबाबत विश्वास निर्माण झाला पाहिजे हे जसे आवश्यक आहे तसेच शासनाने लोकांवर विश्वास

ठेवणे हेही गरजेचे आहे. केवळ नोकरशाहीवर भरवसा ठेवून विकासाचे कार्यक्रम राबविण्याच्या प्रयत्नाचा परिणाम काय होतो याचा अनुभव जनतेने नुकताच घेतला आहे. कुटुंबनियोजन असो, वनसंवर्धन असो, पाण्याचे नियोजन असो वा शेतीउत्पादन व्यवस्थेचे नियोजन असो, कायद्याचा बडगा उभारून नोकरशाहीच्या हातात अमर्याद अधिकार देऊन हे साधणार नाही. याशिवाय वनकायद्याचा विचार केला तर इतर मार्गांनी आदिवासी विकासाचे जे प्रयत्न इतर शासकीय खात्यांकडून होत आहेत त्या प्रयत्नाला वनखात्याला अमर्याद अधिकार दिल्याने बाधाच येईल असे दिसते.

लोकांचे शिक्षण करून, लोकांची मदत घेऊन, लोकांवर जबाबदारी टाकून, त्यांचाही थोडाफार भौतिक फायदा होईल अशा प्रयत्नांनीच खरे वनसंवर्धन साधता येईल. सामूहिक वनसंवर्धनाच्या संकल्पनेस साजेसे धोरण प्रतिबिंबित होईल असेच कार्यक्रम राबवून वनविनाशाला आवर घालता येईल.

कायदा आणि नोकरशाही यांच्यावर भरवसा की लोकशिक्षण आणि लोकांचा स्वेच्छेचा सहभाग हे दोन पर्याय शासनापुढे असतील. कदाचित आताचा शासनकर्ता पक्ष पहिल्या पर्यायावरच भरवसा ठेवीत असेल तर लोकशाही स्वातंत्र्याच्या, जनतेच्या सामूहिक हिताच्या आणि देशाच्या भविष्याच्या दृष्टीने घातकच आहे. यासाठी लोकमताचा दबाव शासनावर आणणे गरजेचे ठरणार आहे.


## आदिवासींचा सहभाग महत्वाचा

बुद्धिवादी वर्गाने याबाबत सतत जागरूक राहिले पाहिजे. राजकीय पक्षकार्यकर्त्यांनी पक्षाच्या चौकटीबाहेर जाऊन दूरगामी दृष्टीने या बिलाचा चिकित्सकपणे अभ्यास केला पाहिजे. आदिवासींमध्ये कार्य करणाऱ्या सर्व संघटनांनी, आदिवासी पुढारी यांनी व आदिवासी कार्यकर्त्यांनी अस्तित्वात असलेल्या वनखात्याचे स्वरूप काय आहे, वनअधिकाऱ्याचा आदिवासींकडे पहाण्याचा दृष्टिकोन आणि असंघटित मूक, अडाणी आदिवासींच्या जीवनावर या कायद्याचा होणारा परिणाम लक्षात घेऊन या कायद्याचे रूप बदलण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक वनसंवर्धनाच्या मूळ दृष्टिकोनाला अनुरूप अशा योजना प्रत्यक्षात आणून आदिवासींना वनसंवर्धनात खऱ्या अर्थाने सहभागी करून घ्यावे. ●

With
best
compliments

Mehata Agencies
Sangli

# वन आणि आदिवासी अर्थव्यवस्था



ब्रह्मदेव शर्मा

आदिवासी प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या, त्यामागील व्यापक सैद्धान्तिक जाण असणाऱ्या व प्रामुख्याने ते प्रश्न सोडविण्याची कळकळ असणाऱ्या व्यासंगी सरकारी अधिकाऱ्यांमध्ये डॉ. बह्मदेव शर्मा यांचे नाव गौरवाने घेतले जाते. बस्तरचे जिल्हाधिकारी, केन्द्रीय गृहखात्यातील आदिवासी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव व मध्यप्रदेश सरकारचे आदिवासी आयुक्त म्हणून त्यांनी आदिवासी विकास नियोजनात महत्त्वाचा वाटा उचलला आहे.

(डॉ. ब्रह्मदेव शर्मा यांच्या 'आदिवासी विकास : एक सैद्धांतिक विवेचन' या हिंदी भाषेतील ग्रंथातील 'वन, आदिवासी अर्थव्यवस्था तथा क्षेत्रीय विकास' या प्रकरणाचा अनुवाद. सदरहू ग्रंथ इंग्रजी भाषेतही Tribal Development, the concept and the frame' या नावाने उपलब्ध आहे. हिंदी आवृत्ती, मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, भोपाळ येथे व इंग्रजी आवृत्ती प्राची प्रकाशन, पो. बॉ. नं. ३५३७, नवी दिल्ली ११००२४ येथे मिळेल.)

## विषयाची पार्श्वभूमि

आदिवासींचे आर्थिक जीवन त्यांच्या सभोतालचे जंगल आणि त्या जंगलाचे अर्थशास्त्र ह्यांच्याशी पूर्णपणे निगडित असते. आदिवासी आणि जंगले यांमधील ह्या परस्पर संबंध आता मान्य झाला आहे; पण ही जाण आदिवासींच्या विकासाच्या योजना आणि धोरणे यामध्ये प्रतिबिंबित झालेली दिसत नाही. आदिवासींची अर्थव्यवस्था आणि जंगलांचे अर्थशास्त्र यांमधील बिसंवाद दिवसेंदिवस वाढताना दिसतो आणि त्याचा अनिष्ट परिणाम आदिवासींच्या जीवनावर आणि जंगलाच्या सुयोग्य विकासावर होतो.

या परिस्थितीमुळे काही ठिकाणी वनसंपत्तीचे अतोनात नुकसान झाले आहे, तर काही ठिकाणी आदिवासींचे आर्थिक जीवन उध्वस्त झाले आहे. परिणामतः आदिवासी व बिगरआदिवासी लोकांच्या आर्थिक, सामाजिक जीवनपद्धतीतील तफावत वाढली आहे. हे टाळावयाचे असेल तर आदिवासींच्या आर्थिक-सामाजिक जीवनप्रवाहात बदल घडवून आणणाऱ्या घटनांचा व त्यांचा विकासावर होणाऱ्या परिणामांचा लवकरात लवकर बारकाईने अभ्यास होण्याची नितांत आवश्यकता आहे. जंगलांची सुयोग्य जोपासना व त्यांचा जास्तीत जास्त किफायतशीर उपयोग करण्याच्या दृष्टीने धोरणांची आखणी करताना व आदिवासींची आर्थिक उन्नति साधण्याकरता अशा अभ्यासाची खूपच मदत होईल.

'आदिवासी आणि जंगले' या परस्पर संबंधाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू लक्षात घ्यायला हवा. जंगल विभागात वस्ती तुरळक असते आणि अशा

प्रदेशात इतर जमातींच्या मानाने आर्थिक दृष्टया मागासलेले आदिवासीच बहुधा वास्तव्य करतात. परिणामी येथे मुबलक नैसर्गिक साधनसामग्री उपलब्ध असूनही हे विभाग इतर क्षेत्राच्या तुलनेत अविकसित असतात. या विभागांच्या विकासाला गती द्यायची असेल तर आदिवासींतील सुप्त शक्तींना संपत्तीच्या कामाला जुंपले पाहिजे. असे करताना आपल्याला एका शृंगापत्तीला सामोरे जावे लागेल. कुशल कामगारांची आयात, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आणि भांडवलप्रधान तंत्रज्ञान इत्यादि मार्गांचा अवलंब करून आणि आदिवासींच्या आर्थिक जीवनपद्धतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून वनविभागांचा आर्थिक विकास जलद गतीने साधता येईल. या प्रक्रियेत आदिवासींना आपल्या जीवनात आवश्यक ते बदल घडवून बदलत्या परिस्थितीशी मिळते घ्यावे लागेल. जंगलविभागात विखुरलेल्या भिन्न ठिकाणी वरील पद्धतीचा अवलंब करणे किंवा या विभागाच्या एखाद्या लहानशा क्षेत्रात अत्यंत अवाढव्य अत्याधुनिक कारखाना काढणे या दोहोंचा आदिवासींच्या जीवनक्रमावर होणारा परिणाम जवळपास सारखाच असेल. स्थानिक नैसर्गिक साधनसामग्रीचा उपयोग करून आणि आधुनिक तंत्रावर आधारित लघुउद्योगांचा अवलंब करून या क्षेत्रांचा विकास साधताना नवीन कल्पना आत्मसात करण्याच्या आदिवासींच्या अपरिमित क्षमतेचे भान ठेवणे, तसेच आदिवासींचे आर्थिक व्यवहार आणि औद्योगिक अर्थशास्त्र यांची योग्य सांगड घालणे अत्यंत आवश्यक आहे. नाही तर अत्याधुनिक अवजड उद्योग आदिवासीभागात सुरू केल्याने आदिवासींच्या जीवनावर जे दूरगामी, हानिकारक परिणाम होतील तसेच परिणाम लघुउद्योगांच्या मार्गाने गेल्यासही अटळ आहेत. हे परिणाम आमजनतेचे लक्ष वेधून घेणार नाहीत. कारण हे नाट्य दुर्गम अशा मागासलेल्या भागात झालेले असेल. तसेच प्रत्येक लहान भागाच्या आर्थिक जीवनावर झालेला घातुक परिणाम त्या भागाच्या दृष्टीने जरी अत्यंत महत्त्वपूर्ण असला तरी एकंदर राष्ट्राच्या संदर्भात तो नगण्य असेल.

## मानव आणि वन यातील बदलते संबंध

(१) अगदी आरंभीचा काळ : मानवाचा इतिहास, निसर्गाशी व प्राधान्येकरून त्याच्या भोवतालच्या वनाशी असलेल्या संबंधात वेळोवेळी होणाऱ्या बदलांशी निगडित आहे. ज्याप्रमाणे निसर्गाचा घटक असणारे प्राणिमात्र निसर्गामध्ये उपलब्ध असलेल्या वस्तूंवर किंवा निसर्गोत्पादनावर पोसणाऱ्या प्राण्यांच्या जीवनावर अवलंबून असतात तसाच मानवसुद्धा निसर्गाचाच एक घटक आहे. मानवाच्या या पशुसम जीवनाचा हळूहळू विकास होत जाऊन त्याने अन्न साठवून ठेवणे व शिकार ह्या कला आत्मसात केल्या. ह्या प्रगत अवस्थेतसुद्धा तो पूर्णत: जंगलांवरच अवलंबून होता आणि त्याच्या परिसरातील निसर्गाचाच घटक होता. त्याच्या विकासाच्या या टप्प्याचे वैशिष्टय हे की, स्वत:साठी निसर्गसंपत्तीचा पुरेपूर उपभोग घेऊन सुद्धा तो पर्यावरणाचा समतोल बिघडू न देण्याची खबरदारी घेत असे. उलटपक्षी निसर्गसुद्धा एखाद्या प्रेमळ मातेप्रमाणे मानवाच्या जीवनाला हातभार लावीत असे.

(२) सुरुवातीचा जीवनकलह : अन्न गोळा करणे व शिकार याबाबतीत मानवाने जसजसे कौशल्य प्राप्त केले तसतशी निसर्गसंपत्तीचा उपभोग घेण्याची त्याची भूक वाढत गेली. कालांतराने त्याची लोकसंख्या इतक्या वेगाने वाढली की, त्या वेगाने नष्ट होणाऱ्या नैसर्गिक संपत्तीची भरपाई करणे निसर्गाला अशक्य झाले. त्याला अन्न पुरवणाऱ्या वनस्पती निवडून त्यांचे तो संवर्धन करू लागला. तसेच त्याने आपल्याला उपयुक्त अशा पशूंकडे जास्त लक्ष देऊन त्यांचे संगोपन करण्यास सुरुवात केली. प्रगतीच्या या टप्प्यावर मानवी अर्थव्यवहाराचा शेती हा एक आधार ठरला आणि शेतीकरता जंगले तोडून मोकळी जागा निर्माण करणे आवश्यक झाले. शेतीच्या तंत्राच्या बाल्यावस्थेत उत्पन्न कायम ठेवण्याकरता मानवाला शेतीचे क्षेत्र सतत बदलत राहावे लागले. तीच तीच जमीन एक वर्षाहून अधिक काळ शेतीयोग्य ठेवण्याकरता तो झाडे जाळून त्यांची राख शेतात पसरी.

## अर्थव्यवस्थेचा दुसरा आधार पशुधन

शेती, दूधदुभते व मांस याकरता तो आता मोठ्या प्रमाणावर जनावरे पाळू लागला होता. त्यांच्या उदरनिर्वाहाकरता त्याला कुरणांची मोठ्या प्रमाणावर गरज भासू लागली. अशा मर्यादित स्वरूपांच्या सुधारणांच्याद्वारे मानवाने निसर्गावर मात करण्याच्या त्याच्या मार्गात येणाऱ्या अडचणींची कोंडीच जणू फोडली होती. आता तो उपलब्ध जमिनीतूनच पूर्वी-

पेक्षा किती तरी पट जीवनोपयोगी वस्तू निर्माण करू लागला होता.

(३) प्रथमःवस्थेतील शेती : सुरुवातीला सतत स्थलांतरित शेतीपद्धतीचा वनसंपत्तीवर लक्षणीय दुष्परिणाम झाला नाही. पूर्वीसुद्धा जंगलात निरनिराळी झाडे, त्यांच्या ठराविक आयुष्यमानानुसार निरनिराळ्या वयांत नैसर्गिकरीत्या मरत असतच आणि आता मानव शेतीकरता जागा मोकळी हवी म्हणून सरसकट त्यांची कत्तल करू लागला. अशा तऱ्हेने त्याला जणू स्थलांतरित शेतीकरता अमर्याद क्षेत्र उपलब्ध होते. त्याच्या ह्या उपक्रमाला तेव्हाच निर्बंध पडे, जेव्हा त्याची दुसऱ्या बाजूने अशाच तऱ्हेने जंगले कापीत येणाऱ्या दुसऱ्या मानवसमूहाशी गाठ पडे. इथे मात्र त्याला परतण्याशिवाय गत्यंतर नसे व पूर्वी साफ केलेली जमीन आलटूनपालटून वापरणे त्याला भाग पडे. जसजशी त्या समूहातील लोकसंख्या वाढत गेली, व उपलब्ध जमिनीवर मर्यादा पडल्या तसे त्याला तीच जमीन कमी कालांतराने पुन: शेतीकरता वापरणे भाग पडू लागले.

स्थलांतरित शेतीपद्धत सुरू होण्यापूर्वी आदिवासी वनोत्पादनावर उपजीविका करी आता तो वने नष्ट करून जगू लागला. स्थलांतरित शेतीचे कालचक्र ज्या प्रमाणात संकुचित होते त्याच प्रमाणात तेथील वनसंपत्तीचा ऱ्हास होत जातो. शेवटी हे कालचक्र इतके लहान होते की, जमिनीची पूर्ण धूप होऊन पूर्वी हिरवीगार जंगले असलेल्या ठिकाणी आता केवळ दगड-गोटे, गारगोटचा दिसतात. ओरिसाच्या कोरापूर जिल्ह्यात हे दृश्य जागोजागी पहावयास मिळते.

स्थलांतरित शेतीचा सतत वाढत्या प्रमाणावर अवलंब करून वनांचा पूर्ण विध्वंस करण्याच्या सापळ्यात सगळ्याच जमाती सापडल्या नाहीत. शेतीतंत्रविकासाच्या एका टप्प्यावर त्याला प्राण्यांच्या सहाय्याने जमीन खोल नांगरण्याच्या तंत्राचा शोध लागला. या नव्या शोधाचा उपयोग फक्त मर्यादित वनक्षेत्रातच झाला व अशा भागात तो स्थिर शेती करू लागला. अन्नधान्यांची गरज मात्र सतत वाढतच राहिली. त्यामुळे उदरनिर्वाहाच्या इतर गरजा पूर्ण करण्याकरता त्याला वनोत्पादनावरच अवलंबून रहावे लागे. शेतीमध्ये अशी प्रगती झाली असली तरी, वाढत्या लोकसंख्येचा दबाव, वनोत्पादनाची उपलब्धता शेतीतंत्रातील त्याच्या प्रगतीची अवस्था इत्यादी मर्यादांमुळे त्याला अजूनही अन्न गोळा करणे, शिकार आणि लहान प्रमाणावर स्थलांतरित शेती ह्या पुरातन मार्गांचा थोडचा-फार प्रमाणावर वापर करावाच लागे.

**स्थानिक शेती :** जसजशी लोकसंख्या वाढत गेली तसतसे शेतीतंत्र प्रगत होत गेले आणि जंगलाना मानवी जीवनात गौण स्थान प्राप्त झाले. वाढत्या क्षेत्रावर स्थिरपणे शेती करणे शक्य झाल्यावर भिन्नभिन्न प्रकारची पिके घेणे शक्य झाले. दळणवळणाची साधने वाढल्यावर स्थायिक झालेल्या जमातींना आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे काही विशिष्ट पिकांवर लक्ष केन्द्रित करणे शक्य झाले. कारण आपल्या इतर गरजा शेजारच्या जमातींनी उत्पादन केलेल्या वस्तूंची आपल्या वस्तूंशी अदलाबदल करून ते भागवू शकत. अशा प्रगत जमाती जंगलांचा उपयोग, गुरांना चारा, जळाऊ लाकूड व इतर किरकोळ बाबीपुरताच करीत. पुढे अशा उपयोगी झाडांची लागवड या जमाती आपल्या वस्तीजवळच किंवा शेतात करू लागल्यामुळे जंगलाशी संबंध कमी कमी होत गेला.

**शेती न करणारे लहान जनसमूह :** मानवी विकासाचा पुढील टप्पा म्हणजे प्राथमिक अवस्थेतील नागरीकरण. विखुरलेल्या ग्रामीण वस्त्यांच्या अवतीभोवती काही विशिष्ट उद्योग किंवा सेवा यांत प्राविण्य मिळवून त्याच्या मोबदल्यात जीवनावश्यक वस्तू निर्माण करणारे लोक तयार झाले. जनसमूह बसले. त्यामुळे पूर्वी जंगलावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहाणाऱ्या याच लोकांचा आता जंगलाशी प्रत्यक्ष संबंध नाम मात्रच राहिला. फक्त काही विभागात तो जळाऊ लाकडापुरता मर्यादित झाला. त्यांचे जंगलावरील अवलंबित्व कमी होत गेले.

---

## घाई

सुखाच्या शोधा पायी
मानवा
तुला झाली आहे घाई
अन् म्हणून
सोन्याच्या अंड्यावाल्या
कोंबडीलाच ( वृक्षालाच ) तूं
खाई ॥

---

**यंत्रयुगातील मानव :** मानवी प्रगतीचा शेवटचा टप्पा म्हणजे प्रगत नागरी आणि यंत्र–उद्योगप्रधान समाज. ह्या समाजांची रचना शिस्तबद्ध असते आणि त्यात प्रत्येक घटकाचे विशिष्ट कार्यक्षेत्र असते. अशा समाजरचनेत जंगलांना पोलादकारखान्याप्रमाणेच एक विशिष्ट मर्यादित स्थान असते. पोलादाचा कारखाना फक्त पोलाद निर्माण करतो त्याप्रमाणे जंगले इतर नित्योपयोगी वस्तूबनवण्याकरता लागणारा कच्चा माल पुरवतात. यंत्रयुगातील मानवाला त्याच्या उपयोगाच्या वस्तू जंगलातील कच्च्या मालापासून तयार झाल्या आहेत की अन्य कुठल्या वस्तूंपासून यात स्वारस्य नसते. ह्या जंगलचा कच्चा माल क्वचित स्वदेशात पैदा झालेला असेल तर कधी आयात केलेला असेल. या नव्या माणसाला जंगलाच्या महत्त्वाबद्दल जाणीव निर्माण होण्याकरता पर्यावरणातील असमतोलामुळे एखादी मोठी सामाजिक स्वास्थ्यविषयक समस्या निर्माण व्हावी लागते. यंत्रयुगातील रटाळ जीवनाचा कंटाळा आला की, फक्त विरंगुळ्याचे एक साधन म्हणूनच त्याला जंगलाची आठवण येते.

**मानवी प्रगतीचे दोन टप्पे :** मानवाच्या, प्राथमिक अवस्थेकडून यंत्रयुगीन अवस्थेकडे विकसित उत्क्रांत होणाऱ्या जीवनप्रवासाचे सिंहावलोकन केल्यास असे आढळते की, मानवाचा सुरुवातीचा जंगलांशी असलेला प्रत्यक्ष संबंध हळूहळू नष्ट होऊन तो अप्रत्यक्ष आणि प्रासंगिक स्वरूपाचा होतो. ह्या उत्क्रांतीच्या६टप्प्यांच्या प्रमुख अवस्था कल्पिता येतील (१) टोळचा टोळचांनी राहणारा आणि (२) नागरी मानव. ह्या बदलातून जात असताना प्रत्येक टप्प्याच्या शेवटी मानवाच्या जंगलावरील विसंबून राहण्याच्या प्रमाणात सतत फरक पडत जातो. स्थूल मानाने असे म्हणता येईल पहिल्या तीन टप्प्यांपर्यंत तो टोळचाटोळचांनी राहण्याच्या अवस्थेत असतो. ४ थ्या टप्प्याच्या वेळी टोळीची जागा लहान नागरी समाज घेतात आणि त्याचा जंगलांशी असलेला संबंध खूपच कमी होतो. समाज तथाकथित प्रगत जीवनाच्या दुसऱ्या अवस्था म्हणजे स्थिर शेतींच्या अवस्थेला पोहोचले की त्यांचे जंगलाशी नाममात्र नाते उरते.

तिसरा टप्पा म्हणजे अप्रगत स्थलांतरित शेती आणि चौथा म्हणजे स्थायि शेती ह्या टप्प्यांमध्ये पुष्कळ सधर्म्य आहे आणि त्या दोघांमधील सीमारेषा अस्पष्ट आहे. तिसऱ्या टप्प्यावरील काही टोळचा छोटचा नागरी समाजाची काही वैशिष्टचे आत्मसात करतात तर काही नागरी समाजांमध्ये टोळीबद्ध समाजाची काही वैशिष्टचे आढळून येतात. नागरी समाजाच्या तीन टप्प्यामध्ये ते समाज निव्वळ जंगलाच्या जवळ आहेत यावरून त्यांचे जीवन जंगलाशी निगडित आहे असे म्हणता येणार नाही. एखादा अवजड उद्योग समूह घनदाट अरण्यात असेल पण तेथील समाज पूर्णत: दूर जंगलातील संपत्तिपासून स्वावलंबी असून जंगल हे त्याला निव्वळ एक बाग किंवा रुचिपालटाचे साधन असेल. उलटपक्षी अगदी अप्रगत टोळचांच्याबाबत सुद्धा जसजशी वनसंपत्ति नष्ट होत जाते तसतसा त्यांचा जंगलाशी जीवनासाठी संबंध कमी कमीच होत जातो. शेवटी फक्त लोककथा, कर्मकांड, समारंभ अशा प्रसंगीच जंगलांची आठवण अशा मानवाला होते.


## प्रशासकीय वैधानिक चौकट

आधुनिक काळात भिन्नभिन्न प्रकारच्या परस्पर संबंधांची कायदेशीर व्याख्या करण्याची पद्धत आहे. मनुष्य आणि जंगले ह्यांचे परस्पर संबंधही, मानवीसमाज प्रगत होत जाईल तसे बदलत जातील. ह्या बदलत्या संबंधांना सामाजिक–आर्थिक संबंधांच्या संदर्भात नियमांच्या चौकटीत बसवणे क्रमप्राप्त ठरते. हे संबंध जंगलांच्या मालकीबद्दलच्या तीन स्वतंत्र संकल्पनांवर आधारित असतात.

## समायिक मालकी

मानवी प्रगतीच्या सुरुवातीच्या काळात प्रत्येक मानवसमूहाची त्याच्या उपयोगातील जमिनीवर व जंगलावर सामाजिक (सामूहिक) मालकी असे. जेव्हा तो त्याच्या परिसरातील निसर्गाचा एक घटकच होता तेव्हा ‘मालकी’ची संकल्पना विशेष स्पष्ट नव्हती आणि त्याच्या मालकीची परिणामकारकता जंगले वापरणाऱ्या त्याच्या इतर घटकांवरील प्रभुत्वाच्या प्रमाणात असे. लोकसंख्येचा दबाव वाढत गेला तसतशा प्रत्येक समूहाने आपआपल्या हक्काच्या क्षेत्राच्या मर्यादा निश्चित केल्या. अधिक मागासलेल्या भागात निश्चित क्षेत्रावरील स्वामित्वाकरता भांडणे अजूनही क्वचित् होतांना दिसतात. हजारो वर्षे हळूहळू विकसित होत गेलेली ही सामूहिक मालकीची संकल्पना ईशान्येकडील काही क्षेत्रात अजूनही कायद्याने मान्य केलेली आढळते.

आधुनिक अर्थव्यवस्था व्यवहारात आल्यापासून



जंगले ही शासनाचे एक महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन ठरली आहेत. सुरुवातीच्या काळात जंगलांचा व्यापारी-दृष्टया वापर करताना शासन स्थानिक लोकांचे त्यावरील हक्क पूर्णपणे नाकारित नसे व जंगलावर एकाधिकार सांगत नसे. जोपर्यंत त्यांच्या हितसंबंधांना लक्षणीय बाधा आली नाही तोपर्यंत अशा व्यवस्थेला आदिवासींनी हरकत घेतली नाही. बस्तरच्या जंगलातील 'साल' वृक्ष लोहमार्गासाठी स्लीपर पुरवण्याकरता मोठ्या प्रमाणावर तोडले जात असताना स्थानिक आदिवासींनी मुळीच हरकत घेतली नाही. कारण साल वृक्षाचा त्यांना दैनंदिन जीवनात तसा विशेष उपयोग नव्हता. अजूनसुद्धा दुर्गम वनक्षेत्रात आदिवासी लोक मौल्यवान साल वृक्षांचा कुंपण घालण्यासारख्या क्षुल्लक कामाकरता उपयोग करतात. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत सागाच्या वृक्षालासुद्धा विशेष किंमत नाही आणि म्हणून त्यांच्या परिसरातील जंगलातून शासनाने अथवा इतर कोणी सागाची झाडे तोडून नेली तर त्याचा त्यांच्या जीवनावर काहीही परिणाम होणार नसल्यामुळे तो त्या विरुद्ध आरडाओरड करणार नाही.

### शासनाचे स्वामित्व

जव्हा शासन सातत्याने उत्पन्न मिळवण्याचे एक साधन म्हणून जंगलांचे दीर्घ कालाकरता योजनाबद्ध संवर्धन करण्याचा विचार करू लागते तेव्हा आदिवासी त्यांच्या दैनंदिन गरजांकरता जंगलांचा जो विविध प्रकारे उपयोग करतात ती गोष्टही शासनाला खटकू लागते. मग शासन आदिवासींच्या उपभोगावर निर्बंध घालते आणि येथूनच संघर्षाला सुरुवात होते. कारण आदिवासींच्या मते हे त्यांच्या हक्कांवर अतिक्रमण असते. शासन आपला हक्क कायदे करून स्थापित करते. अशा परिस्थितीत गेल्या दोन शतकांत कित्येक आदिवासी क्षेत्रात शासनाविरुद्ध बंडे झाली. ह्या संघर्षात आदिवासी संख्येने कमी असल्यामुळे त्यांना शासनापुढे हार पत्करावी लागली. असे असले तरी आदिवासींच्या हक्कांच्या बाबतीत थोडीशी तडजोड जंगले आरक्षित करण्यासंबंधीच्या नियमात मान्य करण्यात आली आहे. ईशान्य भागात आदिवासींचे जंगलावरील अनिर्बंध हक्क मान्य करण्यात आले आहेत तसे मध्यभारतात मान्य करण्यात आले नसले तरी अशी अलिखित तडजोड मान्य करण्यात आली आहे की, सरकारी तिजोरीला उत्पन्न मिळवण्याकरता जंगलतोड करताना आदिवासींच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होऊ न देण्याची खबरदारी घेतली जाईल. आदिवासींची पारंपरिक अर्थव्यवस्था आणि जंगलांची निसर्गजन्य स्थिती ह्यामधील परस्पर संबंधांचे मूल्यमापन करण्याकरता न्यायपद्धतीशी समांतर कार्यपद्धती आखून देण्यात आली. ह्या संबंधांत आदीवासींचे 'हक्क' मान्य करून ते पाळण्याचे शासनावर नैतिक बंधन आहे असे मानले जाते आणि जंगलापासून अर्थोत्पादन करताना आदिवासींच्या अर्थव्यवस्थेला धक्का बसणार नाही ह्याची शासनाला काळजी घ्यावी लागते. ह्या हक्कांना कायदेशीर स्वरूप देण्याच्या बाबतीत मात्र निरनिराळया पद्धती अवलंबिलेल्या आढळतात. कुठे यांना सवलती म्हटले जाते तर कुठे यांना हक्क म्हणून मान्यता दिली जाते.

**विधिबद्ध संस्थेची मालकी :** वनसंपत्तीचा सघन अर्थोत्पादनाच्या उद्देशाने वापर करण्याकरता भिन्न वित्तीय संस्थाकडून भांडवल उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जंगलाच्या मालकीची एक नवीनच संकल्पना विकसित होत आहे. ह्या कल्पनेमध्ये एखाद्या विशिष्ट मर्यादित

क्षेत्रात प्राविण्य असणारी विधिबद्ध संस्था अभिप्रेत असते. ही संस्था जंगलात केवळ अर्थोत्पादनाच्या साधनसंपत्तीचे भांडार मानते आणि नवीन लागवडी-कडे केवळ आर्थिक दृष्टीकोनातून पहाताना स्थानिक अर्थव्यवस्थेकडे पूर्णपणे डोळेझाक करते. अशा संस्थे-कडून काही काळाकरता आदिवासींना त्याला लाग-णाऱ्या जंगलातील वस्तू सवलतीच्या किंमतीत दिल्या-जातात पण नवीन पद्धतीला असे करणे हा प्रशासन-व्यवस्थेतील एक अडसरच वाटतो. कारण सर्व संबंध कायदेकानूने बांधणे ह्या पद्धतीला मानवते.

अशा रीतिने जंगलाच्या स्वामित्वात हळूहळू पण निश्चित फरक पुढील क्रमाने पडत गेला :—

१) जंगलावर प्रत्यक्ष मालकी आदिवासींची असली तरी त्याचा आर्थिक उत्पादनाकरता वापर, मालकी हक्काचा आग्रह धरल्याशिवाय, शासन करू शकत असे.

२) मग शासनाने स्वतःचा कायदेशीर मालकी हक्क प्रस्थापित केला व कुठे आदिवासींना एका ठरा-विक मर्यादेपर्यंत जंगलाचा दैनंदिन जीवनाकरता वापर करण्याचा हक्क दिला तर कुठे असा हक्क न देता सवलत म्हणून जंगलसंपत्ती वापरू दिली आणि

३) शेवटी जंगलांवर विधिबद्ध संस्थेची मालकी ही संकल्पना प्रस्थापित होऊन त्याचा उपयोग, गुंतवणूक व नफा ह्या निव्वळ व्यापारी तत्त्वावर केली जाऊ लागला आणि आदिवासांच्या जंगलविषयक गरजांना त्यात स्थानच उरले नाही आणि अशा गरजा पूर्ण करण्याच्या आग्रहामुळे संघर्ष निर्माण होऊ लागले.

अशा तऱ्हेने मानव आणि जंगल ह्यांमधील परस्पर संबंध संक्रमित होत असताना जेव्हा जेव्हा ह्या संबंधा मधील कायदेशीरपणा त्यावेळेच्या आर्थिक व्यवस्थेला झेपेनासा होतो तेव्हा तेव्हा संघर्ष अटळ असतात.

## नवे गणित

जीवन वजा वृक्ष

बरोबर जीवन ' रुक्ष '

उदाहरणार्थ उद्योगप्रधान समाज नियमांच्या चौकटीत बांधलेला असतो. त्यामुळे कायद्याने बांधलेली सांघिक व्यवस्था त्याला अधिक मानवते. उलटपक्षी अप्रगत समाजाला सामाजिक मालकी अधिक सोइस्कर वाटते. नियमबद्ध उद्योगप्रधान समाजरचनेला आदिवासींना दिलेल्या सवलती कालबाह्य वाटतात. त्याचवेळी आदि-वासींना ही नवी अर्थव्यवस्था म्हणजे निव्वळ सत्तेच्या जोरावर केलेली आपली पिळवणूक आहे असे वाटते.

दृष्टीकोनातील तफावत : जंगलांच्या शासकीय मालकीच्या संकल्पनेने आदिवासी अर्थव्यवस्थेवर फार महत्त्वाचा परिणाम केला. पूर्वी आदिवासी समाज वन-संपत्तीचा कशा प्रकारे वापर करावयाचा हे ठरविण्यास पूर्णपणे स्वतंत्र होता. आता मात्र जीवन जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कमीत कमी वनोत्पदित साधनां-करताही त्याला शासनाच्या तोंडाकडे पहावे लागते. ह्या ठिकाणी वनांवरील स्वामित्व आणि जमिनीवरील मालकी ह्याचा तुलनात्मक विचार करणे उपयुक्त ठरते. जमिनीच्या बाबतीत सामाजिक मालकीच्या कल्पनेची जागा हळूहळू व्यक्तिगत मालकीच्या कल्पनेने घेतली. ह्या दोन टोकांच्या मधल्या काळात ब्रिटिशांच्या वेळी जमीनदार किंवा मालगुजार हा एक मध्यस्थ वर्ग निर्माण झाला होता. स्वातंत्र्यानंतर जमीनदारी व मालगुजारी नष्ट करण्यात आली. आता सर्व जमिन अंतिमतः शासनाच्या मालकीची समजली जाते आणि शेतकऱ्याला ती कसण्याचा अधिकार असतो.

जंगलांच्या बाबतीत मात्र जो बदल झाला त्याची दिशा निराळी होती. आदिवासी जंगलाचा मालक होता परंतु त्या जंगलावर ब्रिटिश शासनाचे किंवा जमिन-दाराचे नियंत्रण आले. ब्रिटिश राज्य गेल्यावर आदि-वासीला मात्र जंगलाची मालकी मिळाली नाही. उलट-पक्षी शासनाचा त्यावरील अधिकार अधिक पक्का झाला. हा असा एकांगी बदल होण्याचे कारण आदि-वासी अर्थव्यवस्था व तिचा जंगलाशी घनिष्ट संबंध व त्याबद्दल गैरसमज हे होय. आपल्या पूर्वापार हक्कांच्या संरक्षणार्थ सर्व शक्तिमान सरकारला तोंड देण्यास दुर्बल आदिवासी असमर्थ ठरला आणि सरकारची तिजोरी भरण्याची भूकही सतत वाढतच गेली त्यामुळे हा एकांगी बदल कायम झाला.

वनांवर अवलंबून असणारी आदिवासी अर्थव्यवस्था शेतीप्रधान अर्थव्यवस्था आणि उद्योगप्रधान अर्थव्यवस्था

या मानवी प्रगतीच्या तीन भिन्न अवस्था आहेत आणि त्यापैकी कोणतीही दुसरीची वैशिष्टये जाणून घेण्याबाबत उदासीन असते आणि म्हणूनच आदिवासी अर्थव्यवस्थेबद्दल इतर दोन व्यवस्थामध्ये इतके दृढमूल गैरसमज आढळतात. मानवी जीवनाच्या आरंभीच्या काळात मानव निसर्गाच्या देणगीवरच अवलंबून होता आणि त्याचा उद्योग निसर्गातून जीवनोपयोगी वस्तू जमा करणे, इतर मानवी शत्रूपासून स्वतःचे संरक्षण करणे यापुरताच मर्यादित होता. शिकार, अन्न गोळा करणे आणि जीवनोपयोगी वनसंपत्तीचे इतर पशूंपासून रक्षण करणे याकरिता त्याला करावे लागणारे एकूण कष्ट आणि आधुनिक स्थिर शेतीपासून जीवनोपयोगी वस्तू निर्माण करण्याला लागणारे एकूण कष्ट समान आहेत. असे असले तरी ह्या दोन प्रकारच्या कष्टात एक प्रकारचा गुणात्मक फरक आहे. जंगलातील उपलब्ध फळे तोडणे, कंदखणणे ही कामे दिसायला सोपी वाटतात. पण हे सोपे काम करण्यापूर्वी त्याला सभोवतालच्या अति कठिण परिस्थितीला सतत तोंड देत आपले अस्तित्व टिकवण्याकरता फार उग्र लढा द्यावा लागतो ही गोष्ट दृष्टिआड करून चालणार नाही. जसजसा वाढत्या लोकसंख्येचा दबाव वाढत जातो तसतसा निसर्गाविरूद्धचा मानवाचा लढा अधिकच कठिण होत जातो. कारण मर्यादित वनोत्पादनाची मागणी वाढत जाते.

शेतीप्रधान किंवा उद्योगप्रधान जीवनप्रणालीतील माणसाला सुरक्षिततेकरता स्वतः काहीच करावे लागत नसल्यामुळे आदिवासीला केवळ जगण्याकरतांच किती कठिण परिस्थितीला तोंड द्यावे लागते याची कल्पनाच करता येत नाही आणि त्यामुळे त्याला वाटते त्याचे जीवन फार सोपे आहे, कंदमुळे आणि फळे जमा केली की झाले ? उलटपक्षी आधुनिक स्थिर शेतीमध्ये शेतीपासून प्रत्यक्ष जीवनोपयोगी उत्पादन करण्याकरता निसर्गनिर्मित कंदमुळे फळे गोळा करण्याच्या तुलनेने बरेच अधिक कष्ट करावे लागतात. पण व्यक्तिगत सुरक्षिततेकरिता आधुनिक शासनयंत्रणेमुळे त्याला स्वतःला काहीच करावे लागत नाही. प्रथमावस्थेतील मानवाला केवळ जिवंत राहण्याकरता कठोर परिस्थितीला तोंड द्यावे लागे. आधुनिक मानव या प्रसंगातून निभावला आहे. अत्याधुनिक यंत्रयुगातील अर्थव्यवस्थेत उत्पादनाकरता लागणारी शिस्त आणि शारीरिकश्रम हे शेतीव्यवसायातील श्रमापेक्षा पुष्कळच जास्त असतात. पण यंत्रयुगाचे इतर काही फायदेही आहेत. ह्या शिस्तबद्ध समाजात मानवाच्या इतर पुष्कळ गरजा त्या समाजाच्या आधुनिक नियमबद्ध व्यवस्थेमुळे विनासायास पूर्ण होत असतात.

यंत्रयुगाचा भांडवलप्रधान पाया जसजसा भक्कम होत जातो तसतसे मानवाला त्याच्या पूर्वी केलेल्या श्रमांचे फळ वाढत्या प्रमाणात मिळू लागते. जसजशी त्याची बचत वाढू लागते तसतसा त्याचा जीवनकलह सोपा होत जातो. शिवाय कार्यक्षम सामाजिक व्यवस्थेमुळे मानवाला स्वतःच्या सुरक्षिततेकरता व इतर प्राथमिक गरजा पुरविण्याकरता निसर्गाशी प्रत्यक्ष लढा जवळजवळ करावाच लागत नाही. प्रथमावस्थेत मानव त्याच्या सर्व गरजांकरता पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असे तर अत्याधुनिक यांत्रिक समाजात तो जवळजवळ पूर्णपणे आपल्या पूर्वश्रमांची गोड फळे भोगत असतो.

परिणाम : जसजशी शासनाची जंगलांवरील कायदेशीर मालकी सर्वव्यापी होत जाते तसतसे वनधोरण विषयक निर्णय जंगलाशी मुळीच प्रत्यक्ष संबंध नसलेल्या शासनाच्या मध्यवर्ती कार्यालयात घेतले जातात. परिणामतः निर्णय घेताना आदिवासींच्या जंगलाशी असलेल्या घनिष्ट संबंधाची दखल घेतली जात नाही त्याचे वनसंपत्तीवरील परंपरागत हक्क ही जंगलांच्या शास्त्रशुद्ध आर्थिक विकासाच्या मार्गातील एक धोंड समजली जाते.

---

**वाण**

दुःखाचा बटवडा करणारा वृक्ष
अद्याप
जन्मायचा आहे।
सुखाची खैरियत करणाऱ्या वृक्षाची
इथं
खाण आहे।
पण
या वृक्षाची जोपासना करणाराची
आज
खरी वाण आहे ॥

(लेखातील वनकवितांचे कवि,
वनाधिकारी श्री. का. का. चव्हाण

---

उलटपक्षी आदिवासींची सामाजिक आर्थिक व्यवस्था हीसुद्धा सतत कायम राहात नाही. जसजशी देशाच्या विकासाला गति येत जाते जसतसे आदिवासी सुद्धा हळूहळू जंगलावर कमी प्रमाणात अवलंबून राहू लागतात. काही भागात तर जंगलांचे आदिवासींच्या जीवनातील महत्व नाममात्रच राहिलेले दिसते. सर्वच आदिवासी क्षेत्रात मात्र अशी परिस्थिती नसते. स्थलांतरित शेतीपध्दती अजून अस्तित्वात असणाऱ्या क्षेत्रांच्या उदाहरणावरून वरील गोष्ट स्पष्ट होईल. ओरिसामध्ये आणि ईशान्य भारतात काही आदिवासी जमाती आहेत ज्या अजून पूर्णपणे स्थलांतरित शेतीचा अवलब करतात. अशाही कित्येक जमाती आहेत ज्या प्रामुख्याने स्थिर शेतीबरोबर काही आधुनिक जोडधंदेही करतात, पण यासुध्दा आपल्या उत्पन्नाला जोड देण्याकरता स्थलांतरित शेतीही करतात. वननीति निर्धारित करताना नमुना म्हणून प्रगत आदिवासी क्षेत्र समोर ठेवले जाते आणि त्या आधारावर सरसकट सर्व आदिवासी क्षेत्राकरता एकाच साच्याचे नियोजन केले जाते.वरील दृष्टीकोनावर आधारलेल्या वननीतिचा अधिक प्रगत क्षेत्रांच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम नगण्य असू शकेल परंतु मागासलेल्या क्षेत्रांच्या बाबतील हा परिणाम अत्यंत दूरगामी आणि निर्णायक असण्याची शक्यता असेल. मागासलेल्या भागात वनसंपत्ती भरपूर प्रमाणात उपलब्ध असते कारण त्या ठिकाणी लोकसंख्यावाढीचा दबाब नसतो आणि आधुनिक जगलविध्वंसक व्यक्ति अथवा संस्थाची वक्रदृष्टी त्यांच्यापर्यंत अजून पोहोचलेली नसते. साहाजिकच अशा भागातील वनसंपत्तीचा शास्त्रशुध्द उपयोग केल्यास त्यातून मिळू शकणारी संपत्ति खूपच असते. दुर्दैवाने नेमका अशाच क्षेत्रातील आदिवासी त्याच्या जीवनकलह्यात जंगलावर सर्वाधिक अवलंबून असतो आणि त्याची आर्थिक व्यवस्था अत्यंत हलाखीची असते. त्याला या अवस्थेत वेगाने होणारा बदल झेपत नाही. बनव्यवहारातील साध्या कामाकरिता आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास तो तयार नसतो. म्हणून अधिक मागासलेल्या भागात आदिवासी आणि राज्यसंस्था यातील संघर्ष अधिक तीव्र स्वरूपाचा असतो.

मागास विभागातील प्रत्यक्ष परिस्थितीबद्दल बेताचे ज्ञान असणारी पण नीति ठरवणारी मध्यवर्ती शासनयंत्रणा आणि विशेषत: वनसंपत्तीवर बऱ्याच अंशी अवलंबून असणारा आदिवासी समाज यांचे वनसंपत्तीविषयक दृष्टिकोण जवळजवळ पूर्णपणे परस्पर विरोधी असतात. अशा भागातील लोकांना पोट भरण्याकरता फारच कमी कष्ट करावे लागतात या गोष्टीवर शासनयंत्रणा भर देते; पण कमी कष्टाची कल्पना एकांगी आहे आणि त्यात कष्टाची नागरीव्याख्या विचारात घेतली जाऊन या मागासलेल्या लोकांना निव्वळ जिवंत राहाण्याकरता अतिशय श्रास घ्यावा लागतो ही गोष्ट सोइस्करपणे दृष्टीआड केली जाते आणि असा निष्कर्ष काढला जातो की, देशातील कोणत्याही जनसमूहाला राष्ट्राची नैसर्गिक संपत्ति उधळू देता येणार नाही. जंगले ही निसर्गाची देणगी समजून शासन एकूण जनतेच्या हिताकरता त्यावर आपला पूर्ण हक्क सांगते. ह्या जंगलातून उत्पादन काढताना फार तर त्या उपक्रमात आदिवासींना वाजवी दराने मजुरी देऊन काम दिले की झाले असे शासन मानते. अशा तऱ्हेने आदिवासीला त्याच्या जंगलावरील प्रत्यक्ष आणि परंपरागत मालकी हक्कापासून पूर्णपणे वंचित केले जाऊन तो एक प्रसंगानुरूप वेतन मिळवणारा कामगार होतो.

## जनतेचा आणि जंगलांचा विकास : एक समन्वय

आदिवासी रहात असलेल्या वनविभागातील सामाजिक आर्थिक परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची असूनप्रत्यक्ष कायदेशीर परिस्थिती आणि त्याबाबत स्थानिक लोकांचा दृष्टिकोन यांत खूपच तफावत असते. स्थानिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने काही गोष्टी अपरिहार्य असतात तर प्रादेशिक किंवा राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने नैसर्गिक संपत्तीचा जास्तीत जास्त शास्त्रशुद्ध वापर करणे आवश्यक असते; वनसंरक्षणाकरता वनसंरक्षण असे मानणारे आणि वने ही अधिकाधिक आर्थिक उत्पादनाकरता आहेत हा दृष्टिकोन असणारे यांच्यामधील मतभेद अधिक तीव्र होत आहेत. लोकांची प्रगती आणि वनसंवर्धन ही जणू परस्परांपासून अगदी भिन्न आहेत अशाच तऱ्हेने सगळे नियोजन केले जाते. जंगले आणि जंगलातील समाजजीवन यावर प्रभाव करणाऱ्या क्वचित प्रसंगी परस्परविरोधी भिन्न घटकांचा साकल्याने विचार करून वनसंवर्धन-नीति अजून तयार केली गेलेली नाही. एखाद्या क्षेत्राचे वनविषयक धोरण ठरवताना कित्येक घटक असे असतील की, जे इतर क्षेत्रांपेक्षा निरनिराळे असतील. सर्व क्षेत्रांना सामान्य घटक मात्र दोनच आणि ते म्हणजे जंगल आणि

तथील रहिवासी ह्या दोन घटकांच्या गरजांमध्ये एक व्यवहार्य समतोल. वननीति ठरवताना पाळला गेला पाहिजे. ह्या दोन घटकांपैकी एकाला प्राधान्य व दुसऱ्याला गौणत्व देऊन आपल्याला विकासाचे दोन नमुने तयार करून त्यांच्या संयोगाने दोनही घटकांना समान महत्त्व देणारा नमुना तयार करता येतो काय ते आता पाहू या.

**वनविकासप्रधान योजनेचा नमुना :** ह्या नमुन्यामध्ये वनसंपत्तीला मध्यवर्ती स्थान असते. तात्कालिक आणि दीर्घ मुदतीची उद्दिष्टे लक्षात घेऊन तयार केलेल्या या नमुन्यात वनसंपत्तीच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेकरता होणाऱ्या प्रयोगाला प्राधान्य दिले जाते. मानवाचे जंगलाशी संबंध प्रगतीच्या शेवटच्या टप्प्यावर पोहोचलेल्या पाश्चिमात्य देशांत वनसंवर्धनाचे जे स्वरूप असते त्यांच्याशी हा आराखडा मिळता–जुळता असतो. येथे जंगले आणि त्याच्या आसपास राहणाऱ्या लोकवस्तीची राहाणी यामध्ये कुठल्याही विशिष्ट प्रकारचे नाते नसते. मनुष्यबळ आणि भांडवल या उत्पादनोपयोगी दोन्ही घटकांना अशा व्यवस्थेत सारखेच लेखले जाते. गुंतवणुकीपासून जास्तीत जास्त उत्पादन काढण्याच्या दृष्टीने मनुष्यबळ आणि भांडवल यांच्या प्रमाणात बदल केला जातो. अशा प्रकारच्या प्रादेशिक विकासयोजनेमध्ये मनुष्यबळाने मागणी तसा पुरवठा या तत्त्वानुसार परिस्थितीशी जुळवून घेतले पाहिजे अशी अपेक्षा असते. जंगलामध्ये विविध जातींच्या वृक्षांचे प्रमाण ठरवताना जास्तीत जास्त आर्थिक लाभ हेच तत्त्व दृष्टीसमोर ठेवले जाते.

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक झाल्यास ह्या नमुन्यात सावकाश वाढणाऱ्या स्थानिक झाडांच्या जातीऐवजी जलद वाढणारे वृक्ष बाहेरून आणून लावले जातात, तेथील विविध उद्योगांची उत्पादकता वाढविण्याकरता आवश्यक तर बाहेरून मजूर आयात केले जातात, विरळ वस्तीत दुर्गम भागात भांडवलप्रधान अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रियांचा अवलंब करणारे उद्योग स्थापित केले जातात, व्यवस्थापन सुलभ व्हावे व उत्पादनाचे प्रमाण वाढविल्यामुळे होणारा फायदा पदरात पडावा म्हणून लहान लहान क्षेत्रात केन्द्रीभूत उद्योग सुरू केले जातात. ह्या प्रकारच्या योजनेने बाहेरून भांडवल आल्यामुळे प्रदेश उन्नत होतो. लोकांची सर्वांगीण प्रगती होते आणि स्थानिक उपयोगात न आणलेली विपुल नैसर्गिक संपत्ति लवकरात लवकर खूप उत्पन्न देऊ लागते. प्रादेशिक आर्थिक विकास जलद गतीने होऊन तो राष्ट्रीय आर्थिक विकासाला त्याच प्रमाणात सहाय्यभूत होतो.

मनुष्यबलाला इतर निर्जीव उत्पादनसाधनांचेच स्थान दिले जात असल्यामुळे स्थानिक लोकांना त्यांचा कल व गुणवत्तेनुसार या उद्योगामध्ये स्थान मिळते. स्थानिक लोकांना अग्रक्रमाने दृष्टीसमोर ठेऊन या उत्पादनव्यवस्थेकडे पाहिले तर ही प्रादेशिक नियोजन व्यवस्था अगदी निराळेच रूप घेताना आढळते. आदिवासी हा अजून सर्वसमावेशक, कोणत्याही प्रकारच्या वैशिष्टयावर भर न देणाऱ्या अर्थव्यवस्थेतच खितपत आहे. तो अजून अन्न व निवारा ह्याकरता जवळजवळ पूर्णपणे जंगलावरच विसंबतो. स्थानिक जंगलांमध्ये जलद वाढणारे वृक्ष स्थानिक वृक्षांच्याऐवजी काही प्रमाणांत लावल्यास तेथील निसर्गसमतोल बदलेल. नव्या वृक्षांनी फळे देणाऱ्या वृक्षांची जागा घेतल्यास त्याच्या आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम होईल. नवे वृक्ष त्याच्या दैनंदिन गरजा पूर्ण करू शकणारे नसतील शेतीप्रधान व्यवस्थेत ज्या प्रकारचे व जितके मनुष्यबळ त्या विभागाला लागत होते त्यापेक्षा निराळे कौशल्य असणारे मनुष्यबळ आता लागेल. नवीन उद्योगव्यवस्थेत मनुष्यशक्तीचा वापर कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन या तत्वावर आधारला जात असल्यामुळे स्थानिक अकुशल आदिवासी इथे निरुपयोगी समजला जाईल. जंगलातील लहान–सहान वस्तू आता त्याला उपलब्ध नसतील व पुरेशी कुशलता नसल्यामुळे पुरेसे कामही मिळणार नाही आणि म्हणून त्याची एकंदर पिछेहाट ह्या प्रकारच्या नियोजनाने होईल बाहेरून येणाऱ्या कुशल कामगारांशी रोजगाराकरता आता त्यांना स्पर्धा करावी लागते व ही स्पर्धा बाहेरून येणाऱ्या मजुरांशी संघर्षाचे कारण होऊ शकते. अशा तऱ्हेने नैसर्गिक वनसंपत्तीच्या विकासाला प्राधान्य देणारी विकासयोजना ही भांडवलप्रधान अवजड उद्योगासारखीच असते फरक एवढाच की वनोत्पादनावर आधारित योजनेचे क्षेत्र आधुनिक तंत्राधारित भांडवलप्रधान उद्योगापेक्षा अधिक विस्तृत असते.

**मानवविकासप्रधान योजनेचा नमुना :** अशा योजनेत सर्वांगीण मानवविकास हे प्रधान उद्दिष्ट असते उपलब्ध स्थानिक वनसंपत्ती हे अशा विकासाच्या अनेक साधनांपैकी केवळ एक साधन असते. अशा नमुन्याचे


दुसऱ्या टोकावरचे उदाहरण आपल्याला प्राचीन आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत बघावयास मिळते ज्या वेळी मानव केवळ जंगलावरच आपली उपजीविका करीत असे. प्रगतिच्या आरंभीच्या काळात मानवाचे हित आणि वनसंपत्तीचे संवर्धन ह्यामध्ये बराच सुसंवाद होता. वाढत्या लोकसंख्येच्या दबावाबरोबर वनसंवर्धनाच्या तंत्रज्ञानांत आवश्यक ती प्रगति न झालेल्या काळात काही वेळा काही ठिकाणी मानवाच्या जीवनाचा मूलभूत आधार म्हणजे जंगलेच पूर्णपणे नष्ट झाली. हे संकट टाळायचे असेल तर जंगलांच्या उपयोगाची पद्धत बदलली पाहिजे; पण असे करताना स्थानिक समाजाचा त्यांच्या गरजांकरता जंगलावर पूर्ण हक्क अबाधित राहून त्यांची अर्थव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. आधुनिक उद्योग, उत्पादनव्यवस्थेत लागणारे व्यवस्थापनकौशल्य आणि तंत्रज्ञान आत्मसात केल्याशिवाय आदिवासींना हा हक्क प्रस्थापित करता येणार नाही. असे व्हायचे असेल तर विकासाचा वेग आदिवासींच्या आवाक्याबाहेर असता कामा नये त्या करता आधुनिक व्यवस्थापनतंत्रांची सुरुवातीला तरी अगदी किमान आयात केली गेली पाहिजे. वनसंपत्ती हा ज्यांच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे अशा काही पाश्चिमात्य देशात अशा व्यवस्थेचे उत्तम नमुने पहावयास मिळतात. ही योजना दीर्घ कालीन असेल आणि ह्या दिर्घकाळात स्थानिक लोक हळूहळू वाढत्या प्रमाणावर वने आणि इतर नैसर्गिक संपत्तीचा उपयोग आपल्या सतत प्रगतिसाठी करतील.

अशा प्रकारचा विकासनमुना ही एक बंदिस्त अर्थव्यवस्था असेल आणि तिच्यात बाहेरची गुंतवणूक कमीत कमी असून अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्राशी तिचे घनिष्ट संबंध असतील आणि स्थानिक लोकांचे हितसंबंध हा त्या नमुन्याचा केन्द्रबिंदू असेल ह्या नमुन्याच्या विकासाचा शेवटचा टप्पा वनसंवर्धनाच्या दृष्टिकोनातून पहिल्या नमुन्यासारखाच असेल. ह्या पुढील विकासाच्या टप्प्यात स्थानिक साधनसामग्रीच्या जास्तीत जास्त उपयोगावर भर नसेल. ह्या साधनसामग्रीचा विभागीय आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला पहिल्या नमुन्याच्या मानाने बराच कमी हातभार लागेल. ह्या साधनसामग्रीचा कमीत कमी उपयोग हा एक धोरणात्मक निर्णयाचा प्रकारही असू शकेल. आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने ह्या सर्व गोष्टींना फार महत्व आहे कारण आदिवासींचा विकास ही एक प्रामुख्याने संक्रमणावस्थेची समस्या आहे. या कठीण संक्रमणावस्थेत ही काळजी घेणे अतिशय आवश्यक आहे की, आदिवासींकडून अपेक्षित प्रगतीचा वेग हा त्यांच्या नवीन कल्पना आत्मसात करण्याच्या कुवती पलीकडचा नसेल.

वनसंपत्तीचे रक्षण आणि स्थानिक लोकांच्या गरजा ह्या दोहोंमध्ये सामंजस्य राखणारी धोरणाची सुस्पष्ट चौकट नसल्यामुळे नियोजन करताना गोंधळल्यासारखे होते व एखाद्या क्षेत्रास विकासाचा कोणता नमुना वापरावा हे त्या भागातील निरनिराळ्या घटकांच्या दबावावर, शक्तीवर अवलंबून असते. काही भागात स्थानिक लोक आपले हक्क वसूल करतील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न केल्यास काही भागात वाढत्या लोकसंख्येच्या प्रभावाखाली जंगलांचा विध्वंस होईल. दुसऱ्या टोकाला अतिमागासलेल्या भागात शासन स्थानिक लोकांच्या गरजा दृष्टिआड करून आपल्या दृष्टीने सर्व योजना राबवील. या कृतीने जंगलाची अर्थव्यवस्था पूर्णपणे बदलून जाईल. हे होत असताना आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचा पायाच उध्वस्त होऊन

(पुढील मजकूर पान ३३ वर)

मी आलेय मिटी,
एक खारोटी...
मी म्हणजे महाबँक



बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)

# निलगिरीची वनशेती



आनंद मसलेकर

अहमदाबाद शहरापासून बडोद्याकडे जाणाऱ्या राजमार्गावर वटवा हे गाव सात कि. मी. अंतरावर पडते. या गावाची ख्याति गेल्या ४–५ वर्षांत जगभर पसरली ती वटवा येथील आदर्श फार्ममुळे. श्री. कालिदासभाई भगवानजीभाई पटेल यांच्या आदर्श फार्मला वानिकीचे 'काशी-रामेश्वर' हे नाव प्राप्त झाले आहे.

फार्मवर ठेवलेल्या नोंदीप्रमाणे १९८०–८१ साली ६१०० खेडूत, जवळजवळ ४०० वानिकी विद्यालयांचे विद्यार्थी, ६० वनाधिकारी व २९ परदेशांतील वनतज्ज्ञ वटवा येथे येऊन गेले. तेथील निलगिरीची 'शेती' पाहण्यासाठी गेल्या चार वर्षांत सरासरी दरवर्षी ५००० खेडूत येऊन गेले. या उपक्रमावर देशात आणि परदेशांतही लिहिले गेले. निलगिरीची शेती ही कृषीइतकीच किंबहुना जास्तीच किफायतशीर ठरते हे श्री. कालिदासभाई यांनी वटवा येथे सिद्ध केले आहे. 'वनतज्ज्ञ, अरण्यपंडित' अशा काही पदव्या आपल्याकडे प्रचलित आहेत; परंतु खरेखुरे 'वनमहर्षि' बघायचे झाल्यास श्री. कालिदासभाईंचे नाव घ्यावे लागेल. वानिकीच्या बाबतीत तरी श्री. कालिदासभाई हे एक 'चालती-बोलती संशोधनसंस्था' आहेत. त्यांच्याइतके निलगिरी या वृक्षजातीचे ज्ञान कोणालाही नाही असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. वन आणि वृक्ष यांच्याबद्दलची त्यांची तळमळही असाधारण आहे.

श्री. कालिदासभाई हे मूळचे दक्षिण गुजराथमधील बलसाड जिल्ह्यातील नवसारी तालुक्याच्या परडी (सालेम) गावचे शेतकरी त्यांनी १९५९ साली वटवा येथे शेतजमीन विकत घेतली. १९६ एकर शेतीवर त्यांनी कापूस, तांदूळ, गहू, ऊस अशी पिके घेतली. १९७२ साली त्यांनी कापसाच्या उत्पादनात दर एकरी २५१० किलो कापसाची पैदास करून जागतिक विक्रम केला. हे सर्व असूनही शेतीमधून जास्तीत जास्त नफा कसा घ्यावा याचा त्यांना ध्यास लागला. कारण कापसाच्या पैदासीत निव्वळ नफा दरसाल एकरी दीड हजार रुपये इतकाच पडे. वटवा येथील जमीन ही इथल्या शेतावर भाषेत 'गोराडू' प्रकारची. पाणी खारे; पण 'बोरवेल' करवी पाण्याची भरपूर सोय. कष्टांबरोबरच नवीन प्रयोग करून बघण्याची प्रवृत्ति आणि इतरांप्रमाणेच नवसारीकडच्या लोकांची हिशेबी वृत्ती अंगी भिनलेली. श्री. कालिदासभाई यांनी म्हणूनच आयुर्वेद महाविद्यालय जामनगर, वनसंशोधनसंस्था, देहरादून वगैरेंशी संपर्क साधला. औषधी वनस्पती आणि मुख्यत: सर्पगंधाची लागवड करण्याचा त्यांना सल्ला दिला गेला; पण यात फार फायदा नाही हे त्यांच्या चोखंदळ मनाला पटले. त्यांनी मग नुकत्याच अहमदाबाद येथे स्थापित झालेल्या वनविस्तार वृत्ताच्या कार्यालयाला भेट दिली. त्या वेळी श्री. एम्. के. दळवी (सध्याचे वनमहानिरीक्षक, भारत सरकार, नवी दिल्ली) हे इथे वनसंरक्षक होते. त्यांनी निलगिरी वृक्षांची लागवड करून पाहण्यास सुचवले. भारतभर निलगिरीची वने वनखात्याकडून १९६०–७० च्या दरम्यान लावली गेली; पण त्याबद्दलची खात्रीशीर माहिती त्यांना कोठे मिळेना. एका छोट्याशा प्रसंगातून मात्र श्री. कालिदासभाई यांचा इरादा पक्का झाला.

### कल्पना कशी सुचली ?

आदर्श फार्मवरील घरकामासाठी श्री. कालिदासभाई यांना एक सरळ असा तीस फूट लांब वासा हवा होता. बाजारात अहमदाबादला सागवानाच्या १५ फूट लांब

वाशाची त्या वेळी ३० रुपये किंमत होती(१९७०-७१). श्री. कालिदासभाई घरी परतले. घराशेजारीच १९६२ साली ते वटवा येथे रहावयास आले तेव्हा त्यांनी निलगिरीची तीन रोपे लावली होती. तीनही रोपे वाढून चांगले ६०–७० फूट उंच वृक्ष बनले होते. आठ वर्षांत त्यांची गोलाई पण २४–२५ इंच बनली होती. त्यातले एक झाड कापून घरासाठी वासा घ्यायचा असे त्यांनी ठरवले. सुताराला आदेश देऊन ते एकदोन दिवसांसाठी बाहेरगावी गेले. परतल्यावर त्यांना सुताराने सांगितले की, निलगिरीचे लाकूड इतर लाकडांपेक्षा जास्ती कठीण आणि चिकणे वाटले. श्री. कालिदासभाई यांनी यावर विचार केला की, हे लाकूड कामाचे आहे. गुजरातमध्ये लाकडाचे दुर्भिक्ष आहे. जर काहीही न करता तीन झाडे आठ वर्षांत इतकी वाढली तर कदाचित खत-पाण्यामुळे ती जलद वाढू शकतील. आठ वर्षांनी या झाडांना ५०–६० रु. इतपत किंमतही येते. तेव्हा हा धंदा किफायतशीर ठरावा आणि त्याप्रमाणे त्यांनी रोपांसाठी स्थानिक वनअधिकाऱ्यांशी संपर्क साधला. जुलै १९७१ मध्ये ५००० निलगिरीची रोपे आणवून त्यांनी आपल्या शेतावर लावली. पुढच्या वर्षी ३०,००० रोपे लावली. आज त्यांच्याकडे आदर्श फार्मवर १८० एकर जमिनीत तीन लाख झाडे उभी आहेत. श्री. कालिदासभाईंना यात खूप कष्ट पडले, प्रचंड खर्चही करावा लागला. पण त्याची फळेही तशीच भरघोस मिळाली. साधारणपणे दर एकरी १४०० निलगिरीची झाडे लावून, चौथ्या वर्षअखेरीस ते १००० वासे अपेक्षित धरतात आणि त्यातून खर्च वजा जाता एकरी सरासरी त्यांना रु. १९,००० रु. उत्पन्न मिळत गेले आहे.

### प्रारंभीची व्यवस्था

१९७१ साली प्रथम निलगिरीची रोपे १०'x४' अंतराने १ घनफूट खड्ड्यात लावली गेली. आता त्यांनी १२'x३' लागवडीचे अंतर कायम केले आहे. तसेच झाडांच्या रांगा या पूर्व-पश्चिम लावल्या जातात. वटवा फार्मच्या अनुभवावरून श्री. कालिदासभाई यांनी काही निष्कर्ष काढले आहेत. त्यांचा इतरांना फायद करून देण्यासाठी त्यांनी गुजराथी भाषेत 'निलगिरी नी खेती' अशी एक टिप्पणी छापली आहे आणि ती भेटीस येणाऱ्या सर्वांना ते विनामूल्य देत असतात.

श्री. कालिदासभाई यांनी अगदी सुरुवातीपासून प्रत्येक गोष्टीची खुलासेवार नोंद ठेवली आहे. त्यामुळे


# श्रीदत्त इंजिनियरिंग वर्क्स,

**– नागेपल्ली –**

आदिवासी भागातील
सुसज्ज यांत्रिक वर्कशॉप !

**नागेपल्ली ४४२ ७०३**
ता. अहेरी, जि. चंद्रपूर.

प्रत्येक गोष्ट ते साधार स्पष्ट करतात. १८० एकर वरील संपूर्ण लागवडीत काय आणि कसे उत्पन्न मिळाले याचा तपशील त्यांनी ठेवला आहे.

श्री. कालिदासभाई पटेल यांनी निलगिरीची केलेली लागवड पाहून त्यांच्याचप्रमाणे आतापर्यंत आठशेच्या वर शेतकरी अशी लागवड करण्यास उद्युक्त झाले आहेत. हे झाले अहमदाबाद जिल्ह्यापुरते; पण भावनगर जिल्ह्यातही असे ५४० शेतकरी यंदा निलगिरीची लागवड करणार आहेत. हे एक प्रकारे सामाजिक वनीकरणच म्हणावे लागेल. अशा लागवडीसाठी गुजरात राज्याचे वनखाते रोपे बिनामूल्य पुरवते. १९८१ च्या पावसाळ्यासाठी खात्याकडे एकंदर ८ कोटी रोपट्यांची मागणी आली होती. त्यासाठी वनखात्याने स्वतःच्या रोपवाटिका तयार केल्या आहेत. शाळांमधून विद्यार्थ्यांकरवी रोपे बनवून घेण्यात येत आहेत. तसेच काही शेतकऱ्यांकडून अशी रोपे तयार करण्यात आली आहेत. हे सर्व पाहून श्री. कालिदासभाई यांनी आपल्या फार्मवर आज ३.१ लाख रोपे तयार केली आहेत. पॉलिथिनच्या पिशव्यांचा पुरवठा करण्यासाठी वनखात्याने राजपिपला येथे स्वतःचा कारखाना १९८० साली काढला आहे. आता गुजराथ राज्यात निलगिरीच्या लागवडीचे महत्त्व पटले आहे. निलगिरी हे इकडे शब्दशः "पैशाचे झाड" मानले गले आहे. श्री. कालिदासभाई हे नुसते निलगिरीची लागवड करून थांबले नाहीत. या वनस्पतीची सर्व तऱ्हेची माहिती त्यांनी जमवली आहे. प्रत्यक्ष पाहून, मोजून अशी माहिती गोळा केली आहे, त्यापैकी काही महत्त्वाची माहिती म्हणजे :— निलगिरीची झाडे पाणी फार शोषून घेतात असे मानले जाते आणि ते खरेही आहे; पण या झाडांच्या लागवडीमुळे जमीन भुसभुशीत होऊन पाणी त्वरित जमिनीत मुरले जाते. १९७८–७९ आणि ८० साली याबाबत वटवा फार्मवर निरीक्षण करण्यात आले. १९७८ च्या ऑगस्टमध्ये आणि ७९ च्या पण त्याच महिन्यात २४ तासांत १९ आणि १६ सें. मी. पाऊस पडला. इतर शेजारच्या शेतजमिनीवर पाणी आठ-दहा दिवस साचून होते. काही ठिकाणी पाण्याचे लोट वहात होते. पण आदर्श फार्मच्या १८० एकरांवर दोन्ही वेळा संपूर्ण पाणी १॥ ते २ तासात जमिनीत मुरले होते. ८ तासांनी चिखल पण आढळला नव्हता. म्हणजेच एका बाजूने झाडाच्या वाढीस पाणी खप लागते हे खरे; पण ही झाडे त्याची परतफेड दुसऱ्या वर्षापासून पुरेपूर करतात.

श्री. कालिदाभाई यांनी एकरी ५०० ते १४०० रोपे लावली. ४ वर्षांनी सरासरी ४० ते ४५ घ. मी. (१००० घ. फूट) लाकूड प्राप्त झाले. म्हणजे वृक्षसंख्या वाढवून उत्पन्न वाढतेच असे नाही असा त्यांचा दावा आहे. त्यांच्या मते १००० झाडे एकरी घ्यावी.

आदर्श फार्मवरील निलगिरीचे लाकूड इंग्लंड आणि डेहराडून येथे तपासून घेतले. त्यात ते सागवानापेक्षा १५% जास्ती ताकदवान आढळले. सागवानापेक्षा निलगिरीचा वासा (पोल) जास्ती लवीचक स्थितिस्थापक आढळला. याचा फायदा त्यांना झाला. होड्यांच्या शिडांना मधला ८० फूट लांब खांब लागतो. अशा एका सागवानाच्या खांबाला १२००० ते १४००० रुपये पडतात. आदर्श फार्मवरून गेल्या साली असे ५ खांब निलगिरीचे प्रत्येकी ८००० रु. प्रमाणे विकले गेले.

निलगिरीचे लाकूड कापून त्यांच्या फळ्यांचा आणि चौकटींचा उपयोग त्यांनी करून पाहिला. अशा कापीव लाकडाला अहमदाबामध्ये मागणी आहे. या लाकडास कीड, भुंगे कमी लागतात, असा त्यांचा अनुभव आहे.

सध्या त्यांचे निलगिरीच्या रोपांवर काही प्रयोग चालले आहेत. त्याचप्रमाणे १५ एकराचा एक प्लॉट पहिल्या तोडीनंतर पाणी–खते न देता त्यांनी तसाच वाढू दिलाय. फुटव्यांची संख्या, वाढ आणि खर्चाचे प्रमाण वगैरेवर त्यांचा अभ्यास चालू आहे. सध्या त्यांचे वय ६७ वर्षांचे आहे. त्यांचे शिक्षण फक्त ६ 'पुस्तके' इतकेच झाले आहे. हे सर्व पाहता त्यांच्या या कार्याचे कौतुक वाटेलच; पण त्यांनी सामाजिक वानिकीस गुजरात राज्यात दिलेली वेगळीच स्फूर्ति आणि निलगिरी वृक्षांच्या वनसंवर्धनशास्त्रात केलेले उपयुक्त संशोधन यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी लहान-सहान शेतकऱ्यांना निलगिरीच्या शेतीसाठी सक्रिय मदत देऊ केलीय. रोपे, लागवडीचा खर्च ते करतात. प्रत्यक्ष जागेवर जाऊन मार्गदर्शन पण करतात. शेतकऱ्याने कष्ट करायचे, कमीत कमी ५०० रोपे लावायची, जोपासायची आणि तोडीनंतरच्या उत्पन्नातून श्री. कालिदासभाई यांना झालेल्या खर्चाची रक्कम बिनव्याजी परत करायची, एवढीच त्यांची अपेक्षा आहे. ●

(दै. लोकसत्ताच्या सौजन्याने)

(पान ८ वरून)
ठिकाणी अनुभव येतो. प्रा. विजय परांजपे यांनी पवना धरणाच्या अभ्यासात असा निष्कर्ष काढला आहे.

विकासयोजना आखताना, राबवताना काही चुका होणं स्वाभाविक आहे. मनुष्याच्या शिक्षण-प्रक्रियेचाच तो एक भाग आहे ही गोष्ट डॉ. गाडगीळांनाही मान्य आहे; परंतु समोरच्याच्या पाठीमागे खड्डयात उडी मारणं अथवा परत-परत खड्डयात उड्या मारणं म्हणजे शिक्षण-प्रक्रिया मानणं केवळ मूर्खपणा आहे, असे त्यांचे मत आहे. हा भाबडेपणा वा अडाणीपणा असता तरीही ते समजता आलं असतं; पण डॉ. गाडगिळांचा खरा रोष आहे तो तथाकथित विकासाच्या नावावर काही मूठभर हितसंबंधी रईस लोक सर्वसाधारण जनतेला आणि निसर्गाला खड्डयात लोटतात! आपलं कल्याण म्हणजेच राष्ट्राचं कल्याण अशी स्वतःची सोयीस्कर समजूत हे लोक करून घेतात आणि ते संघटित–पैसेवाले असल्याने प्रचार–माध्यमांचा बेमालूमपणे उपयोग करून इतरांचीही दिशाभूल करू पाहातात! काही प्रामाणिक, पण निसर्गापासून दूर सरकलेले किंवा निसर्गनाशाच्या परिणामापासून सुरक्षित राहिलेले लोकही यांच्या जाळयात सापडतात. त्यामुळे आजवर शांतिघाटी योजना असो वा हिमलयातील वनखात्याच्या 'शास्त्रीय-कार्ययोजना' असो त्याची नुसती माहिती विचारली तरी विचारणारा माणूस राष्ट्रद्रोही ठरत होता! विकासाच्या मार्गातली धोंड म्हणून बदनाम होत होता. आज 'चिपको' अथवा शांतिघाटीच्या आंदोलकांनी आपल्या लढयाच्या जोरावर या माहितीची शहानिशा करायचे प्रयत्न चालविले आहेत.

## विकासाचा अर्थ

डॉ. गाडगीळांच्या मते हा वादाचा मुद्दा होऊ शकत नाही. कारण सामाजिक न्याय व निसर्गशास्त्राला पायदळी तुडविणारा विकास, खराखुरा विकास असूच शकत नाही. खऱ्या विकासाचा अर्थ निरंतर आणि शाश्वत विकास. अशा विकासाला विज्ञानाचं वावडं नाही, उलट विज्ञानाचा प्रचंड आधार आहे. मात्र तशी धारणा पाहिजे. मग केवळ पाच वर्षात जास्तीत जास्त वीज वा कागद निर्माण करण्याच्या घोषणा होणार नाहीत, तर भविष्यातही सातत्यानं व नियमितपणे वीज कागद निर्माण करण्याची योजना होईल. दांडेलीच्या कागदगिरणीबरोबरच यल्लापूरच्या बुरुडाचाही विचार होईल. मुंबई-पुणेकरांच्या झगमगत्या दिव्यांबरोबरच मुळशी–पानशेतच्या धनगरांच्या खोपटात निदान कंदील तरी पेटेल, पेटत राहील. आपल्या पोरा-बाळांच्या 'एनर्जी' बरोबरच धनगराच्या पोराच्या नाही तर वासराच्या तोंडात दुधाचे चार थेंब पडतील. विकासाचा डॉ. गाडगिळांना अभिप्रेत असलेला अर्थ हा आहे.

पण नुसतेच सर्वांचं कल्याण होवो म्हणत वा अभ्यास-प्रकल्प लिहून डॉ. गाडगीळ स्वस्थ बसले नाहीत. सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच काळया आईशी इमान राखणाऱ्या स्व. धनंजयरावांचे ते पुत्र आहेत. डॉ. माधवराव गाडगीळ, त्यांच्या पत्नी डॉ. सुलोचना, डॉक्टरांचे इतर जवान समर्पित सहकारी आज बंगलोरच्या 'इन्स्टिटयूट ऑफ सायन्स' मध्ये पर्यावरण व निसर्ग-शास्त्राचा सैद्धांतिक अभ्यास करतातच; पण त्याचबरोबर मानवाच्या शाश्वत आणि निरंतर विकासाचा शोध घेणाऱ्या प्रयत्नांचाही पाठपुरावा करतात. निसर्गसंपत्ती काय अथवा कोणत्याही क्षेत्रातील ज्ञान काय, ही मूठभर लोकांची मक्तेदारी असूच शकत नाही अशी या मंडळींची पक्की धारणा असल्यानं विद्वत्सभांपासून ते धनगरांच्या, आदिवासींच्या झोपडीपर्यंत आपलं ज्ञान, माहिती, लोकांशी, कार्यकर्त्यांशी आदानप्रदान करण्याची त्यांची धडपड असते. डॉ. स्वामीनाथन, डॉ. मेनन या उच्चपदस्थ शास्त्रज्ञ प्रशासकांना जसा या मंडळींचा विश्वास वाटतो तेवढयाच किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त विश्वासानं कारवारचा अथवा गढवालचा एखादा कार्यकर्ता त्यांच्या भेटीला येतो. सर्वसामान्य जनतेला विश्वासात घेऊन त्यांचे व आपले प्रबोधन करणे हाच पर्यावरण-रक्षणाचा शाश्वत मार्ग आहे असा त्यांचा ठाम विश्वास असल्यानं, हितसंबंधी लोकांनी माहिती दडवून ठेवू नये म्हणून अमेरिकेसारखा 'फ्रीडम ऑफ इन्फर्मेशन अ‍ॅक्ट' भारतामध्ये अंमलात आणावा असा त्यांचा प्रयत्न आहे. साहजिकच मग 'राष्ट्राच्या कल्याणाची' आपल्याला हवी तशी समीकरणं बनविणं संबंधितांना अवघड होईल!

आज सर्वांगीण ग्रामीणआरोग्याचं काम करणारे डॉ. आरोळे, शेतमालाला वाजवी भाव मागणारे श्री. शरद जोशी अथवा निरंतर आणि शाश्वत विकासाची मागणी करणारे डॉ. गाडगीळ यांची आर्जवी मागणी एकच आहे. निसर्गाला, सर्वसामान्य माणसाला गृहीत धरू नका. पायदळी तुडवू नका. अजून उसंत आहे, तोवर विचार करा. नाही तर मुंबई-पुण्याच्या मूठभर लोकांच्या नशिबीही धत्तुरा येईल किंवा लोक दिल्याशिवाय रहाणार नाहीत. ●

( प्रस्तुत लेख एप्रिल १९८० च्या 'किर्लोस्कर मासिकात प्रसिद्ध झाला आहे. )

# ' वनसंवर्धन आणि ग्रामीण विकास '



## ग्रामायन मेळाव्याचा वृत्तान्त

' ग्रामायन ' ही महाराष्ट्रातील ग्रामीण विकास कार्यकर्त्यांची संघटना गेली आठ वर्षे काम करीत आहे. ग्रामीण विकासाशी संबंधित अशा विविध विषयांवर ग्रामीण विकास कार्यकर्त्यांचे मेळावे घेणे हे संघटनेने आपले एक काम मानले आहे.

यंदा २७ व २८ जून रोजी ' वनसंवर्धन आणि ग्रामीण विकास ' या विषयावर ग्रायायनतर्फे मेळावा घेण्यात आला.

वनसंवर्धन या विषयाकडे सामाजिक संस्थांचे फारसे लक्ष नाही असे आतापर्यंत वाटत होते. परंतु या मेळाव्यास जो प्रतिसाद मिळाला त्यावरून आशादायक चित्र निर्माण झाले आहे. मेळाव्यास महाराष्ट्राच्या सर्व भागातून आलेले १५० कार्यकर्ते उपस्थित होते. यांतील काहींनी आपापल्या वनसंवर्धनाच्या प्रयोगांची माहिती दिली, अनुभव सांगितले आणि त्यापासून अनेक कार्यकर्त्यांनी स्फूर्ती घेऊन आपापल्या भागात वनशेतीचे, सामाजिक वनीकरणाचे उपक्रम करण्याचे ठरविले.

मेळाव्याच्या पहिल्या सत्रात ' सृष्टिज्ञान ' मासिकाचे संपादक आ. मा. लेले यांनी वनांच्या विविध संकल्पना आणि वनसंवर्धनाची शास्त्रीय व तांत्रिक अंगे या विषयावरील टिपण प्रथम सादर केले. त्यानंतर झालेल्या चर्चेत भाग घेताना वनस्पतिशास्त्रज्ञ डॉ. वा. द. वर्तक यांनी देवरायांच्या प्रथेमुळे काही फार जुनी बहुमोल वने कशी जतन झाली आहेत ते सांगितले, तर पुण्यातील डेव्हलपमेन्ट ग्रुपचे श्री. ना. रा. परांजपे यांनी वनीकरणासाठी देखील पूर्वमशागत करणे कसे आवश्यक आहे ते कार्यकर्त्यांना समजावून सांगितले.

पुण्याजवळील मंचरच्या आवटे महाविद्यालयाने गेल्या सात–आठ वर्षांत पंचावन्न एकरांच्या माळरानावर वृक्षारोपणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला आहे. तेथील एक प्राध्यापक श्री. संभाजीराव देसाई यांनी या प्रकल्पाची माहिती कार्यकर्त्यांना दिली.

## बहुमोल अनुभव

साताऱ्याचे प्राध्यापक श्री. पुरुषोत्तम शेठ यांनीही आपले अनुभव सांगितले.अजिंक्य ताऱ्याचा उघडा डोंगर बघवेना म्हणून त्यांच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने तेथे झाडे लावण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे भाषण आयोजित केले. शिवाजीवर नव्हे, तर वनसंवर्धनावर. ' इस्रायलने प्रत्येक मृत ज्यूच्या नावाने एक झाड लावले. आपण शिवाजीच्या प्रत्येक वीर मावळ्याच्या स्मृतीसाठी एक झाड लावा ' या त्यांच्या आवाहनाने प्रेरित होऊन मुलांनी शासनाकडून मिळालेल्या जमिनीवर हजारो झाडे लावली. तसेच साताऱ्याजवळील शेन्द्रे या गावी रयत शिक्षण संस्थेने शाळा बांधली. परंतु छपरासाठी पैसे कमी पडले. स्थानिक वन–अधिकाऱ्यांनी एक योजना सुचविली. मुलांनी सिल्व्हर ओकची ३५,००० रोपे तयार करून ती वनखात्याला विकावी, त्यातून छपरासाठी पैसे उभे रहातील. साताऱ्याच्या सायन्स कॉलेजमधील प्राध्यापक, श्री. आर्डे यांनी यात पुढाकार घेतला. वनखात्याने बिया, माती पुरविली. गावकऱ्यांच्या सहकार्याने मुलांनी रोपे तयार केली. परंतु आता वनखात्याने रोपे कोणत्या दराने खरेदी करावीत यावर मतभेद होऊन अडचण निर्माण झाली आहे. परंतु त्यातून लवकरच मार्ग निघेल व शाळेवर छप्पर बसेल, हाही अनुभव प्रा. शेठ यांनी या वेळी सांगितला.

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. के. गो. लिमये यांनी संस्थेच्या पाली येथील वडोर हायस्कूल

शाळेने शासनाकडून मिळालेल्या दहा एकर जमिनीवर कसे सुंदर जंगल उभे केले आहे याची माहिती दिली.

कुबाभूळ आता सुबाभूळ, या नव्या झाडाचा अलीकडे खूपच बोलबाला होत आहे. त्यावरही मेळाव्यात बरीच चर्चा झाली. रिकामे हात, पडिक जमीन व सूर्यप्रकाश या आपल्याकडे मुबलक असलेल्या तीन गोष्टींचा उपयोग करून शून्यातून भांडवलनिर्मिती करण्यासाठी सुबाभूळ लावणे कसे योग्य आहे हे डॉ. कुमार सप्तर्षी यांनी प्रभावीपणे मांडले. वाठारचे श्री. जयंतराव धायगुडे यांनी उसाच्या पिकामध्ये आपण सुबाभळीची झाडे लावल्याचे व त्याचा उसावर कसलाही परिणाम न झाल्याचे सांगितले. सुबाभळीचा महिमा ऐकून दुष्काळी भागातून मेळाव्यास आलेल्या काही शेतकऱ्यांनी याच वर्षी काही एकरात सुबाभूळ लावण्याचे जाहीर केले ( मेळाव्यानंतर एक महिन्याच्या आतच ग्रामायनाच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये सहा एकरात वनशेती करण्यात आली असून त्यात नऊ हजार झाडांची लागवड करण्यात आली आहे.)

दुष्काळी शिरूर तालुक्यातील दहिवडी गावचे अभ्यासू शेतकरी श्री. रं. भा. देव यांनी स्वत: चिंच, चंदन, सुबाभूळ, रानभेंडी आदि झाडांची वनशेती केली आहे. झाडांची मुळे खोल जातात व तेथील ओलीवर जगतात, वाढतात. म्हणून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी उथळभुईची धान्यपिके घेण्यापेक्षा झाडांची शेती करावी असे श्री. देव यांनी स्वानुभावाच्या आधारे आवर्जून सांगितले.

नाशिकच्या डांग सेवा मंडळाचे श्री. दादासाहेब बीडक यांनी शाळेपासून विद्यापीठापर्यंतच्या शिक्षणात वनविषयक अभ्यासाचा समावेश करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली तर, पुण्याच्या आरोग्य दक्षता मंडळाचे डॉ. अरविंद पटवर्धन यांनी शाळेतील मुलांना वर्षभर रोपे कुंडीत वाढविण्यासाठी देण्याचा प्रयोग कसा यशस्वी झाला हे सांगून शाळेत कार्यानुभव म्हणून वृक्ष संवर्धन हा विषय असावा अशी सूचना केली.

जंगले वाचविण्यासाठी गावकऱ्यांना विश्वासात घेऊन वनखात्याने गावांना सहभागी करून घ्यावे असे एका कार्यकर्त्याने सांगितले. मधमाशांमुळे शेतीचे व फळबागांचे उत्पन्न कैकपटीने वाढते व जंगले ही मधमाशांची नैसर्गिक उत्पत्तीस्थाने असल्याने प्रत्येक गावाने जंगल राखले पाहिजे असे श्री. सी. ग. शेंडये यांनी सांगितले. श्री. लाखा पाटील यांनी नारळी, आंबे लावून आदीवासींचे उत्पन्न कसे वाढविले ते सांगितले. तर दापोलीचे बाबा फाटक यांनी कोकणात सर्वत्र आढळणाऱ्या पौष्टीक कारंड्याच्या वेली सर्वांनी लावाव्यात, तसेच झाडांच्या संरक्षणाचा प्रश्न सागरगोटयाच्या काटेरी वेली लावून सोडवावा आणि त्याचबरोबर औषधी सागरगोटयापासून चांगले उत्पन्न मिळवावे असे सुचविले. देना बँकेचे अधिकारी श्री. विजय भट यांनी बँकेची वनशेतीसाठी कर्ज देण्याची योजना सांगितली.

शनिवारी रात्री श्री. जगदीश गोडबोले यांनी उत्तरेतील जंगले वाचविण्यासाठी चाललेल्या 'चिपको' आंदोलनाची स्लाईडस् दाखवून माहिती दिली. तसेच इस्त्राइलमधील शेतीसंबंधी काही फिल्मस् दाखविण्यात आल्या.

## शासकीय योजना

दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात पुण्याच्या सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी, साहाय्यक वनसंरक्षक श्री. वि. भिलवडीकर यांनी शासकीय योजनांची माहिती कार्यकर्त्यांना दिली. नियोजन विभागाचे विभागीय वनाधिकारी श्री. शेखही यावेळी उपस्थित होते. भूमिहीन शेतमजूर, आदीवासी, अल्पभूधारक, बेकार तरुण आदींना रोजगार देऊन वनीकरणाच्या कार्यात सहभागी करून घेण्याच्या शासनाच्या अनेक योजनांची माहिती मिळाल्याने हे सत्र फार उपयुक्त झाले.

दुसऱ्या सत्रामध्ये प्रथम ग्रामायनचे उपाध्यक्ष श्री. श. द. कुलकर्णी यांनी संस्थेच्या पुढील अधिवेशनात मांडण्यात यावयाच्या नव्या 'इंडियन फॉरेस्ट अॅक्ट' च्या विधेयकाची माहिती दिली व यातील तरतुदी बदलण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

दुपारच्या सत्रात राज्याचे वनमंत्री श्री. नानाभाऊ एंबडवार यांचे भाषण झाले श्री. एंबडवार यांनी आपल्या भाषणात महाबळेश्वर परिसरातील अरण्य अभयारण्य म्हणून लवकरच घोषित करण्यात येईल. तसेच तेथील जंगलतोडीचा व मोळीविक्या स्त्रियांच्या समस्यांचा विचार करण्यासाठी ग्रामायनने या भागातील कार्यकर्त्यांची परिषद आयोजित करावी. असे सुचविले. वनखात्याचे अधिकारी व सर्वसामान्य लोक यांच्यात जवळिक निर्माण करण्यासाठी अवश्य प्रयत्न केले जातील असे सांगितले. शेवटी ग्रामायनचे कोषाध्यक्ष श्री. माजगावकर यांनी सर्वांचे आभार मानले.

पुस्तक परीक्षण

# ‘ आदिम ’

**शं गो. देवगावकर**

विदर्भातील एक नामवंत साहित्यिक आणि आदिमांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा आत्मीयतेने अभ्यास करणारे प्राचार्य डॉ. भाऊ मांडवकर यांचा हा एक लेखसंग्रह आहे. ‘ कोलाम ’ या त्यांच्या ग्रंथामुळे, त्यांच्या आदिम जातींच्या अध्ययनातला साक्षेपीपणा प्रथम प्रगट झाला. त्यानंतरही आदिमांच्या जीवनातील विविध पैलूंवर व विशेषेकरून शब्दसाहित्यावर चिकित्सक अध्ययन त्यांनी सुरू ठेवले. ‘ आकाशवाणी ’वर झालेली भाषणे आणि नागपूर, अमरावती, औरंगाबाद इ. विविध शहरांतून प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या लेखांचे संकलन या पुस्तकात डॉ मांडवकरांनी केलेले आहे.

‘ खैरे–धनोजे यांचे क्षत्रियत्व ’ आणि ‘ तांबोळ ’ हे दोन लेख सोडल्यास इतर सर्व लेखांमध्ये कोणत्या तरी आदिवासी जमातीतील धार्मिक, सांस्कृतिक व्यवहारांचा अगर त्यांच्या शब्दांमधून ध्वनित होणाऱ्या रीति-रिवाजांचा परामर्ष घेतलेला आहे.

‘ आंग्राराम ’मध्ये जे विश्लेषण केलेले आहे त्यावरून कोलाम व तत्सम इतर आदिवासींमध्ये पूर्वीपासून ग्रह, तारे इ. खगोलातील फिरत्या घटकांचा अभ्यास असावा असे दिसून येते. विदर्भातील माडिया गोंड तसेच धारणी विभागातील कोरकूंमध्ये ग्रह–ताऱ्यांचा अभ्यास व त्यांचा मानवी व समाजजीवनावर होणारा परिणाम याचा अत्यंत प्रगत विचार होता हे अभ्यासकांना आढळले आहे. कोलामही त्यात मागे नाहीत हे डॉ. मांडवकरांनी दाखविले आहे. विवाहाच्या विधीशी संबंधित कट्यार, घोडा, पताका, पर्णू आदि प्रतीकांचा आदिमांच्या सामाजिक प्रथा–परंपरांशी असलेला संबंध व त्यातून प्रगट होणारे, परंपरागत जतन केलेले गुण यांचे सुंदर विवेचन या संग्रहात आढळते.

परधान हे गोंडांचे भाट. धार्मिकदृष्टचा त्यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. परधानांचे सण व उत्सव यांचे लोकगीतांसह वर्णन त्यांनी केलेले आहे.

कोरकूंचे सण आणि उत्सव तसेच कोरकू व कोलामांची दैवते या दोन लेखांमधूनही आदिमांच्या देव-देवता, श्रद्धा, पूजाप्रकार व त्यानिमित्त होणाऱ्या सणांची माहिती आहे. कोरकू दैवतासंबंधीच्या लोककथा, त्यांच्या समाजरचनेविषयीच्या मुलांच्या ज्ञानात भर टाकतात. भवई (भवरी), जिवती इ. वैशिष्टयपूर्ण सण तर बाह्य संस्कृतीशी जवळीक सांगणारे. दसरा, दिवाळी, होळीसारखे सण यांचीही माहिती दिली आहे. डॉ. मांडवकरांचा अभ्यास आणि संबंधित कोलाम–कोरकू आदिवासींशी विविध कारणांनी आलेला त्यांचा वैयक्तिक संबंध लक्षांत घेता त्यांनी दिलेली माहिती ही समाजशास्त्र व मानवशास्त्राच्या दृष्टीने अधिकृत मानावयास हरकत नाही.

आदिमांची संस्कृती अत्यंत अभिजात व मौलिक आहे याची जाणीव तथाकथित प्रगतिपर समाजास होणे ही काळाची गरज आहे. या दृष्टीने डॉ. मांडवकरांचे हे पुस्तक ही अशा वाङ्मयात महत्त्वाची भर आहे. अभ्यासकांना व हौशी वाचकांना, साध्या, सरळ भाषेत लिहिलेल्या या पुस्तकाची आदिमांच्याजवळ जाण्यास मदत होईल हे निश्चित. □

‘ आदिम ’ : ले. डॉ. भाऊ मांडवकर
सेवा प्रकाशन, अमरावती
१९८१, पृ. १०७. किंमत रु. १५।–

BEST

COMPLIMENTS

FROM

# M/s. VIDHARBHA RASSI AND ROPE INDUSTRIES

**Nagepalli 442 703**

Tal. Aheri :: Dist. Chandrapur

(पान २४ वरून)
ते नव्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेच्या निकृष्ट पातळीवर जाऊन स्थिरावतील. ह्या पातळीवर बहुधा स्थानांतर केलेले आदिवासी आणि इतर ग्रामीण लोक असतील.

## काही मूलभूत संकल्पनांचा पुनर्विचार

वनविकास आणि आदिवासींची सर्वांगीण प्रगति ही दोन्ही सारख्याच महत्त्वाची उद्दिष्टे मानली तर वरील दोन आराखड्यात वर्णन केलेली टोकावरची स्थिती टाळता येणे शक्य आहे. असे करताना या मार्गात येणाऱ्या सर्व समस्यांचे यथायोग्य आकलन झाले पाहिजे आणि आवश्यक तेथे काही महत्त्वाच्या बाबतीत जुन्या कल्पनांना आधुनिक कालानुरूप स्वरूप दिले पाहिजे. अशा काही मुद्द्यांची चर्चा पुढील परिच्छेदात केली आहे.

जंगलातील किरकोळ उत्पादन : खूप प्राचीन काळापासून आदिवासी समाज हा जंगलापासून मिळणाऱ्या लहानसहान वस्तूंचा आपल्या उपजीविकेकरता मोठ्या प्रमाणावर उपयोग करीत आला आहे. शास्त्रीय वनव्यवस्थापनाच्या सुरुवातीच्या अवस्थेत आदिवासींच्या जंगलापासून मिळणाऱ्या विविध जीवनोपयोगी लहानसहान वस्तूंवरचा दैनंदिन गरजांपुरता हक्क मान्य झालेला होता. क्वचित अशा वस्तू विकण्याचीही त्याला परवानगी असे. जेमतेम उदरनिर्वाह हेच जेव्हा अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट होते तेव्हा लोकांना रोख पैशाची विशेष गरज भासत नसे. अशा किरकोळ वस्तूंपासून मिळणारा पैसा जेमतेम स्थानिक उपयोगाला पुरा होत असे. दुर्गम वनविभागाचे प्रगत भागाशी दळणवळण सुरू झाल्यानंतर वरील परिस्थिती बदलली. आदिवासींच्या जीवनातील उपभोग्य वस्तूंमध्ये हळूहळू विविधता येत आहे. परिणामतः त्याची जंगलातील किरकोळ उत्पादनाची दैनंदिन जीवनातील गरज घटत आहे. ह्या विविध वस्तू घेण्याकरिता त्याला वाढत्या प्रमाणात रोख पैसा लागतो आणि हा पैसा मिळवण्यासाठी त्याला जंगलातील विविध वस्तू आता मोठ्या प्रमाणात हव्या असतात.

हे होत असताना बाह्य जगाशी जंगलातील विविध किरकोळ उत्पादनांची मागणी वाढत आहे व त्यामुळे त्या वस्तूंना आता किंमतही चांगली येते. महुआसारख्या काही वस्तूंचा प्रगत भागातील लोक आदिवासींच्यापेक्षा निराळ्या पद्धतीने उपयोग करतात. जसजशी या वस्तूंची किंमत वाढत जाते तसतसा या वस्तूंचा सरकारी तिजोरी भरण्याकरता उपयोग करण्याचा मोह शासनाला होऊ लागतो. त्यामुळे वर्चस्वाची कल्पना उद्भवली. परिणामतः आदिवासींच्या किरकोळ वनोत्पादनावरील हक्काला मर्यादा घालण्यात येऊ लागल्या व तो आता फक्त घरगुती वापरापुरताच ह्या वस्तू फुकट घेऊ शकतो. अशा रीतीने आदिवासी आणि शासन ह्यांच्यामध्ये जंगलउत्पादनाच्या उपभोगहक्काबाबत स्पर्धा निर्माण झाली; पण दोघांच्या हक्कमर्यादांमधील सीमारेषा अस्पष्टच राहिली. अशा वस्तू गोळा करण्याकरता आदिवासीला मोबदला देताना फक्त त्याच्या कष्टाचाच विचार केला जातो. दूर अंतरावरून अशा वस्तू आणून सरकारला देण्याच्या बाबतीत त्याने त्या वाहून नेण्याकरता केलेल्या श्रमांचा विचार केला जात नाही. दुर्गम भागातील आदिवासींना अशा वस्तू जमा करून दूरच्या भागात नेऊन विकणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही.

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत झालेले स्थित्यंतर दुर्लक्षिल्यामुळे वरील परिस्थिती निर्माण होते. असे गृहीत धरले जाते की, आदिवासी पूर्वीसारखाच वस्तूंच्या अदलाबदलीवर आधारित अर्थव्यवस्थेत राहतो आहे. वनोत्पादनाकरिता ठेकेदारी पद्धत सुरू झाल्यापासून शासनाची वनसंपत्तीवरील पकड अधिकच घट्ट झाली आहे. ह्या ठेकेदारांनी आदिवासींच्या हक्कावर अतिक्रमण करण्यास सुरुवात करून पुढे त्यांच्या हक्काला आक्षेप घेत शेवटी ते हक्क नष्टप्राय झाले आहेत. काही राज्यांनी धोरणात्मक निर्णय घेऊन राज्याचा किरकोळ वनोत्पादनावरील आपला हक्क सोडून आदिवासींना ह्या वस्तूंच्या उपभोगाची अनिर्बंध मुभा दिलेली आहे. राष्ट्रीय पातळीवर ह्याबाबतीत बहुमत आदिवासींच्या बाजूचे आहे; परंतु ह्या दृष्टिकोनातून अंमलबजावणी सर्व ठिकाणी अजून होत नाही. या एका उपाययोजनेचा आदिवासींच्या आर्थिक जीवनावर फार दुष्ट परिणाम होईल. कारण त्यामुळे या कामावर कष्ट करणाऱ्याला त्याच्या कष्टाचे पुरेपूर फळ लगेच मिळू लागेल. म्हणून आदिवासींच्या अर्थव्यवस्थेच्या संक्रमणावस्थेत किरकोळ वनोत्पादनाकडे शासनाने राजस्वाचे साधन म्हणून न बघता आदिवासींची आर्थिक स्थिती भरभक्कम करण्याचे एक साधन म्हणून पाहिले पाहिजे.

जंगलातील किरकोळ उत्पादनाकडे राजस्वाचे साधन म्हणून पहायचे नाही असे धोरण ठरवल्यावर या किरकोळ वस्तूंच्या उत्पादनाच्या इतर बाबींकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. सध्या आदिवासी फक्त या विविध वस्तू गोळा करण्यापुरतेच त्याकडे लक्ष देतो. क्वचित तो हे उत्पन्न अशा तऱ्हेने घेतो की, त्यापासून त्या वस्तू देणाऱ्या झाडांना हानि पोहोचते. अशा वनस्पतींची निगा राखणे, मेलेल्या झाडांच्या जागी नवी लागवड करणे इत्यादि बाबींकडे पूर्ण दुर्लक्ष झाल्यामुळे काही वस्तू मिळेनाशाच होतात.

जंगलांची नवीन लागवड करण्याच्या योजनेमध्ये अशा किरकोळ उत्पादन देणाऱ्या झाडांच्या लागवडीला स्थानच नसते. असे स्थान देण्याच्या दृष्टीने ठाम धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या अंमलबजावणीत आदिवासीला सहभागी करून घेतल्याने तो निव्वळ पीक घेणारा न राहता अशा झाडींची जोपासना करण्याची जबाबदारी घेऊ लागेल. याने वनांच्या अर्थव्यवस्थेच्या घडणीत कालांतराने इष्ट असा बदल घडून येईल व तो आदिवासींच्या आर्थिक जीवनाशी अधिक सुखदायी होईल.

**मर्यादित मालकी आणि उपभोगाचा हक्क :** वनसंपत्तीवरील परस्पर विरोधी हक्कदार आणि वनसंपत्ती वरील मालकीबद्दल विविध दृष्टिकोन ह्यामध्ये सामंजस्य निर्माण करण्याच्या समस्येला आपल्याला तोंड द्यावे लागते. वनखात्याला आदिवासी हा वनसंपत्तीवर हक्क नसलेला आगंतुक वाटतो तर आदिवासीला वास्तविक आपल्या मालकीच्या वन संपत्तीमध्ये कंत्राटदार व वनखाते हे नवीनच उद्भवलेले प्रतिस्पर्धी वाटू लागतात.

बनसंपत्तीचा सतत वाढत्या प्रमाणात उपभोग/विनिमय चालूच असतो; पण आदिवासीचे ह्या वनसंवर्धनाच्या शास्त्रीय प्रक्रियेत भागीदार होण्यासाठी मन वळवण्याचा मुळीच प्रयत्न केला जात नाही. ज्या भागात आदिवासींच्या मालकीची बरीच जंगल जमीन आहे, अशांनाही शास्त्रशुद्ध वनसंवर्धनाचा अवलंब करण्यास प्रवृत्त केले जात नाही. कालांतराने त्यांचे जंगल पूर्णपणेपणे नष्ट होते आणि त्या ठिकाणी माळरान राहाते.

नवनवीन वृक्षांची लागवड केली तरच आपली आर्थिक स्थिती सुधारेल ह्याची खात्री पटून तो वनसंवर्धनात आत्मीयतेने लक्ष घालू लागेपर्यंत वनसंपत्तीची लूट आटोक्यात आणता येणार नाही. म्हणून याबाबतीत आपली उद्दिष्टे निश्चित केली पाहिजेत. प्रचलित काळात संघर्ष उद्भवतो. कारण दोन विरुद्ध टोकांची परिस्थिती अस्तित्वात असते. पहिल्या प्रकारात वनव्यवस्थापन पूर्णपणे शासनाच्या अधिकारात असून तिथे आदिवासींना साध्या दैनंदिन अपरिहार्य गरजांकरता सुद्धा वनांचा उपभोग घेण्यास परवानगी नसते. दुसऱ्या प्रकारात आदिवासी काही जंगल बळकावतो, तेथील वृक्षराजी पूर्णतः नष्ट करतो आणि मोकळ्या जमिनीच्या मगदुराचा व त्यापासून काय आर्थिक उत्पन्न होईल ह्याचा विचार करता शेती करतो. व्यापारी पायावर जंगलांचावापर सुरू झाल्यापासून वनोत्पादनाकडे राजस्व वाढत्या प्रमाणावर मिळवण्याचे एक साधन म्हणून पाहिले जाते ही गोष्ट खरी असली तरी हे उघड आहे. की,

वनसंवर्धनाचा प्रमुख हेतु वाढत्या क्षेत्रावर वृक्ष वाढवणे हाच असला पाहिजे. त्याच्या किंवा त्यांच्या आसमंतातील जमिनीवर वाढत्या वृक्षराजींची आवश्यकता आदिवासीला पटेल अशी परिस्थिती आपल्याला निर्माण करता येईल काय ?

आदिवासी व्यक्तींना किंवा जमातींना नव्या वृक्षसंपत्तीमध्ये भागीदारी देण्याने असे करणे शक्य आहे. नैसर्गिक समतोल पुनः स्थापित करण्याच्या दृष्टीने वृक्षांच्या लागवडीकरतां वापरता येण्याजोगी पिकांच्या दृष्टीने निकृष्ट दर्जाची खूप जमीन देशात उपलब्ध आहे. पर्यावरण–समतोल राखण्याचे उद्दिष्ट साधावयाचे असेल तर या कामावर केवढाही खर्च करावा लागला तरी तो करणे आवश्यक व समर्थनीय ठरेल. केवळ पैशाचीच या मोठ्या कामाकरता चणचण आहे असे नव्हे तर लोकांमध्ये या कार्याबद्दल आत्मीयता आणि आस्था असणेही अत्यंत आवश्यक आहे. आदिवासी खरा जंगलचा राजा. त्याला वृक्षांबद्दल नैसर्गिक प्रेम असते आणि तो वृक्षलागवडीचे काम सहजरीत्या करू शकतो. तेव्हा आदिवासीला या कार्यात उत्साहीपणे भागीदार करून घेणे कठिण जाऊ नये.

त्याला नवीन निर्माण होणाऱ्या संपत्तीत मर्यादित भागीदारी दिल्यास तो ह्या कार्यक्रमात नक्कीच उत्साहाने सहभागी होईल. वृक्षांचे संगोपन करताना, तसेच त्यांचा स्वतःकरता उपयोग करताना शासनाने दिलेला तांत्रिक सल्ला मानण्याचे त्याच्यावर बंधन असावे.

काही राज्यांमधला ' टोंगिया ' शेतीचा अनुभव वरील सूचनेला पोषक नाही. कारण तिथे वापरावयास दिलेल्या जमिनी आदिवासी बळकावून बसले; परंतु वरील सूचना ' टोंगिया ' प्रयोगापेक्षाही भिन्न आहे. येथे शेती करण्याचा प्रश्नच नाही. सुरुवातीपासूनच आदिवासीला वृक्षारोपणात भाग घ्यावयाचा आहे, ह्या निर्णयामध्ये तो सहभागी असेल आणि नवीन तयार होणाऱ्या वनसंपत्तीवर त्याची मालकी असेल याची त्याला जाणीव असेल. ह्यामुळे नवीन तयार होणाऱ्या वनराजीबद्दल त्याला आस्था वाटेल. कारण ती पुढे कायमची त्याच्या उपजीविकेचे साधन होणार आहे.

**प्रासंगिक रोजगार आणि आदिवासी विकास :** आदिवासींच्या सर्वांगीण विकासाची सर्वसमावेशक योजना अजून आकार घेत नाही. कारण जंगलामध्ये त्यांना केवळ प्रासंगिक मजुरी देणे ही गोष्टही त्यांच्या प्रगतीचे एक गमकच समजले जाते. जंगलापासून उत्पादन काढण्याच्या प्रक्रियेत लागणाऱ्या खर्चाचा बराच मोठा भाग रोजंदारीवरच खर्च होतो, ही गोष्ट खरी आहे; पण ह्या रोजगार बारमाही नसून प्रासंगिक असतो आणि हा विस्तृत क्षेत्रावर विखुरलेला असल्यामुळे प्रत्येक आदिवासीच्या वाट्याला तो नियमितपणे येईलच याची खात्री नसते. या रोजंदारीचा कितवा भाग आदिवसीच्या पदरात पडेल हेसुद्धा त्या क्षेत्रातील एकंदर उपलब्ध मनुष्यबळावर अवलंबून असते. ही रोजंदारी आदिवासीला मिळते तीसुद्धा वनोत्पादनप्रक्रियेचा एक अपरिहार्य भाग म्हणून. आदिवासींच्या हिताला त्यात मुळीच स्थान नसते. आदिवासीच्या दीर्घ कालीन आर्थिक प्रगतीचा त्यात मुळीच विचार केला जात नाही. आदिवासींच्या विकासाकरिता म्हणून राबविल्या जाणाऱ्या वृक्षारोपण–योजनांमध्येसुद्धा स्थानिक आदिवासींना रोजगार देणे हेच मुख्य ध्येय मानले जाते. त्याला रोजगार मिळतो; पण शेवटी जी वनसंपत्ति निर्माण होते त्यावर शासन पूर्ण मालकी सांगते.

आदिवासी विकासकार्यक्रमाचा मुख्य उद्देश प्रत्येक आदिवासी कुटुंबाला एका निश्चित कालमर्यादेत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे हा असतो. तेव्हा कोणत्याही विकासकार्यक्रमाला तेव्हाच आदिवासी विकास कार्यक्रम म्हणता येईल, जेव्हा त्या कार्यक्रमाने त्या क्षेत्रातील आदिवासींची अर्थव्यवस्था स्थिर आणि भक्कम होईल. या कार्यक्रमात शासनाकडून आदिवसींना दिलेल्या आर्थिक मदतीचा उपयोग त्यांच्या श्रमातून त्यांच्या मालकीची भांडवली स्वरूपाची उत्पादक मालमत्ता निर्माण करण्याकडे केला गेला पाहिजे.

ज्या वृक्ष लागवड कार्यक्रमात नवे वृक्ष आणि त्यापासून मिळणाऱ्या दैनंदिन गरजेच्या वस्तू यामध्ये मर्यादित स्वरूपाचा उपभोगहक्क आदिवासींना दिला जातो तोच कार्यक्रम खऱ्या अर्थाने ' आदिवासी विकास कार्यक्रम ' या नामाभिधानाला पात्र ठरेल. उलटपक्षी ज्या कार्यक्रमात आदिवासीचे स्थान केवळ मजुराचे असते व निर्माण होणारी वनसंपत्ती पूर्णतः शासनाच्या मालकीची होते त्या योजनेला निव्वळ वनसंवर्धन-योजना म्हणणे उचित ठरेल.

**जंगलात काम करणारे मजूर :** राष्ट्रीय आर्थिक उलाढालीत जंगलमजुराचे विशिष्ट स्थान हाही एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. जंगलापासून उत्पादन करण्याचा उद्योग हा एक सुसंघटित उद्योग असला तरी त्या उद्योगात काम करणारा मजूर मात्र केवळ प्रासंगिक काम मिळणारा व असंघटित आहे. दुर्दैवाने ज्या जमाती स्वत:ला जंगलाचे मालक समजत आल्या त्यांच्याकडून जंगलातून उत्पादनाचे काम करवून घेतांना त्यांना कोणत्याही प्रकारची विशेष सवलत दिली जात नाही, हा दैवदुर्विलास आहे. जनतेच्या पैशावर उभारलेल्या अवजड उद्योगांच्या व्यवस्थापनात मजुराला भागीदारी देण्याची आधुनिक कल्पना वरील व्यवहाराच्या अगदी विरुद्ध आहे. अशा उद्योगात प्रत्येक व्यक्ति कुशल किंवा अकुशल कामगार म्हणूनच नोकरी करीत असतो. नव्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात भांडवलप्रधान अवजड उद्योगातील सुसंघटित कामगार हा एक प्रस्थापित हितसंबंधी होतो आणि उद्योगातून निर्माण होणाऱ्या संपत्तीच्या मोठ्या भागावर हक्क सांगू लागतो. वनोत्पादनक्षेत्रात मात्र वनसंपत्तीवर शासन आपला पूर्ण मालकी हक्क सांगत असल्यामुळे आणि तिथे काम करणारा कामगार हा विखुरलेला अशिक्षित व असंघटित असल्यामुळे त्याला व्यवस्थापनात भागीदारी व आधुनिक तंत्रवापरामुळे झालेल्या वाढीव उत्पन्नात वाटा मिळत नाही. ही परिस्थिती अत्यंत अन्यायकारक आहे आणि ती बदलणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी वनसंवर्धनाच्या कार्यक्रमात स्थानिक आदिवासी मनुष्यबळाचा पुरवठा करतात तेथे त्यांना मिळणाऱ्या नफ्यात वाटेकरी

आणि व्यवस्थापनात सहभागी म्हणून स्थान दिले गेले पाहिजे. त्यांना केवळ पोटार्थी प्रासंगिक मजूर म्हणून वापरून वाटेल तेव्हा त्यांना कामावरून काढून टाकण्याची प्रथा वनविभागाने बंद केली पाहिजे. ह्या दृष्टिकोन अंमलात आणला तर वनविभागाच्या कार्यक्रमात आदिवासी आणि शासन यांच्यामध्ये एक निकोप भागीदारीचे नाते निर्माण होऊन आदिवासी विकास आणि वनविकास एकमेकांना पूरक ठरतील.

### व्यवस्थापनात लोकांचा सहभाग

वरील चर्चेतून कित्येक वादग्रस्त मुद्दे समोर येतात आणि त्यांच्या बाबतीत सर्वप्रथम धोरणविषयक ठाम निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. व्यवस्थापनात भागीदारीचा प्रश्नच पाहू या. जोपर्यंत कामगार हा केवळ प्रासंगिक आणि हंगामी नेमणुकीवर काम करतो तोपर्यंत त्याला भागीदारी देण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही; पण जंगलातील कामाचे स्वरूप असे आहे की, तिथे वर्षभर कामच नसल्यामुळे कायम स्वरूपाचा कामगार नेमणे व्यवहार्य नाही. म्हणून कामगाराला भागीदारी द्यावयाचीच असेल तर प्रथम त्या कामगारांचे वेगळ्या स्वरूपात संघटन करावे लागेल. उदा. अशा कामगारांची सहकारी संस्था स्थापन करून एखाद्या वनक्षेत्रातील सर्व काम तेथील कामगारांच्या सहकारी सोसायटीकडे सुपूर्द केले तर ती संस्था आपल्या सभासदांच्या स्वतःच्या कामाची आणि जंगलाच्या कामाची अशा तऱ्हेने आखणी करील की, प्रत्येक कामगाराला वर्षभर स्वतःच्या शेतीवर किंवा जंगलात नियमित काम मिळत राहील. अशा प्रकारचे सामुदायिक निर्णय घेण्याची आदिवासींना सवय असते. अशा व्यवस्थेमध्ये प्रत्येक कामगार हा प्रासंगिक नोकरच असेल पण सगळ्या गटाचा घटक म्हणून जंगल कामाच्या व्यवस्थापनात त्याचा सहभाग असल्यामुळे त्याला त्या कामाबद्दल कायमची बांधिलकी वाटेल. व्यवस्थापनात आणि कामगारात विचारविनिमयाची निरोगी प्रथा निर्माण होण्यास याने मोठीच मदत होईल. उभय पक्षी मान्य अशा तत्वावर नफा वाटून घेण्याची पद्धतसुद्धा तयार करता येईल. काही राज्यात असे करण्यात आले आहे.

वनसंपत्तीवर आधारित इतर उद्योगांनासुद्धा वरील तत्व लागू करता येईल. कागदाच्या गिरणीचे उदाहरण घेऊन पाहू या. ह्या उद्योगात चार प्रकारचे हितसंबंध गुंतलेले असतात. (१) वनविभागाचे प्रशासक (राज्यशासन) (२) उद्योगाचा व्यवस्थापकवर्ग (३) औद्योगिक कामगार आणि (४) वनमजूर. ह्यापैकी पहिले दोन घटक आपल्या हितसंबंधाना पोषक अशा प्रकारचे करार मजूरवर्गाशी करतात. कामगारांचा पुरवठा आणि त्यांना मिळणारे वेतन इतर सवलती ह्या गोष्टी मात्र बाजारातील श्रमशक्तीची मागणी व पुरवठा ह्या दोन गोष्टीवरून ठरत असतात. शासनाला त्याच्या मालकी हक्काबद्दल योग्य तो नफ्यातला वाटा आपोआपच मिळतो. व्यवस्थापनही आपल्याला योग्य तो नफा राखून ठेवण्याची दक्षता घेते. औद्योगिक मजूरही आपला सामूहिक सौदा करण्याच्या अधिकाराच्या बळावर हळूहळू नफ्यामधील योग्य वाटा मिळवू शकतो हा मजूर नफ्यात जेवढा भाग मिळवण्यात यशस्वी होईल त्याचा परिणाम शासनाला मिळणाऱ्या हिश्शावर होतो. शेवटचा घटक जंगलमजूर हा मात्र पूर्णपणे पराधीन आणि दबलेला असतो कारण त्याच्या पाठीशी संघटीत शक्ति नसते. स्थानिक अकुशल मजूरवर्गाला आपल्याला कितपत काम मिळेल ह्याची शाश्वती नसते कारण व्यवस्थापन अधिक कुशल आणि विश्वासार्ह कामगार बाहेरून आणणे अधिक पसंत करण्याची नेहमीच शक्यता असते. अशा परिस्थितीत जंगलातील उद्योगांचे स्वरूप व्यवस्थापनाची सोय आणि अर्थव्यवस्थेतील इतर परिस्थितीवर अवलंबून असते.

स्थानिक लोकांना अर्थोत्पादक उद्योगामध्ये भागीदार करून घ्यायचे ठरले वर व्यवस्थापनामधील आणि स्थानिक लोकांमधील परस्पर संबंध निराळ्या प्रकारे ठरवावे लागतील. सामान्य उद्योगाला नैसर्गिक कच्चा माल पुरवण्याचे काम एखादी कंपनी अथवा व्यक्ति ज्याप्रमाणे करते. त्याचप्रमाणे स्थानिक जनता वनोत्पादनावर आधारित उद्योगाला वनोत्पादित कच्चा माल पुरवठा करील ज्या जंगलातील उत्पादनावर प्रक्रिया करण्याचा उद्योग काढावयाचा असेल ते जंगल स्थानिक जनतेला अथवा त्यांनी स्थापलेल्या कामगार सहकारी संस्थेला भाडेपट्ट्याने दिल्यास ते कारखान्याच्या व्यवस्थापनाशी योग्य तो करार करून ठराविक वेळी ठराविक प्रमाणत कच्चा माल पुरवण्याची हमी देऊ शकतील. जंगल विकास योजनाच्या मूळ आराखड्यामध्येच वरील प्रकारच्या व्यवस्थेचा अंतर्भाव करता येईल. असे केल्यास स्थानिक कामगार आपली स्वतःची शेतीची कामे, जंगलातील कच्चा माल काढण्याचे काम आणि

कारखान्याची कच्च्या मालाची वेळोवेळची गरज या सगळ्यांची योग्य सांगड घालून आपले कामाचे वेळापत्रक तयार करू शकतील. कागदाच्या गिरणीला बांबू लागतो. आदिवासीकडे जर नियमित बांबू पुरवठा करण्याची जबाबदारी सोपवली तर ते लहानलहान क्षेत्रात अशा तऱ्हेने बांबूची लागवड व कापणी आखतील की, प्रत्येक क्षेत्रातील स्थानिक मजूर त्या क्षेत्राची कापणीची वेळ येईल तेव्हा पुरेशा संख्येने उपलब्ध असेल व काम सर्वांना पुरुही शकेल. उलट बांबू पिकणारे क्षेत्र गिरणीकडे भाडेपट्ट्याने दिले असेल तर व्यवस्थापनाच्या दृष्टीने त्यांना लहानलहान क्षेत्रात बांबूची लागवड करणे परवडणार नाही म्हणून प्रत्येक उपक्षेत्राची ४ वर्षांनी कापणीची वेळ येईल तेव्हा स्थानिक मजूरांना न झेपणारे काम थोड्या वेळात करावयाचे असेल आणि म्हणून मजुरांची आयात करणे अपरिहार्य होईल, अशा प्रकारच्या कार्यपद्धतीने स्थानिक जनतेला काही फायदा होणार नाही.

पहिल्या प्रकारच्या पद्धतीत बांबूच्या लागवडीच्या संबंधात निर्णय घेण्याचा हक्क स्थानिक लोकांकडे असल्यामुळे त्या गिरणीमुळे स्थानिक क्षेत्राच्या होणाऱ्या आर्थिक भरभराटीत ते वाटेकरी होतील.

वरील उदाहरणे जंगलतोड आणि वनोत्पादनावर आधारित उद्योगांचे व्यवस्थापन यामध्ये स्थानिक मजुराला भागीदारी देण्यासंबंधीची आहेत. शास्त्रशुद्ध वनसंवर्धनाचे प्रशासन ही एक अधिक व्यापक संकल्पना आहे.

**प्रचलित वनखात्याच्या प्रशासकीय प्रभावपद्धती चालू शतकाच्या सुरुवातीपासून विकसित होत आल्या असून त्यामध्ये लोकांना गौण स्थान असून त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण प्रशासन करीतच असते असे गृहीत धरले जाते.**

वनसंवर्धन व जंगलतोड यांच्या बाबतीत उद्भवणाऱ्या समस्या आंतरविभागीय चर्चेद्वारा सोडवल्या जाव्यात अशी अपेक्षा असते. लोकांनी त्यांच्या अडचणी त्या त्या खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे फक्त मांडावयाच्या असतात. काही ठिकाणी आता लोकप्रतिनिधींशी विचारविनिमय करण्याची पद्धत सुरू करण्यात आली आहे. कुठेकुठे जिल्हा सल्लागार समितीचा सल्ला घेतला जातो. प्रत्येक खात्याच्या व्यवस्थापनात आता प्रत्येक खात्याची अशी तांत्रिक शास्त्रीय वैशिष्ट्ये अंगभूत असतात आणि म्हणून त्याचे व्यवस्थापन विशेषज्ञापुरतेच मर्यादित राहाते. जेव्हा स्थानिक लोकांच्या गरजांचीपूर्तीसुद्धा पैशात मोजली जाते तेव्हा दैनंदिन जीवनाकरता सरकारी जमीन किंवा जंगलांच्या उपयोगाचा मर्यादित हक्क हा सुद्धा जंगलावरील एक आर्थिक बोजा प्रशासकांना वाटू लागतो. निरनिराळ्या क्षेत्रात सुस्पष्टपणे विभागलेली अत्याधुनिक अर्थव्यवस्था या मागासलेल्या लोकांवर लादली जाते. परिणामतः प्रशासन आणि स्थानिक रहिवासी ह्यांमधील परकेपणाची दरी रुंदावते.

प्रक्रियेची ही दिशा बदलली पाहिजे. वनसंगोपनाला केन्द्रस्थानी मानून एखाद्या विभागाच्या विकासाची उद्दिष्टे ठरवताना त्यामध्ये स्थानिक रहिवाश्यांनी आत्मीयतेने भाग घ्यायला हवा असेल तर या योजनांच्या कार्यवाहीसंबंधी व्यवस्थापकीय निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांना स्थान असले पाहिजे. या दृष्टीने स्थानिक आस्थापनामध्ये आवश्यक ती व्यवस्था केली पाहिजे. प्रत्येक प्रकल्पक्षेत्राकरता किंवा जिल्ह्याकरता वनव्यवस्थापन सल्लागार समिति नेमून हे करता येईल ही समिती १) वनसंगोपनाच्या दीर्घ मुदतीच्या ढोबळ आराखड्याला संमति देणे आणि ह्या आराखड्यानुरूप वार्षिक व पंचवार्षिक कार्यक्रम निश्चित करणे आणि २) योजना कार्यान्वित होत असताना वनमजूर आणि व्यवस्थापन ह्यामधील संबंध व्यक्तिगत व सामूहिक वृक्षांची नवी लागवड आणि जंगलातील किरकोळ उत्पादनावरील प्रक्रिया व विक्री ह्यासंबंधी उद्भवणारे प्रश्न ह्या सर्वांवर देखरेख करणे ही कामे करील. अशाच समित्या विभागीय व राज्यस्तरावरही नेमता येतील.

**वनसंवर्धन शास्त्रावर आधारित अर्थव्यवस्था :** वनसंवर्धनप्रधान अर्थव्यवस्थेचा यापूर्वी कित्येक ठिकाणी उल्लेख केला आहे. ह्या ठिकाणी वनशास्त्राधारित अर्थव्यवस्था म्हणजे काय हे जरा विस्ताराने पहाणे उपयुक्त ठरेल. आपली नियोजनपद्धती ढोबळ मानाने एकांगी असते असे म्हणणे चुकीचे होणार नाही. योजनेतील विविध क्षेत्रे एकमेकांपासून अलिप्त असतात. उदाहरणार्थ आपले नियोजन, वनसंरक्षण, अर्थोत्पादक वृक्षारोपण, शेतीविकास किंवा धंदेविकास अशा एकमेकांत मुळीच देवाण-घेवाण नसणाऱ्या कप्प्यांत विभागलेले असते. एखाद्या क्षेत्राकरिता वरीलपैकी एखादी योजना निवडली की, तिच्यावर सर्व लक्ष केन्द्रित केले

जाते. त्याचा स्थानिक जीवनाच्या इतर बाबींवर काय परिणाम होईल याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. पुष्कळदा एखाद्या क्षेत्रात दोन योजना राबविल्या जातात की ज्या एकमेकीला पूरक ठरण्याऐवजी घातुकच ठरतात. एखाद्या तुरळक लोकवस्तीच्या क्षेत्रात जर शेतीविकास आणि वनविकास अशा दोन योजना एकाच वेळी सुरू केल्या तर बाहेरून मजुरांची आयात करावी लागेल आणि अशी आयात त्या क्षेत्राच्या लोकवस्तीचे स्वरूपच बदलून टाकील आणि ही तात्पुरती वाढलेली लोकसंख्या त्यांच्या वाढत्या दैनंदिन गरजा पुरवण्याकरता वनविकासालाच बाधक ठरू शकेल. योजना आखताना एकांगी दृष्टिकोण टाकून सर्वंकष नियोजन केल्यास ह्या अडचणी टाळता येतील.

सध्याच्या नियोजनात शेतीप्रधान अर्थव्यवस्था आणि शासकीय मालकीची जंगलव्यवस्था ह्या परस्परांपासून पूर्णपणे अलग, स्वतंत्र मानण्याची पद्धत आहे. हा दृष्टिकोन सर्वंकष नियोजनाच्या कल्पनेत प्रथम सोडून दिला पाहिजे. कोणत्याही आदिवासी व्यक्तीपुढे दोन पर्याय असतात. पहिला म्हणजे स्वतःच्या मालकीची जमीन मिळविणे आणि दुसरा म्हणजे अधूनमधून मिळणारी रोजगारी करणे. वनविभागापुढेही दोन पर्याय असतात. ते म्हणजे सगळ्या उपलब्ध जमिनीवर जंगल वाढविणे किंवा काही भाग काही व्यक्तींना शेतीकरता मोकळा सोडणे. पूर्वी उल्लेखिलेला तिसराही एक पर्याय वनविभागापुढे असतो, तो म्हणजे त्या वनक्षेत्रातील लोकांना जंगलातील वनस्पती आणि त्यापासून मिळणाऱ्या विविध वस्तूंमध्ये काही मर्यादित स्वरूपाचे उपभोगहक्क देणे. हळूहळू त्याचा हा हक्क निव्वळ ह्या विविध वस्तू जमा करण्यापुरता मर्यादित न ठेवता त्याला अशा वस्तू देणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्याचा अधिकार देणे योग्य ठरेल. या विविध वस्तूंचे पीक घेताना शास्त्रीय दृष्टीचा अवलंब करून ही खबरदारी घ्यावी लागेल की, व्यक्तीच्या तातडीच्या गरजा भागविताना समाजाच्या दीर्घकालीन हितावर त्याचा अनिष्ट परिणाम होणार नाही. तातडीच्या वैयक्तिक गरजा आणि समाजाचे दीर्घकालीन हित ह्यामध्ये समन्वय साधायचा असेल तर ठेकेदारी पद्धतीला रामराम ठोकणे आवश्यक आहे. कारण ठेकेदाराची दृष्टी आजमिळणाऱ्या जास्तीत जास्त नफ्यावर असते. अनुकूल परिस्थिती असल्यास काही व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या वनस्पतींची शास्त्रशुद्ध लागवड तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करू देण्यास हरकत नाही. वनराजी विरळ झालेल्या क्षेत्रात तेथील हवापाण्याला अनुरूप जातींच्या वृक्षांची लागवड करायला हवी. ह्या नवीन वृक्षांतील काही भाग शासनाने स्वतःकरता राखून ठेवावा आणि उरलेल्या भागात अंशतः स्थानिक जनतेला आणि व्यक्तींना भागीदारी द्यावी.

वरीलपैकी कोणतीही पद्धती वापरली तरी खऱ्या अर्थाने ते वनसंवर्धनच होणार आहे. कारण शेवटी जंगलातील वृक्षांच्या संख्येत वाढ हेच उद्दिष्ट येथेही आहे. हे करताना आदिवासींना व्यक्तिशः अथवा त्यांच्या सहकारी संस्थांमार्फत भागीदारी दिल्यास त्यांना त्या कार्याबद्दल आस्था निर्माण होईल. कारण त्याच्या यशापयशामध्ये त्यांचाही वाटा असेल. निव्वळ एवढेच करून मात्र आदिवासींची सर्वांगीण उन्नती साधणार नाही. वरील प्रकारच्या वनसंवर्धनाची आदिवासींच्या इतर आर्थिक व्यवहारांशी योग्य सांगड घालणेही आवश्यक आहे. उदा. कुरणांची जोपासना करण्याचा कार्यक्रम हाती घेतला तर त्याबरोबर पशुसंवर्धनाचा कार्यक्रम सुरू केला पाहिजे. नवीन प्रकारचे वृक्ष लावले तर त्यापासून उपयोगी वस्तू तयार करणे आणि त्यांची विक्री ह्यांचीही योग्य व्यवस्था केली गेली पाहिजे. वरील सर्व प्रकारच्या कार्यक्रमांची अशा तऱ्हेने आखणी केली जावी की, जेणेकरून स्थानिक लोकांना पूर्ण वेळ रोजगार उपलब्ध होईल आणि जंगलातील विविध प्रकारच्या कामांकरता पुरेशा संख्येने स्थानिक कामगारही उपलब्ध राहातील.

मर्यादित स्थानिक मनुष्यबळ लक्षात घेता वनसंवर्धनाला प्राधान्य दिलेल्या क्षेत्रात शेती हा दुय्यम व्यवसायच ठरेल.

स्थानिक लोकांना वरील पद्धतीने नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात भागीदारी दिल्यास त्यांना भविष्यकाळाबद्दल सुरक्षितता वाटेल. ही सुरक्षिततेची भावना निर्माण झाल्यावर वाटेल त्या मगदूराची, वाटेलती किंमत देऊन मिळेल तेवढी जागा स्वतःच्या मालकीची म्हणून मिळवण्याची वृत्ती कमी होईल.

अशा प्रकारच्या सर्वंकष योजना भिन्न भिन्न लहान लहान क्षेत्राकरता त्या त्या क्षेत्राची प्रत्यक्ष परिस्थिती विचारात घेऊन स्थानिक लोकांच्या सल्लामसलतीने तयार करण्यात याव्या. ह्या सर्व लहान लहान क्षेत्रा-

तील योजनांच्या कार्यवाहीत सुसंवाद आणण्याच्या दृष्टीने व त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्याच्यादृष्टीने सर्व क्षेत्रातील प्रमुखांना प्रतिनिधित्व देणारी एक विभागीय संघटना (संस्था) स्थापन करणे योग्य होईल. सर्व विभागाला उपयोगी ठरणारे निर्णय ही संस्था घेऊ शकेल.

### सर्वंकष नियोजन

आदिवासींचा विकास आणि वनविकास ही एकमेकाला पूरक व्हावीत या दृष्टीने नियोजन करावयाचे झाल्यास प्रत्येक क्षेत्राची नैसर्गिक साधनसामग्री आणि तेथील स्थानिक लोकांची सामाजिक आर्थिक स्थिती याचा काळजीपूर्वक अभ्यास करावा लागेल. आदिवासी विभागाच्या सर्व क्षेत्रात आदिवासींची प्रगती सारखीच झालेली नसते. तसेच निरनिराळ्या क्षेत्रातील वनसंपत्तीही सारखी नसते. वनसंवर्धनावर भर देऊन योजना तयार करावयाच्या झाल्यास अतिशय मागासलेल्या भागांनाच प्राधान्य द्यावे लागेल कारण तेथील जंगले सुस्थितीत असल्यामुळे तेथे नैसर्गिक साधनसामुग्री विपुल असेल. पण तेथील लोक तुलनेने मागासलेले असल्यामुळे त्यांना शीघ्रगतीचा बदल मानवणार नाही आणि जंगलाचा व्यापारीतत्त्वावर उपयोग सुरू झाल्यावर त्यांच्या अप्रगत सामाजिक जीवनावर त्याचा फार विपरीत परिणाम होईल. म्हणून अशा क्षेत्रात वनशास्त्राच्या दृष्टीने शीघ्रगतीने काही बदल करणे अवश्य असले तरी तेथील आदिवासींच्या जीवनावर त्याचा घातक परिणाम होऊ नये ह्या दृष्टीने बदल सथगतीनेच घडवून आणणे भाग आहे. याचे दुसरे टोक म्हणजे जेथील वनसम्पत्ती लोकसंख्येच्या अमर्याद वाढीमुळे जवळपास पूर्णपणे नष्ट झाली आहे. निव्वळ आर्थिकदृष्ट्या विचार केल्यास अशी क्षेत्रे वनसंवर्धन नियोजनातून वगळणेच क्रमप्राप्त ठरेल. पण ह्या क्षेत्रातील पर्यावरण समतोल पूर्णपणे बिघडलेला असतो आणि इतर साधनांच्या अभावी येथील रहिवासी दूरदूरच्या जंगलावर आक्रमण करण्याच्या प्रयत्नात असतात. ताबडतोबीचा आर्थिक लाभ आणि दूरगामी परिणाम करणारा पर्यावरण असमतोल ह्या परस्पर विरोधी गोष्टींचा विचारकरता अशा भागातच वनविकासावर अधिक लक्ष केन्द्रित करणे अंततः राष्ट्रहिताचे ठरेल.लोकसंख्या बेताचीआणि वनसम्पत्ती थोड्याफार प्रमाणात उपलब्ध असलेल्या क्षेत्राकरता सघन वनसंवर्धन आणि तातडीच्या स्थानिक गरजा भागवणारा वृक्षराजी तसेच शेती ह्या सर्वांचे योग्य मिश्रण असणारे नियोजन वापरता येईल. काही भागात वनसंवर्धनप्रधान अर्थव्यवस्था व्यवहारात येईल तर काही भागात इतर विकासयोजनांना पूरक म्हणून वनसंवर्धनाचा उपयोग करता येईल.

प्रत्येक क्षेत्रातील वनसंवर्धन कार्यक्रमाचे दोन भाग पाडावे लागतील. पहिल्या भागात स्थानिक समाजाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याला प्राधान्य द्यावे लागेल. प्रत्येक क्षेत्राच्या आर्थिक सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात ह्या मूलभूत गरजांची व्यवस्था करावी लागेल मागासलेल्या भागात आदिवासी जवळजवळ पूर्णपणे त्याच्या जीवनावश्यक गरजांकरता जंगलावर अवलंबून असतो. म्हणून अशा भागाच्या नियोजनाच्या वर उल्लेखिलेल्या पहिल्या भागात या गरजा पूर्णपणे भागविण्याची सोय केली गेली पाहिजे. अधिक प्रगत भागात स्थानिक लोकांच्या जीवनातील जंगलाचे महत्त्व कमी कमी होत जाते. अशा परिस्थितीत वनसंवर्धनाच्या प्रकल्पामधील स्थानिक लोकांच्या तात्कालिक गरजा पुरविण्याच्या उद्दिष्टाला गौण स्थान देता येईल.

निरनिराळ्या क्षेत्रातील लोकांना भिन्न भिन्न जीवनावश्यक वस्तूंकरिता जंगलावर अवलंबून राहावे लागते तुलनात्मकदृष्ट्या विकासाच्या सुरुवातीलाच आदिवासीचे अन्नाकरता जंगलावरचे अवलंबित्व कमी होते. निवाऱ्याकरिता लागणाऱ्या वस्तूंकरिता मात्र विकासाचा बराच पुढचा टप्पा गाठेपर्यंत आदिवासी जंगलावर विसंबतात. जनावरांकरता कुरणे, अवजारे बनवण्याकरता लाकूड, नगदी उत्पन्न मिळविण्यास उपयोगी अशी जंगलाची उत्पादने इत्यादी बाबींचासुद्धा प्रत्येक क्षेत्रीय विकास आराखडा तयार करताना विचार करावा लागेल. स्थानिक लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याकरता आवश्यक त्या विविध घटकांची नीट व्याख्या केल्यानंतर, व्यापारी तत्त्वावरील वनसंवर्धनावर चांगल्या प्रकारे लक्ष केन्द्रित करता येईल. असे करतानासुद्धा त्याचा स्थानिक लोकांच्या जीवनावर आणि अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो. याकडे बारकाईने लक्ष द्यावे लागेल. उदाहरणार्थ अधिक मागासलेल्या भागात सघन वनसंवर्धनाचे कार्यक्रम टाळावे लागतील. कारण त्याकरता बाहेरून मजूर आणावे लागल्यामुळे त्या क्षेत्रातील लोकवस्तीचे वांशिक

स्वरूपच एकदम बदलेल. वनसंवर्धनाची सघनता आणि नवीन तंत्राचा उपयोग याची निवड करताना हे बदल आत्मसात करण्याची स्थानिक समाजाची कुवत लक्षात घेतली पाहिजे. जेथे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे आणि वनसंपत्तीही लक्षणीय आहे अशा प्रगत भागात सघन वनसंवर्धन कार्यक्रम सुरुवातीपासूनच अंगिकारता येतील. ज्या क्षेत्रातील वनसंपत्ती मोठ्या प्रमाणावर नष्ट झालेली आहे अशा ठिकाणी मात्र नियोजनामध्ये पर्यावरणसंतुलन स्थापन करण्याच्या दृष्टीने विकासाच्या विविध अंगांचा अग्रक्रम ठरवावा लागेल.

[आदिवासी विकास योजना तयार करताना उपलब्ध स्थानिक साधनसामग्री आणि लोकांमधील कौशल्य व त्यांच्या आशाआकांक्षा विचारात घ्याव्या लागतील. हे करताना एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे की, अर्थशास्त्राचे नियम आणि अशास्त्रीय अप्रगत आदिवासी आर्थिक जीवन यातील अंतर्विरोध सतत वाढतच राहाणार व त्यामुळे या दोघांत मेळ घालण्याच्या प्रयत्नांना मर्यादा पडणार स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा उपयोग करून आर्थिक नियोजन करीत असतानाच सामाजिक सेवांसाठीसुद्धा पूर्व नियोजन करावे लागेल. एखाद्या क्षेत्रातील आर्थिक उलाढालींचा वेग जसजसा वाढेल तसे दैनंदिन जीवनात कराव्या लागणाऱ्या बदलांना तोंड देण्याची कुवत समाजामध्ये निर्माण करण्याकरता सातत्याने प्रयत्न चालू ठेवावे लागतील. एकदा या लोकांना आपल्या हक्काची जाणीव झाली आणि विकासयोजनांच्या फायद्यात त्यांची भागीदारी आहे ही गोष्ट त्यांना पटली म्हणजे प्रगतीच्या मार्गामधील एक मोठाच अडसर दूर होईल आणि मग नैसर्गिक संपत्तीचा अधिकाधिक शास्त्रीयदृष्टया उपयोग करण्याच्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञानाचा वापर व भांडवलगुंतवणूक मोठ्या प्रमाणावर निःसंकोचपणे करता येऊन स्थानिक साधनसंपत्ती स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय गरजा दृष्टीसमोर ठेवून विकासाकरता राबवता येईल.]

### निष्कर्ष

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, लोकांचा विकास आणि वनविकास या दोन समान महत्त्वाच्या उद्दिष्टांमध्ये कोणत्याही प्रकारची अंगभूत विसंगति नाही. वनसंपत्तीचा तर्कशुद्ध पद्धतीने उपयोग करण्याकरिता स्थानिक लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट हा चांगला पाया होऊ शकेल.

विकासाकरता वापरावयाच्या तंत्रज्ञानाची पातळी आणि योजनांची सघनता यावर स्थानिक जनतेच्या सामाजिक-आर्थिक स्थितीच्या मर्यादा अपरिहार्यपणे पडणार याचे भान योजनाकारांनी ठेवणे अगत्याचे आहे.

मूलभूत गरजांचा अंदाज बांधतानासुद्धा सतत बदलणाऱ्या आर्थिक, सामाजिक व्यवस्थेकडे लक्ष दिले पाहिजे. आदिवासी विकास योजना तयार करताना उपलब्ध वनसंपत्तीला आधार मानणे भाग आहे. कारण ह्या आधारावरच आदिवसींची अर्थव्यवस्था प्रगती करू शकते. नियोजनाच्या आरंभी-विशेषतः मागासलेल्या भागात सामाजिक सेवांमध्ये प्राधान्याने आणि मोकळ्या हाताने गुंतवणूक केली पाहिजे. म्हणजे विकासाच्या मार्गातील अडथळे लवकरात लवकर दूर होतील आणि स्थानिक साधनसंपत्तीचा विकासाकरता जास्तीत जास्त उपयोग करता येईल. प्रत्येक लहानलहान आदिवासी क्षेत्रातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती भिन्न असल्यामुळे प्रत्येक लहान भागाकरता बारकाईने विचार करून नियोजन करावे लागेल. स्थानिक लोकांना नियोजनाबद्दल आपुलकी निर्माण झाली नाही आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत त्यांचा सहभाग नसला तर ते नियोजन वास्तववादी होणार नाही. नियोजन यशस्वी होण्याकरिता नियोजनामुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या संपत्तीमध्ये आदिवासीला भागीदारी मिळाली पाहिजे आणि योजनांच्या व्यवस्थापनामध्ये त्यांना सहभागी करून घेतले पाहिजे. ●


**वार्षिक वर्गणी**

हाकारा : १५ रुपये

हाकारा + परिषद : २० रुपये

*

**नवीन पत्ता**

द्वारा—जगदीश गोडबोले

सीमा, ब—७, शिरोळे मार्ग

पुणे — ४११ ००४

# जंगल बचाव परिषदा

'जबरन–जोत आंदोलन कृतीसमिती'ने जबरन–जोत जमिनीचा (अतिक्रमित जमिनीचा) प्रश्न धसास लावावयाचे प्रयत्न सुरू केल्यावर, ही मंडळी जंगलाचा सत्यानाश करण्यास जबाबदार आहेत. होती व पुढेही राहतील अशी पद्धतशीर आवई हितसंबंधी लोकांकडून उठविण्यात आली. खऱ्या चोराने दुसऱ्या माणसाकडे बोट दाखवून चोरऽचोर म्हणून ओरडत इतरांची दिशाभूल करावी व स्वतः निसटून जावे, असा प्रकार वर्षानुवर्षे चालला होता. जंगलाजवळ राहणाऱ्या आदिवासी–वनवासींनी स्वतःच्या गरजेपोटी जेवढे जंगल साफ केले, त्याच्या किती तरी पटींनी कायदेशीर व बेकादेशीर जंगलतोड, बडे जंगलठेकेदार, सरकारी अधिकारी व राजकारणी यांनी संगनमताने केली. ही वस्तुस्थिती लोकांसमोर मांडण्यासाठी, आदिवासी भागात जंगल–बचाव परिषदा घेण्यात आल्या. पहिली परिषद ठाणे जिल्ह्यातील मनोर येथे. दुसरी धुळे जिल्ह्यातील शहाद्याला व तिसरी चंद्रपूर जिल्ह्यातील सिरोंचा येथे घेण्यात आली.

जबरन–जोत जमिनी नियमानुकूल करण्याची मागणी अतिशय जुनी आहे. गुंतागुंतीची आहे. अतिक्रमित जमिनी नियमानुकूल करण्याचे वर्ष दरवर्षी बदलले जाते आणि हे असेच चालले तर जंगलाचे नाव–निशाण रहाणार नाही. लोकसंख्येबरोबर जमीन वाढत नाही ही गोष्ट स्पष्ट असली तरी हा प्रश्न गुंतागुंतीचा आणि डोकेदुखीचा होण्यास मूळ कारण सरकार व कारभारयंत्रणेचा थोडासा बेजबाबदारपणा व बराचसा धूर्तपणा आहे काही तुरळक ठिकाणी या सबलतीचा गैरफायदा घेण्याचा प्रकार झाला असेल, पण एरवी प्रत्येक वेळी निवडणुकींच्या वा तत्सम मोक्याच्या वेळी घाई-घाईने आदेश काढावयाचा, त्या अर्धवट आदेशाचीही अंमलबजावणी होऊ नये अशा आणखी अर्धवट रीतीने कारभारयंत्रणेने पावले उचलायची आणि अखेर कोल्हा आणि करकोचा या गोष्टीप्रमाणे गरजू–नडलेल्या आदिवासी वनवासींच्या पोटी काही पडू द्यायचे नाही असे दरवेळी घडत आलेले आहे. 'हाकारा'च्या प्रथम अंकात ही सर्व वस्तुस्थिती मांडलेली होती.

'जंगल बचाव परिषदे'तून आदिवासी लोक व आमजनतेसमोर ही परिस्थिती मांडण्यात आली. आता फसून चालायचे नाही तर सिंह बनून या लबाड कोल्ह्याची मान धरण्याचा निर्धार परिषदेत व्यक्त करण्यात आला. शिवाय भारतासारख्या कृषि प्रधान देशात जमीन व मातीची धूप थांबवणे हे जंगलाचे प्रमुख कर्तव्य मानावे, स्थानिक आदिवासी व वनवासींच्या प्राथमिक गरजांकडे लक्ष पुरवावे व त्यांचे वन–अधिकार, 'सवलती' नाही तर 'हक्का'च्या स्वरूपात मानले जावेत, वन–संवर्धनाच्या योजनांमध्ये त्यांना महत्वाचे भागीदार म्हणून सहभागी करून घेण्यात यावे आदि मागण्या 'परिषदां'मध्ये मंजूर करण्यात आल्या.

'जंगल–बचाव परिषदा'मधून आदिवासी-वनवासी जनता व त्यामध्ये काम करणाऱ्या विविध संघटना–कार्यकर्ते यांनी वन–संवर्धनाबाबत आपली जबाबदारी पार पाडण्याचीही ग्वाही दिली. आजतागायत या प्रश्नाकडे पाहिजे तितके लक्ष दिले गेले नाही, पण आता गरीब माणसाच्या व पर्यायाने सर्वांच्याच तातडीच्या आणि निरंतर सुखासाठी या प्रश्नाकडे लक्ष पुरविण्यासाठी लोकजागृती करण्याची, प्रत्यक्ष कार्यक्रम हाती घेण्याची कल्पना सर्वांनी केली आहे. प्रत्यक्ष कार्यसही सुरुवात झाली आहे. □

# बंजारी तांड्यात वृक्षारोपण

पुरोगामी मित्रमंडळ नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यात वंजारा, हाटकर आदि दलित समाजात संघटनेचे–जाणीव–जागृतीचे–काम करीत आहे.

कार्यकर्ते कामासाठी रानोरान वंजारी तांड्यात फिरत असताना डोकरे म्हणजे म्हातारे लोक असं बोलताना आढळले की, बाबांनो, आपल्या भागात पण फार–फार अरण्य होतं. वाघ हरण कोल्हे-मोर पशू-पक्षी होते. जनावरांना चारा भरपूर होता. पाऊस चांगला होता. जंगल गेल्याने पाऊस चारा गेले आहे. दुष्काळ आला आहे.

संघटनेचे काही कार्यकर्ते नाशिक येथील वन-अधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक आटपून व तेथील वनीकरणाचे काम पाहून परत आल्यावर, तांडया-तांडयावर वृक्षारोपण करण्याचा विचार झाला. घरटी दोन-दोन रोपटी लावली. वडाच्या फांद्या पण लावल्या. नांदेडचे वन-अधिकारी यांनीही सर्व मदत व मार्गदर्शन केले.

कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे एकूण८००लोकांना जमीन मालकीचे नवीन पट्टे मिळाले आहेत. यामधील काही जमिनीवर 'वन-शेती' करता येईल का याचा विचार चालू आहे.

–शंकर पवार



वनकर्मचारी व कार्यकर्ते श्री. गं. बा. सरदारांसमवेत : 'संवादा'ची सुरुवात

# वनकर्मचारी आणि कार्यकर्ते परिषद

वन-संवर्धन व पर्यायाने पर्यावरण--रक्षणासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर सर्वांगीण व समतोल चर्चा व्हावी असा 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदे' चा प्रयत्न होता व आहे. विशेषत: या प्रश्नाबाबत वन-कर्मचारी व कार्यकर्ते यांची निवांतपणे चर्चा घडावी अशी 'परिषदे'ची इच्छा होती. कारण एरवी बहुधा एखाद्या तणावाच्या वेळीच हे दोन्ही पक्ष आमने-सामने येतात आणि सहाजिकच एखाद्या प्रश्नाची साधक-बाधक चर्चा करण्याच्या मनस्थितीत नसतात असा अनुभव येतो.

नाशिकच्या 'वृक्ष-मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. वि. ह. गोगटे यांच्या पुढाकाराने व वन-विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्री. मरवल्ली आणि नाशिक वन-वृत्ताचे तेव्हाचे वन-संरक्षक श्री. साठे यांच्या सहकार्याने 'परिषदे'च्या या प्रयत्नाला यश आले. त्यांनी प्रथम परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा व नंतर आदिवासी भागातील कार्यकर्त्यांचा नाशिक-पेठ भागाचा अभ्यास-दौरा आयोजित केला.

परिषदेचे अध्यक्ष श्री. गं. बा. सरदार, प्रा. मुटाटकर, श्री. शरद कुलकर्णी व त्यांचे इतर सहकारी यांनी प्रथम पेठ भागातील वन-विकास महामंडळाच्या सागरोपवनांची पहाणी केली व नंतर वन-विकास महामंडळ त्या भागात करीत असलेल्या सामाजिक वन-संवर्धन आणि इतर कल्याणकारी प्रयत्नांची प्रत्यक्ष माहिती घेतली. नंतर रात्री शेकोटीभोवती रंगलेल्या चर्चेची धग दोन दिवस टिकली. 'वन' म्हणजे काय-केवळ झाडांचा समूह की, त्यामध्ये रहाणारे पशु-पक्षी-मानव यांचाही समूह, मग वन-संवर्धन म्हणजे केवळ झाडांची निगराणी, की या सर्वांची देखभाल, वन-संवर्धनात स्थानिक स्थानिक वनवासी-आदिवासींना स्थान काय, वन-संरक्षण त्यांच्या बरोबर, की त्यांच्यापासून, सरकारी वन-योजना निसर्ग-संतुलन व स्थानिक लोकांच्या गरजांना मारक आहेत की, पूरक या व अशा अनेक प्रश्नांना श्री. मरवल्ली, श्री. साठे व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिणामकारक उत्तरे दिली. वन-विकास महामंडळाचा जन्म कसा झाला व एका आर्थिक चौकटीत काम करावे लागत असल्याने त्याचा धोरणांवर

अपरिहार्य परिणाम कसा होतो, वनखात्याला स्वतःची अशी जन–संपर्कयंत्रणा नसल्याने व आपल्या कामाच्या जंगलाच्या बाहेर पडायचे नाही अशी सर्वसाधारण वन-कर्मचाऱ्यांची मनोवृत्ती असल्याने काय परिणाम होतात आदि गोष्टी त्यांनी अगदी सविस्तरपणे सांगितल्या. अनेकजण या गोष्टी समजून न घेता टीका करतात याबद्दल त्यांनी मनापासून दुःख व्यक्त केले.

प्रा. सरदारांनीही वन–प्रश्न, त्यासंबंधीची आंदोलने, त्यांचा व्यापक सामाजिक–संदर्भ यांचे मार्मिक विश्लेषण करून सर्वांनाच आवाहन केले की, आपण विरोधक म्हणून एकमेकांसमोर उभे ठाकलो तरी शत्रुत्वाची भावना सोडली पाहिजे !

कार्यकर्ते व वन–अधिकारी यांच्या संयुक्त अभ्यास–दौऱ्यात सामाजिक वन–संवर्धन प्रकल्पांची पहाणी व चर्चा प्रामुख्याने झाली. पेठ विभागातील कामाबरोबरच मालेगाव विभागातील काही खेडयात ग्राम-पंचायटीच्या जमिनीवर झालेली वन–संवर्धनाची कामे पाहून कार्यकर्ते विशेष प्रभावी झाले. ग्राम–पंचायतीने आपल्याकडील जमीन ठराव करून पाच वर्षांकरिता वन–खात्याकडे सुपूर्द केल्यास, वनखाते गावकऱ्यांच्या मदतीने त्यावर झाडे लावते. या झाडापासून पुढे गावकऱ्यांची लाकूड–सरपण–चाऱ्याची गरज भागते. तसेच गावकऱ्यांना या जमिनीवर रोजगारही मिळतो. वनखाते व गावकरी यांच्या मदतीने अशी योजना आपल्या भागात आणायची मनीषा अनेक कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली.

नाशिक परिषद ही केवळ सुरुवात आहे. निरनिराळ्या विभागांतील वन–कर्मचारी व कार्यकर्ते यांना असे अभ्यास–दौरे व चर्चा आयोजित करून या महत्त्वपूर्ण विषयावरील ' संवादा 'स सुरुवात करता येईल. ' परिषदे 'ला अशा प्रयत्नात सहभागी होण्यास आवडेल.

या बैठकीपूर्वी खालील गोष्टींबाबत कार्यकर्त्यांनी चर्चा करावी व आपला दृष्टीकोन ठरवावा अशी कल्पना आहे.

१) जबरनजोत जमिनीची मागणी व वनसंवर्धन हे परस्परविरोधी आहेत काय ?

२) आपल्या भागात जंगलांचा नाश होत आहे काय ? असल्यास त्याला जबाबदार कोण ? याबाबत तपशीलासह उदाहरणे देता येतील का ? जंगलनाशामुळे आपल्या भागात कोणते तातडीचे प्रश्न निर्माण झाले आहेत ?

३) सामाजिक वनीकरण (सोशल फॉरेस्ट्री) बाबत अलीकडे बरीच चर्चा होते. या विषयावर आपले विचार काय आहेत ?

४) उताारावरची, कमी कसाची वा इतर नापीक जमीन (यात बरेचदा जबरनखाली मिळालेली जमीन येते) कसून आदिवासीला मिळणारे तुटपुंजे उत्पन्न दरवर्षी कमीच होते असे म्हणतात. आपला अनुभव काय ? हे उत्पन्न वाढवण्यासाठी हाती घेण्याजोगे कार्यक्रम कोणते ? उदा. बांधबंदस्ती, लिफ्टस्कीम, वनशेती, हायब्रीड पिके वगैरे.

५) साधारणपणे एकरी वर्षाला ५ पोती भात, ज्वारी मिळते असा अंदाज आहे व वर्षाला ५०० रु. उत्पन्न होते. रोजगार देऊन या उत्पन्नाची भरपाई करावी व ही जमीन जंगललागवडीखाली आणावी. शेवटी झाडांपासून मिळणारे उत्पन्न खर्च वजा जाता मालकाने घ्यावे, अशी योजना असल्यास लोक भाग घेतील का ?

६) वनविकास मंडळाच्या आपल्या भागातील कामासंबंधी आपले चांगले-वाईट काय अनुभव आहेत ? सागाची नवी लागवड करण्यापूर्वी जंगल साफ करताना आदिवासींना उपयुक्त फळझाडे ठेवली जातात. डोंगर-उतार, नदीनालाकाठ या जागचा झाडोरा तोडल्यास फार धूप होते म्हणून येथे जंगल साफ केले जात नाही. साफ केलेल्या जंगलात ताबडतोब नवीन लागवड केली जाते असे महामंडळाचे म्हणणे आहे. आपल्याला काय दिसते ? तपशील देऊ शकाल काय ?

७) आदिवासी नाइलाजाने फाटे विकून पोट भरतो. त्यातून जंगल तुटते. जळणाची गरज, आदिवासीचा रोजगार आणि वनसंवर्धन यांची सांगड कशी घालता येईल ?

८) आपल्या भागात जंगलावर आधारित कोणते व्यवसाय आहेत किंवा होते ? त्याच्या अडचणी काय आहेत ? कोणते सुरु करता येतील ?

९) सामाजिक वनीकरणाच्या कोणत्या योजना आपल्या भागात चालू आहेत, याची आपल्याला माहिती आहे का ? ती मिळवण्यासाठी आपण काय प्रयत्न केलात ?

१०) वनसंवर्धनाच्या योजना खाजगी जमिनीवर घ्याव्यात की सार्वजनिक ? भर कशावर असावा ? का ? मोठ्या कारखानदारांनी यासाठी जमिनी मागितल्या आहेत. आपली प्रतिक्रिया काय ?

११) वनसंवर्धनाचे कार्यक्रम रोजगार हमीशी कसे जोडून घेता येतील ?

१२) आपली संघटना वनसंवर्धनाचा एखादा कार्यक्रम हाती घेऊ इच्छिते काय ? त्याचे स्वरूप काय असेल ? त्यात वनखाते व इतरांचे काय सहकार्य लागेल ?

हमाल पंचायत

# हमाल पंचायत – कष्टाची भाकर

## ना नफा ना तोटा या तत्वावर

**विक्री केन्द्र** : स्टेशन–मोलेदिना हॉल,
मार्केट यार्ड–छत्रपति शिवाजी मार्केट,
हमाल भवन–मार्केट यार्ड,
भवानी पेठ.

**अध्यक्ष** : डॉ. बाबा आढाव

**सरचिटणी** : श्री. राम नाईक

**व्यवस्थापक** : श्री. सुरेश खाडे

१२४१, भवानी पेठ,
पुणे–४०० ००२

दूरध्वनी–२३०९९



*With Best Compliments From :*

# M/s. Pandit and Kirkire

**Builders, Engineers and Consultants**

**91, HINDU COLONY, 3Rd LANE,**

**Dadar, Bombay 400 014.**

• *Tel. : 467359*

## संवाद

मा. संपादक हाकारा,

'एप्रिल-जून'चा वैद्यकीय विशेषांक ग्रामीण विशेषतः आदिवासी भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना विशेषत्वाने उपयुक्त वाटला. 'सोपी-स्वस्त व परिणामकारक औषधे' हा लेख विशेष आवडला. नुसताच आवडला नव्हे तर मी आदिवासी भागात काम करते व होमिओपॅथीचा अभ्यासही करीत असल्याने या लेखाचा खूपच फायदा झाला. अशा प्रकारचा लेख आपल्या दर अंकात असावा असे वाटते म्हणून हे पत्र !

**ज्योती केळकर,**
आदिवासी सहज शिक्षण परिवार,
मु. पो. मालवण, ता. पालघर (ठाणे).

'हाकारा'चे अंक मिळाले. एका उपेक्षित गटसमूहाचे जीवन विकासोन्मुख व्हावे म्हणून 'हाकारा' करीत असलेल्या विधायक अन् आंदोलनात्मक प्रयत्नांना माझ्या शुभेच्छा !

**य. गो. नित्सुरे, पुणे-४**

'हाकारा'चा 'आदिवासी आणि आरोग्य' हा अंक वाचला. मुखपृष्ठावरील बेअर फूट अँबुलन्सचे रेखाचित्रच आदिवासींच्या आरोग्याची सद्यस्थिती व त्यावर विचार करण्याची निकड दर्शविते.

मी स्वतः आरोग्यरक्षकाचे काम करीत असल्याने अंक अतिशय उपयुक्त आहे. डॉ. अल्बर्ट स्वाइटझर यांचे छोटे चरित्र या क्षेत्रातील ध्येयवादाचा स्पष्ट आदर्श आहे. मलेरियाच्या गोष्टीतून सोप्या भाषेत या रोगावर कशी मात करता येईल हे सांगितले आहे.

आदिवासी आणि आनुवंशिकता हा लेख बरेचसे कुतूहल जागृत करून जातो. ज्ञान-प्रबोधिनीने 'आयुर्वेद औषधी पेटी' तयार करून स्थानिक औषधींचा अनुभव घेणे सुरू केले आहे. होमिओपथी औषधांसंबंधीची माहिती ग्रामीण भागात फारच उपयुक्त ठरेल. वैशिष्ट्य म्हणजे कोणाही जबाबदार व्यक्तीस ती देता येतील. आणखीही अनेक रोग विशेषतः स्त्रीयांचे व लहान मुलांचे यासंबंधी माहिती दिल्यास अगर यावर चर्चासत्र घेतल्यास फार उपयोगी पडेल. या विषयावरील पुस्तकाची नावे देणेही योग्य ठरले असते.

**नारायण खुळे,**
फुलगाव.



# वृक्षमित्रांचा गौरव

☐ सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील मोहित्यांच्या वडगावचे निसर्गप्रेमी श्री. धों. म. मोहिते यांनी सागरेश्वरपरिसरात रोपे लावून त्यांच्या रक्षणाचा संवर्धनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जनतेच्या सहकार्याने यशस्वी केला. श्री. मोहिते, जनता व वनविभागाच्या परिश्रमाचे प्रतिक सागरेश्वर उद्यानाच्या रूपाने आज दिमाखाने उभे आहे. श्री. मोहिते यांच्या या असामान्य उपक्रमाबद्दल शासनानेही महाराष्ट्र दिनाच्यानिमित्ताने 'वृक्षमित्र' म्हणून त्यांचा उचित गौरव केला आहे.

☐ मालेगावचे श्री. अ. कृ. टिपरे यांनी नांदगाव येथे उप-अभियंता असताना गिरणानदीवर बांधलेल्या धरणाच्या बांधाच्या चहूबाजूंनी सुमारे ६० हेक्टर क्षेत्रात वृक्षारोपणाची महत्त्वाकांक्षी योजना अंमलात आणली. आंबा, लिंबू, शिसू, शिरीष, नीम इत्यादी जातींची सत्तरहजार झाडे १९७५-८० या काळात लावली गेली. श्री. टिपरे यांच्या या कार्याबद्दल शासनाने त्यांना महाराष्ट्रदिनी वृक्षमित्र ही पदवी बहाल केली आहे.

☐

*Best compliments from :*

# PERFECT INDUSTRIES

*Manufacturers and Repairers :*

Spare Parts of

all types of Machinery

and

all types of gears

3rd Fl., 324, Todi Indt. Estate,

N. M. Joshi Marg, ( Delisle Road )

**BOMBAY 400011**

संस्थापरिचय

# उल्हास परिसर प्रतिष्ठान

मुंबईच्या वैद्यकीय क्षेत्रातील काही मंडळींनी उल्हास नदीच्या परिसरातील ठाणे व कुलाबा जिल्ह्याच्या सीमेवरील वांगणी येथे 'वांगणी – इडगाव वेल्फेअर कमिटी'ची स्थापना करून १९७५ मध्ये आपल्या सेवाकार्यास आरंभ केला. या सेवाकार्याचा शुभारंभ दि. १४ सप्टेंबर १९७५ रोजी वैद्यकीय केन्द्राच्या उद्घाटनाने झाला. पुढे सेवाकार्याचा व कार्यक्षेत्राचाही विस्तार वाढल्याने 'वांगणी – इदगाव वेल्फेअर' कमिटींचे रूपांतर 'उल्हास परिसर प्रतिष्ठान' या संस्थेत झाले. 'प्रतिष्ठान'ची रीतसर स्थापना ३१ मार्च १९७६ रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर झाली.

'उल्हासपरिसर प्रतिष्ठान'ने अल्पावधीत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली; पण 'प्रतिष्ठान'ची खरी प्रतिष्ठा वैद्यकीय कार्यात आहे. आदिवासींच्या व इतर मागासलेल्या ग्रामीण जनतेच्या आरोग्याचा प्रश्न अधिक जिव्हाळ्याचा होता व आहे. म्हणूनच 'प्रतिष्ठान' ने वैद्यकीय क्षेत्रावर आपले लक्ष केन्द्रित केले.

सुरुवातीच्या (१९७५–७६) या वर्षात उल्हासपरिसरातील जनतेसाठी नेत्र, हृदय, दंत, क्षय आदी शिबिरे 'प्रतिष्ठान' ने आयोजित केली. हळूहळू संस्थेचा व्याप वाढू लागला. रुग्णांची संख्या वाढू लागली. त्यामुळे वैद्यकीय केन्द्रात रोगनिदानासाठी अधिक व अत्याधुनिक उपकरणांचीही सोय करण्यात आली नेरळ, कर्जत, माथेरान, बदलापूर येथील रुग्णही या केन्द्रात येऊ लागले. त्याचबरोबर केन्द्रात वैद्यकीय सेवेसाठी दर रविवारी येणाऱ्या डॉक्टरांच्या संख्येतही वाढ झाली.

केन्द्राची वाढती लोकप्रियता व उपयुक्तता पाहून वांगणीचे श्री. गजाननराव शेळार, कुळगावचे श्री. स. म. जाधव व नेरळचे श्री मूलचंद शहा यांनी 'प्रतिष्ठान' साठी आपल्या जमिनी दान केल्या.

स्थानिक जनतेच्या प्रोत्साहनाने १९७८–७९ मध्ये प्रतिष्ठानने (१) वांगणी येथे सुसज्ज रोगनिदानकेन्द्र व दवाखाना व (२) नेरळ मध्ये हुतात्मा कोतवालांच्या स्मरणार्थ रुग्णालय असे दोन महत्वाकांक्षी प्रकल्प जाहीर केले.

याशिवाय 'प्रतिष्ठान' ने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रांतही महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. 'आम्ही दोघं, आमची दोन मुलं आणि दोन गायी' हे प्रत्येक शेतकऱ्याचे ब्रीदवाक्य ठरावे. यासाठी 'प्रतिष्ठान' ने योजना आखली. या योजनेसाठी महाराष्ट्राच्या समाज कल्याण खात्याने २६,७०० रुपयांचे अनुदान दिले. या अनुदानातून बेंडीस गावातील १० आदिवासी महिलांना दुभती जनावरे देण्यात येणार आहेत.

आदिवासी समाजातील 'लग्नगडी' म्हणून समजल्या जाणाऱ्या वेठबिगारीच्या अमानुष प्रथेला तिलांजली देण्यासाठी 'प्रतिष्ठान' ने गेल्या ३ वर्षात १०० पेक्षा जास्त वधू–वरांचे बिनाकर्ज सामुदायिक विवाह घडवून आणले.

आदिवासींतील लोकनृत्य व लोकसंगीताची जोपासना करण्यासाठी लोकसंगीत–नृत्य – स्पर्धा आयोजित करण्यास आली. बैलगाडी, एस. टी., आगगाडी यातून क्वचित प्रवास करणाऱ्या आदिवासींना प्रतिष्ठानने 'मुंबई पुणे' विमानप्रवास घडवून आणला.

ही सर्व वाटचाल 'प्रतिष्ठान' ने संपूर्ण लोकाश्रयावर केली आहे.

'प्रतिष्ठान'च्या मदतीसाठी डॉ. के. आर. तोरसकर, कार्यवाह, उल्हासपरिसर प्रतिष्ठान, फत्ते मॅन्शन, ९८ सेठ मोतीशाह लेन, माझगांव, मुंबई–४०००१० या पत्त्यावर संपर्क साधावा.

☆ **लुकेना–क्रांतिकारक कल्पवृक्ष**
लेखक–वि. बि. देशपांडे
पृष्ठसंख्या–६४, किंमत ४ रुपये.
टपालखर्च रु. ३–१०
लुकेना किंवा सुबाभूळ या वृक्षासंबंधी
माहिती देणारे पुस्तक !

**पुस्तक मिळण्याची ठिकाणे–**

प्रकाशन व्यवस्थापक, शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग–मुंबई, औरंगाबाद, पुणे, नागपूर व मॅनेजमेंट रीसर्च सर्व्हीसिस, नॅशनल हाऊस, २ रा मजला, ६, तुलीच रोड, रीगल सिनेमाजवळ, मुंबई–४०२ ०३९

# हे राज्य ठरावे नंदनवन गरिबांचे !

महाराष्ट्र शासनाचा संपूर्ण कार्यक्रम समस्त गरीब जनतेच्या सर्वांगीण कल्याणासाठीच आखण्यात आला आहे. विकासाचा जास्तीत जास्त वाटा गरिबांना मिळावा हा त्यामागचा हेतू आहे.

हे उद्दिष्ट साधण्यासाठीच लहान शेतकऱ्यांची व्याख्या नुकतीच बदलण्यात आली आणि ६ हेक्टरांपर्यंत ( १५ एकर ) कोरडवाहू जमीन बाळगणाऱ्या किंवा ज्यांचा एकूण शेतसारा १५ रुपयांपर्यंत आहे अशा शेतकऱ्यांचा समावेश लहान शेतकरी ह्या सदरात करण्यात आला. बहुसंख्य शेतकरी आता ह्या सदरात मोडतील व लहान शेतकऱ्यांना मिळणारे सर्व लाभ आणि सवलती त्यांना प्राप्त होतील.

ज्यांचे कोणी नाही अशांना मदतीचा हात देणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना, तसेच बेकार तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सहाय्य करणारी संजय गांधी स्वावलंबन योजना ही शासनाच्या उपक्रमाची इतर महत्त्वपूर्ण अंगे आहेत. भूमिहीन मजुरांसाठी सहकारी तत्त्वावर फलोद्यान वसाहती स्थापन करणे हा असाच आणखी एक उपक्रम.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांचे मोल दिले अशा थोर हुतात्म्यांची स्मृति चिरंतर राहण्यासाठी राज्यात २०४ ठिकाणी उभारण्यात यावयाच्या स्मारकांच्या भूमिपूजनाचा शुभारंभ मुंबईत ९ ऑगस्ट रोजी करण्यात आला. त्याबरोबरच हुतात्म्यांच्या निकटच्या नातेवाइकांना आर्थिक मदत देण्याची योजनाही अंमलात आली. संपूर्ण देशात एकमेवाद्वितीय असलेल्या ह्या योजनेतून ज्यांचा समाजास आजवर विसर पडला अशा व उपेक्षित आणि गरजू लोकांबाबतची शासनाची बांधिलकी स्पष्टपणे प्रत्ययास येते.

पंतप्रधानांच्या वीस कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी येथे राज्याच्या पंचवार्षिक योजनेबरोबर जोमदारपणे करण्यात येत आहे. ह्या दोन्हींमध्ये बरेच साधर्म्य आहे. ह्या जोमदार अंमलबजावणीमुळे न्यायावर अधिष्ठित असा समाज निर्माण करण्याचे अंतिम उद्दिष्ट गाठण्यासाठी राज्यात अव्याहत सुरू असलेल्या निर्धारपूर्वक महान प्रयत्नांचे यथार्थ दर्शन घडून येते.

ज्यांचा प्रखर त्याग व थोर बलिदान ह्यामुळे आपण आज स्वातंत्र्याची फळे चाखीत आहोत अशा समस्त गरीब जनतेबाबतचे आपले कर्तव्य निर्धाराने व सर्व शक्तीनिशी पार पाडण्याची आजच्या ह्या पवित्र दिनी आपण सर्वजण पुन्हा एकवार प्रतिज्ञा करू या आणि कृतनिश्चयाने म्हणू या !

## हे राज्य ठरावे नंदनवन गरिबांचे !

---

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

## 'हाकारा' पहिला, जानेवारी १९८० : 'जबरन–जोत जमीन' खास विभाग

## 'हाकारा' दुसरा, एप्रिल १९८० : 'आदिवासी व शिक्षण' खास विभाग

## 'हाकारा' तिसरा, जुलै १९८० : 'आदिवासी व वन-संवर्धन' खास विभाग

१) वृक्षवल्ली आम्हा सोयरी – माधव गाडगीळ
२) 'चिपको' आंदोलन – जगदीश गोडबोले
३) सामूहिक वन-संवर्धना-द्वारे विकास –
४) प्राचीन वनराजीचे अवशेष – वा. द. वर्तक
५) जंगलच्या राजाला विकासाचे वेध – आ. मा. लेले
६) आदिवासी व ग्रामोद्योग – व्ही. के. सावंत
मधमाशा पालन – व. वि. दिवाण
रेशीम उद्योग –

## 'हाकारा' चौथा, ऑक्टोबर १९८० : 'आदिवासी साहित्य व कला' खास विभाग

१) गोंडी लोकगीतांमधील सौंदर्य आणि वास्तवता – भुजंग मेश्राम
२) सावकारी हिशोब – विठ्ठल पाडेकर
३) माडियांच्या नृत्यगीतातील साहित्य – शैलजा देवगावकर
४) कळसूत्री बाहुल्या, जनसंपर्क आणि जाणीव जागृती – हेमंत कानिटकर
५) माडियांची हस्तकला – शं. गो. देवगावकर
६) हुर्रे कुमरा – सुखदेव बाबू उईके
७) ग्रामीण चित्रणात जिवती – धनंजय नाकाडे
८) आदिवासींची वास्तुशास्त्रकला – का. रा. रडे
९) भारतीय आदिवासी कला – रंजन रॉय
१०) आदिवासी लोकगीते – सिंधुताई अंबिके

## 'हाकारा' पाचवा, जानेवारी १९८१ : 'नोकरीतील राखीव जागा' खास विभाग

१) दलितांच्या सवलती –गं. बा. सरदार,
२) राखीव जागा माहिती –पत्रके
३) दलितांच्या सवलती काही गैरसमजुती –रा. प. नेने
४) राखीव जागा शासकीय आदेशांची उपयुक्त माहिती
५) अनु. जाती–जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागास जाती यांची समग्र यादी
६) वनशेती – शंकर रंगनायन्
७) आदिवासी व वनखाते–अतिरिक्त वन–संरक्षक आदि माहितीपूर्ण मजकूर.

## 'हाकारा' सहावा, एप्रिल १९८१ : 'आदिवासी आणि आरोग्य' खास विभाग

१) डॉ. अल्बर्ट स्वाइट्झर –रंगनाथ गोडबोले
२) मलेरियाची गोष्ट –अरविंद पटवर्धन
३) आदिवासी आणि अनुवांशिकता –एस. एल. काटे
४) ग्राम आरोग्य प्रकल्प–कोसबाड –अनुताई वाघ
५) आदिवासींची श्रद्धास्थाने –वि. म. गोगटे
६) छुपो दवाखाना आमासाठी हाये –के. आर तोरसकर
७) आदिवासी आणि आधुनिक वैद्यक –अनंत फडके
८) औषधी परिचय – मेहता ट्रस्टचे बहुमोल कार्य औषधी पेटी, होमिओपथी इत्यादि माहितीपूर्ण मजकूर.

Registered with the Register of Newspapers for India Under No. 35835 / 80

*With Best Compliments From*

**Ion Exchange ( India ) Ltd.**

*Contact us for :*

Ion Exchange Resins
Chemical Dosing Equipment
Pressure Sand Filters
Upflow Filters-Multi Directional Flow Filters
Activated Carbon Filters
Demineralising Plants
Water Softening Plants
Portable Deionisers
Packaged Softeners
Chemical Feed Pumps
Thermal & Vacuum Deaerators
Radical Flow Clarifiers
Precipitator - Clarifiers
Hopper Bottom Sedimentation Tanks
Activated Carbons
Polyelectrolytes
Contact Stabilisation Plants
Conductivity Meters & Recorders
Solid State Automatic Programmeable
Logic Sequence Controllers
Reverse Osmosis Plants for Desalination
Design & Detailed Engineering for
Water & Effluent Treatment &
Reverse Osmosis Plants
Design, Engineering & Procurement of
Equipment to Clients' Specifications.

**Ion Exchange ( India ) Ltd.**

*An Associate of the portals group U. K.*

P. O. BOX No. 6273, Tiecicon House, Dr. E. Moses Road,
BOMBAY 400 011
Tel : 379522 / 892805 / 894878 / 895054
Gram : IONEXCOY Telex : 2187

*Branches :*

Ion House, 42, B. N. Reddy Road, MADRAS 600 017
Tel : 443293 / 445897 * Telex : 7333
308 / 309, Bhandari House, 91 Nehru Place,
NEW DELHI 110 019. Tel : 682383 / 682036 * Telex : 3315